ज्ञानदीप लावू जगी

# पुणे नगर वाचन मंदिर

स्थापना : ७ फेब्रुवारी १८४८

email : pnvm1848@gmail.com

www.punenagarvachan.org

पुस्तकाचे नाव : महाराष्ट्राचे सुपुत्र

लेखक : य. गो. नित्सुरे

प्रकाशक : व्हीनस प्रकाशन, पुणे

प्रकाशन वर्ष : १९५७


मूळ ग्रंथ प्रत : शिक्षण प्रसारक मंडळी, पुणे

पुणे नगर वाचन मंदिर

अंकेक्षण (डिजीटायझेशन) प्रकल्प

अंकेक्षण रूपांतर – २०२१

920



# महाराष्ट्राचे सुपुत्र

— य. गो. नित्सुरे

920
Nit
7729

१

D.V.POTDAR LIBRARY
S P COLLEGE
D00957

# महाराष्ट्राचे सुपुत्र

# महाराष्ट्राचे सुपुत्र

य. गो. नित्सुरे

किंमत रु. १-१२-०

व्हीनस प्रकाशन : पुणें

प्रकाशक :

स. कृ. पाध्ये
व्हीनस प्रकाशन
४१० शनिवार : पुणें २

प्रथमावृत्ति : १९५७

सर्व हक्क स्वाधीन

म 11307

सजावट :
मुखपृष्ठ : व्ही. एस्. पाथरकर
रेखाचित्रें : व्ही. एन्. ओके

मुद्रक :
य. गो. जोशी
आनंद मुद्रणालय
१९६।४६ सदाशिव : पुणें २

# अनुक्रमणिका


| विषय | पृष्ठें |
|---|---|
| १ रँग्लर र. पु. परांजपे | २ |
| २ म. म. द. वा. पोतदार | १२ |
| ३ लोकनायक मा. श्री. अणे | २२ |
| ४ रियासतकार गो. स. सरदेसाई | ३२ |
| ५ गुरुवर्य बा. ग. जगताप | ४२ |
| ६ महर्षि धोंडो केशव कर्वे | ५६ |
| ७ डॉक्टर ग. श्री. खैर | ६६ |
| ८ बॅरिस्टर रामराव देशमुख | ७८ |
| ९ उद्योगमहर्षि लक्ष्मणराव किर्लोस्कर | ८८ |

7729
9201 Nit
किंमत 1=75 20/9/93

## भूमिका—

विद्यार्थ्यांच्या व्यक्तित्वविकासाच्या व चारित्र्यसंवर्धनाच्या दृष्टीनें चरित्र-वाचनाचें महत्त्व अनन्यसाधारण आहे. जर योग्य वयांत योग्य व्यक्तींचीं चरित्रें वाचनांत आलीं तर स्वतःचें सर्व जीवन बदलून जातें असा अनुभव अनेकांना आजपर्यंत आलेला आहे.

सुदैवानें, मराठी साहित्यांत चरित्रांची वाण नाहीं. परंतु खास कुमार-वयांतील विद्यार्थिवर्गाच्या गरजा लक्षांत घेऊन तयार केलेलें चरित्रवाङ्मय कमी आहे. विशेषतः हायस्कुलांत व कॉलेजांत असणाऱ्या विद्यार्थ्यांना स्फूर्तिदायक वाटतील व मार्गदर्शक होतील अशा पद्धतीनें लिहिलेलीं चरित्रें अद्यापि कमी आहेत.

प्रस्तुत पुस्तकांत संग्रहीत करण्यांत आलेल्या नऊ व्यक्तींचे परिचय लिहितांना एका नव्या तंत्राचा अवलंब करण्यांत आलेला आहे. तें तंत्र म्हणजे त्या त्या व्यक्तींच्या प्रत्यक्ष मुलाखती घेऊन त्यांच्या त्यांच्या जीवनांतील बालपणापासून शिक्षण पूर्ण होईपर्यंतची तपशीलवार माहिती अधिक उठावदारपणें व विस्तारानें देणें हें होय. सामान्यतः असें होतें कीं, मोठ्या माणसांनीं प्रौढावस्थेंत गाजविलेल्या महान् कर्तबगारीचाच परिचय विद्यार्थ्यांच्या कानावर वारंवार येतो. हा नेत्रदीपक परिचय ऐकून वा वाचून विद्यार्थ्यांचे डोळे दिपणें स्वाभाविक असतें; परंतु त्यामुळें स्वतःची जीवन-नौका हांकारण्यांत त्यांना विशेषसें मार्गदर्शन मिळत नाहीं.

म्हणून यशस्वी व कर्तबगार व्यक्तींचा परिचय लिहिण्याबाबत मीं वेगळेंच तंत्र वापरलें आहे. या मोठ्या माणसांचा पायाभरणीचा काळ कसा होता याची माहिती मीं वाचकांना पुरविली आहे. प्रत्येक व्यक्तीची अनेकदां भेट घेऊन त्यांना आपापल्या बालपणासंबंधीं व विद्यार्थिदशेसंबंधीं मी अनेक प्रश्न विचारले. जणूं एक प्रश्नावलीच मी त्यांना मुलाखतीपूर्वी सादर करीत असें ! माझ्या या प्रश्नावलींत प्रत्येक व्यक्तीच्या वैयक्तिक जीवना-

संबंधीं विविध प्रकारचे प्रश्न असत. आई-वडिलांची संपूर्ण माहिती, आई-वडिलांशिवाय आणखी कोणा नातेवाइकाचा आपल्या जीवनावर परिणाम झाला असल्यास त्यासंबंधी माहिती, आई व वडील केव्हां वारले, कुटुंबाची सांपत्तिक परिस्थिति कशी होती, शिक्षणाची सुरुवात योग्य प्रकारें झाली काय, उत्कृष्ट शिक्षक कोणते भेटले, शाळेत व कॉलेजांत आपला अभ्यास कसा होता, नापास झालांत काय किंवा विशेष सन्मानानें परीक्षा पास झाली काय, मित्रांच्या संगतीचा विशेष उपयोग झाला काय, कोणते उत्कृष्ट ग्रंथ वाचनांत आले, तत्कालीन राजकीय परिस्थितीचा परिणाम आपणांवर कसा झाला, आयुष्याचें ध्येय कसें निश्चित झालें वगैरे अनेक प्रश्न मी विचारीत होतों.

सुदैवानें ज्यांच्या मुलाखती घेण्याची संधि मला लाभली त्या सर्वांनीं मला मोकळेपणानें माहिती पुरविली. यामध्यें त्यांची समाजाहितबुद्धीच दिसून येते, नाहीं का ? 'आपली मुलाखत मला घ्यावयाची आहे ' अशी विनंती करण्यास मी गेलों व ती नाकारली गेली असें अद्यापि झालेलें नाहीं. विद्यार्थिवर्गाची सेवा करण्याच्या माझ्या कल्पनेला महाराष्ट्रांतील मोठ्या माणसांनीं पाठिंबा दिला आहे हें मी माझें भाग्य समजतों. मुलाखती घेण्याच्या निमित्तानें या थोर व्यक्तींच्या सहवासाचा अपूर्व लाभ मला मिळाला आहे हें मी माझें महद्भाग्य मानतों. या सर्व थोर व्यक्तींचा मी अत्यंत ऋणी आहे.

या पुस्तकांत छापलेलीं सर्व चरित्र ' सह्याद्रि ' मासिकांत "महाराष्ट्रांतील कर्तबगार स्त्री-पुरुष " या लेखमालेंत डिसेंबर १९५५ ते सप्टेंबर १९५६ या काळांत प्रसिद्ध झालेलीं आहेत. सदर लेखमाला लिहिण्याच्या कामांत ' सह्याद्रि ' मासिकाचे कार्यकारी संपादक श्री. ल. ना. गोखले यांनीं मला प्रथमपासून उत्तेजन देऊन मार्गदर्शन केलें आहे. यामुळें प्रस्तुत पुस्तक पाहून श्री. गोखले यांना किती आनंद वाटेल याची मी कल्पना करूं शकतों. लेखांचें पुनर्मुद्रण करण्याची परवानगी दिल्याबद्दल 'सह्याद्री'च्या संपादकांचा मी आभारी आहें.

' सह्याद्रि ' मासिकांतील लेखमाला अद्यापि चालू आहे. स्वतंत्रपणेंहि मी कांहीं लेख तयार करीत आहें. सवडीनें ' महाराष्ट्राचे सपुत्र ' या

पुस्तकाचा दुसरा भाग वाचकांना सादर करतां येईल अशी आशा मी मनाशीं बाळगून आहें.

अर्थात्, 'व्हीनस प्रकाशन' या सुप्रसिद्ध प्रकाशन-संस्थेचे कार्यक्षम चालक श्री. सदाशिवराव पाध्ये यांचा हार्दिक पाठिंबा असल्यावर विद्यार्थि-वर्गाची सेवा करण्याचें माझें स्वप्न साकार होण्यास काय अडचण पडणार?

'सह्याद्री'मध्यें लेखमाला लिहिण्याची कल्पना सुचल्यापासून तों हें पुस्तक तयार होईपर्यंत माझ्या विचारांना योग्य दिशा प्राप्त होण्यासाठीं ज्या लेखकमित्रांचें मला विशेष साहाय्य झालें त्यांमध्यें 'कण आणि क्षण' या लोकप्रिय पुस्तकाचे लेखक श्रीयुत श्री. वा. काळे यांचा मला कृतज्ञतेनें उल्लेख केला पाहिजे.

विद्यार्थ्यांप्रमाणेंच प्रौढ वाचकांनाहि हें पुस्तक आवडेल अशी आशा मला वाटते. आपल्या मुलांना मार्गदर्शन करतांना पालकांना व शिक्षकांना या पुस्तकाचा उपयोग होईल अशीहि आशा करावीशी वाटते.

प्रस्तुत पुस्तकाची सजावट व छपाई आकर्षक होण्याच्या दृष्टीनें आनंद मुद्रणालयाचे व्यवस्थापक बंधुद्वय श्री. दादासाहेब व श्री. माधवराव जोशी आणि कामगारबंधु यांनीं जें बहुमोल सहकार्य दिलें आहे त्याबद्दल मी त्यांचा फार आभारी आहें. त्याचप्रमाणें चित्रकार श्री. व्ही. एस्. पाथरकर व चित्रकार श्री. व्ही. एन्. ओके यांचाहि मी आभारी आहें.

य. गो. नित्सुरे

* * *

# महाराष्ट्राचे सुपुत्र



परंतु एकाएकीं फारच अनपेक्षित गोष्ट घडून आली. सुप्रसिद्ध समाजसेवक महर्षि धोंडो केशव ऊर्फ अण्णासाहेब कर्वे हे सुटीमध्यें मुर्डीस आले. ते परांजप्यांकडेच उतरले. कारण रघुनाथाचे वडील म्हणजे अण्णासाहेबांचे मामा. अण्णासाहेब त्यावेळीं मुंबईत शिक्षक होते. रघुनाथाकडे पाहून त्यांच्या मनांत कांहीं निराळेच विचार येऊं लागले. अवघ्या नऊ वर्षांच्या या मुलाच्या डोळ्यांत अलौकिक बुद्धीचें तेज विलसत आहे हें त्यांनीं ताडिलें. रघुनाथाच्या वडिलांजवळ त्यांनीं कांहीं कानगोष्ट केली. नंतर रघुनाथाला विचारलें, ‘ येतोस का रे मुंबईस ? ’

मॅट्रिकपासून पदवीपरीक्षेपर्यंत पहिल्या वर्गांत पहिले येण्याचा बहुमान ज्यांनीं सतत मिळविला, केम्ब्रिजसारख्या सुप्रतिष्ठित विद्यापीठांतील गणित विषयामधील सर्वोच्च पदवी ज्यांनीं पहिल्या वर्गांत पहिले येऊन मिळविली व त्यामुळें महाराष्ट्रांतीलच नव्हे तर अखिल भारतामधील पहिले सीनिअर रँग्लर होण्याचा अपूर्व मान पटकावून ज्यांनीं आपल्या अलौकिक बुद्धिवैभवानें स्वबांधवांचा आदर वयाच्या अवघ्या तेविसाव्या वर्षी संपादन केला, नामदार गोखले यांच्यासारख्यांनीं ज्यांच्यावर फर्ग्युसन कॉलेजसारख्या प्रमुख शिक्षणसंस्थेचे प्राचार्य होण्याची जबाबदारी अवघ्या सव्विसाव्या वर्षीं सोपविली व ज्यांनीं हें धुरीणत्व १९०१ पासून १९२० पर्यंत उत्कृष्ट रीतीनें करून फर्ग्युसन कॉलेजची कीर्ति व परंपरा उज्ज्वल केली, १९२१ पासून पुढील तीन वर्षें मुंबई प्रांतांतील पहिले शिक्षणमंत्री म्हणून ज्यांनीं महत्त्वाची कामगिरी बजावली, लंडनमधील इंडिया कौन्सिलांतील सभासद म्हणून ज्यांची १९२७ सालीं नेमणूक झाली व पुढील पांच वर्षें ज्यांनीं ब्रिटिश राजकारणपटूंवरहि आपल्या मुत्सद्देगिरीची चांगली छाप पाडली, १९३२ मध्यें लंडनहून परत आल्याबरोबर ज्यांच्या दीर्घ अनुभवाचा लाभ आपल्या विद्यापीठाला मिळावा या भावनेनें ज्यांना लखनौ विद्यापीठानें व्हाईस चॅन्सेलर होण्यास आग्रहपूर्वक निमंत्रिलें व ज्या हुद्द्यावर त्यांनीं सतत सहा वर्षें यशस्वी रीतीनें काम केलें, १९४४ ते १९४७ पर्यंत भारताचे परराष्ट्रीय वकील म्हणून ज्यांनीं ऑस्ट्रेलियांत महत्त्वाची कामगिरी बजावली आणि त्यानंतरहि सांप्रत वयाला ऐशीं वर्षें पूर्ण झालीं असतांहि जे सार्वजनिक जीवनांतून निवृत्त न होतां अत्यंत उत्साहानें विविध प्रकारांनीं महाराष्ट्रीय जनतेची बहुमोल सेवा करीत आहेत......त्या रँग्लर रघुनाथ पुरुषोत्तम परांजपे यांचा परिचय युवक वाचकांना या लेखांत करून देण्याचा माझा बेत आहे.

कोंकणांतील दापोली तालुक्यांतील मुर्डी या लहानशा खेडेगांवांत १६ फेब्रुवारी १८७६ या दिवशीं जन्माला आलेल्या रघुनाथाचें वर्णन वरील परिच्छेदांत केल्याप्रमाणें लांबलचक व गौरवपूर्ण पद्धतीनें करावें लागेल असें त्याच्या आई-वडिलांना स्वप्नांतहि खरें वाटलें नसतें. मुर्डी हा किती

लहानसा गांव; किती दरिद्री गांव. त्यांतून ऐशीं वर्षांपूर्वींच्या मुर्डी गांवाचा विचार केला तर त्या गांवांतून अलौकिक बुद्धीचा एक मुलगा पुढें येऊन इंग्रजी राज्यकर्त्यांच्या सुप्रतिष्ठित विद्यापीठांत जाईल व तेथील परकीय विद्यार्थ्यांशीं सामना देऊन पहिला नंबर पटकावील असा अंदाज कोणालाच बांधतां आला नसता.

रघुनाथाच्या आईवडिलांच्या आपल्या मुलाच्या आयुष्यासंबंधीं कोणत्याच विशेष अशा अपेक्षा नव्हत्या. चारचौघां सामान्य मातापित्यांप्रमाणेंच ते विचार करीत होते. यामुळेंच कांहीं मोठ्या माणसांच्या आयुष्यावर बालपणीं मातेकडून किंवा पित्याकडून मिळालेल्या प्रभावी व सहेतुक मार्गदर्शनाचा परिणाम जसा दिसतो तसा परांजप्यांच्या आयुष्यांत दिसत नाहीं. रघुनाथ हा मातापित्यांचा पहिला मुलगा नव्हता; एकुलता एक चिरंजीवहि नव्हता किंवा शेंडेफळहि (म्हणजे अखेरचें अपत्यहि) नव्हता. तसें जर कांहीं असतें तर मग स्वाभाविकपणेंच आईबापांचें विशेष लक्ष मुलाच्या भवितव्याकडे लागणें शक्य झालें असतें. परंतु रघुनाथ हा आईचा सातवा पोटगोळा आणि त्याच्यानंतरहि त्या माउलीला सहा अपत्यें झालीं. या अशा मोठ्या व मुलांनीं गजबजलेल्या घरांत रघुनाथाच्या भवितव्यासंबंधीं कांहीं विशेष योजना आंखली जाईल अशी अपेक्षा करणें व्यर्थ होतें.

परंतु, कां कोणास ठाऊक, रघुनाथ हा वडिलांचा फार लाडका होऊं लागला. वडिलांसंबंधीं बोलतांना परांजपे एकदां मला म्हणाले, " माझे वडील वृत्तीनें फार धार्मिक होते. त्यांचा व्यवसाय शेतकऱ्याचा होता. आपलें काम बरें कीं आपण बरें, कोणाच्या अध्यांतमध्यांत पडायचें नाहीं असा त्यांचा स्वभाव होता. पैशाच्या दृष्टीनें ते मध्यम स्थितींतले होते. खाऊन पिऊन सुखी. पण शेती फार चांगली करीत. त्याबाबत त्यांचा गांवांत लौकिक होता. लहानपणीं मी वाडिलांबरोबर सारखा असें. त्यांचा मी फार लाडका झालों होतों. ते जें जें शिकवीत तें तें मी चटकन शिके. पांचव्या वर्षापासून मी घरांतील जमाखर्च लिहूं लागलों होतों. वडील नेमानें जमाखर्च लिहायचे. अजूनहि त्यांच्या जमाखर्चाच्या कांहीं वह्या आमच्या घरीं सांपडतील. अक्षर सुंदर होतें त्यांचें. त्यांच्यामुळेंच मला अक्षर चांगलें काढण्याची संवय प्रथम लागली. त्यांनीं माझ्या-

कडून बरेंच संस्कृत पाठान्तर करून घेतलें. त्यामुळें मुंजीपूर्वींच दोन वर्षें त्या काळांत मुंज झालेल्या मुलाचें असें इतकें माझें शिक्षण पुरें झालें होतें. मुंजीला उशीर होता व मुंज झाल्याशिवाय वेदपाठशाळेंतील शिक्षण मिळावयाचें नाहीं म्हणून त्यांनीं मला तात्पुरता शाळेंत घातला. मला भिक्षुक करावें अर्थात् दशग्रंथी विद्वान् करावें, त्यासाठीं आंजर्लें येथील नित्सुऱ्यांच्या प्रसिद्ध वेदशाळेंत पाठवावें असा त्यांचा बेत होता. इंग्रजी शिक्षणाकडे मी वळावें असा विचार त्यांनीं केलेला नव्हता."

परंतु एकाएकीं फारच अनपेक्षित गोष्ट घडून आली. सुप्रसिद्ध समाज-सेवक महर्षि धोंडो केशव ऊर्फ अण्णासाहेब कर्वे हे सुटीमध्यें मुर्डीस आले. ते परांजप्यांकडेच उतरले. कारण रघुनाथाचे वडील म्हणजे अण्णा-साहेबांचे मामा. अण्णासाहेब त्या वेळीं मुंबईत शिक्षक होते. ते प्रसिद्ध नव्हते; श्रीमंत नव्हते; वजनदार नव्हते. सामान्य माणूस होते. सामान्यां-पेक्षां वेगळें जीवन जगण्याची जबरदस्त प्रेरणा मात्र त्यांच्यांत उदित झालेली होती. मुंबईत राहून, इंग्रजी शिक्षण घेऊन, रानडे–भांडारकर आदि थोर मंडळींचें कार्य पाहून त्यांना एक नवी दृष्टि प्राप्त झालेली होती. रघुनाथाकडे पाहून त्यांच्या मनांत कांहीं निराळेच विचार येऊं लागले. अवघ्या नऊ वर्षांच्या या मुलाच्या डोळ्यांत अलौकिक बुद्धीचें तेज विलसत आहे हें त्यांनीं ताडिलें. रघुनाथाच्या वडिलांजवळ त्यांनीं कांहीं कानगोष्ट केली. नंतर रघुनाथाला विचारलें, "येतोस का रे मुंबईस ?" या प्रश्नाची जणू कांहीं आपण अपेक्षाच करीत होतों अशा आत्मविश्वासानें रघुनाथानें तोंडानें होकार दिला व टोपी डोक्यावर घालून प्रवासाची तयारी त्यानें पूर्ण केली.

काय अपूर्व योगायोग हा, नाहीं ? मी म्हणतों, परांजप्यांच्या आयुष्यां-तलाच नाहीं तर महाराष्ट्राच्या जीवनांतीलहि. अण्णासाहेब कर्वे त्या वर्षी मुर्डीस गेले, त्यांना ही कल्पना सुचली, त्यांनीं आपल्या मामांजवळ प्रश्न काढला, त्यांनाहि हा नवा बेत पटला व म्हणूनच रघुनाथाला इंग्रजी शिक्षणाचा लाभ मिळूं शकला आणि फर्ग्युसन कॉलेजचे प्राचार्य होऊन शेंकडों नव्हे हजारों तरुणांना नवविद्या देण्यासाठीं त्यांना आपलें जीवन शिक्षणदानाच्या पवित्र कार्यांस वाहतां आलें. परांजपे हे जुन्या पद्धतीचे

वेदविद्यासंपन्न ब्राह्मण झाले असते तर कदाचित् त्यांनीं त्या विषयांतहि आपली चमक दाखविलीच असती. पण अस्ताला चाललेल्या सूर्याची प्रभा होऊन होऊन कितीशी प्रभावी ठरणार ? इंग्रजी नवविद्येच्या उगवत्या सूर्याची तेजस्वी प्रभा अधिक प्रखर होण्यासाठीं परांजप्यांसारख्या अलौकिक बुद्धिसत्तेच्या व्यक्तीचा हातभार लागूं शकला, या योगायोगाचें श्रेय द्यावयाचेंच झालें तर तें त्यांचे आतेभाऊ अण्णासाहेब कर्वे यांनाच द्यावें लागेल.

इंग्रजी शिक्षणाची सुरुवात झाल्यापासून रघुनाथाच्या मनोरचनेंत झपाट्यानें फरक पडूं लागला. प्रयोग म्हणून प्रथमतः एक-दोन वर्षें मुरूड व दापोली येथील विद्यालयांत शिक्षणासाठीं ठेवल्यानंतर त्याला कर्वे यांनीं १८८८ च्या सुरुवातीस मुंबईस आणलें. मुंबईस आल्यापासून तर रघुनाथाच्या जीवनांत आमूलाग्र क्रांति झाली. अण्णासाहेब कर्वे यांच्यासारख्या विशुद्ध चारित्र्याच्या व अखंड धडपड करणाऱ्या व्यक्तीचा नित्य सहवास आणि राजारामशास्त्री भागवत यांच्यासारख्या नामवंत व विद्वान् मुख्याध्यापकाचें मार्गदर्शन यांमुळें रघुनाथाची महत्त्वाकांक्षा जागृत झाली. प्रत्येक वर्गांत व प्रत्येक विषयांत पहिला नंबर येऊं लागल्यानें सर्वांकडून प्रोत्साहन मिळूं लागलें. अर्थात् गुरुजनांच्या व नातेवाइकांच्या अपेक्षाहि वाढल्या. मॅट्रिकच्या परीक्षेंत हा मुलगा कसें यश मिळवितो याकडे सर्वांचे डोळे लागले. त्याचा पहिला नंबर आल्याचें जेव्हां जाहीर झालें तेव्हां त्याच्या आई-वडिलांना, कर्व्यांना, राजारामशास्त्री भागवतांना किती आनंद झाला असेल याची कल्पनाच केलेली बरी.

परंतु मॅट्रिकच्या या निकालासंबंधीं एका विशेष कारणामुळें आपणाला स्वतःला कशी धाकधूक वाटत होती याची एक मजेदार आठवण, जुन्या गोष्टींसंबंधीं बोलणें निघालें तर परांजपे सांगतात. ती गोष्ट अशी :

भूमितीचा पेपर अवघ्या दीड तासांत संपवून आपली उत्तरपत्रिका ते पर्यवेक्षकांच्या स्वाधीन करूं लागले. पर्यवेक्षक ती घेईनात. ते गृहस्थ म्हणाले, " अरे, इतक्या लवकर पेपर कशाला देतोस ? सर्व उदाहरणें सोडव व मग दे. " परांजपे उत्तरले, " मी शंभरपैकीं शंभर गुण

मिळतील इतकीं उदाहरणें सोडवलीं आहेत. आतां विनाकारण मंडपांत बसून काय उपयोग ? " येवढें बोलणें झाल्यावर पर्यवेक्षकांनीं उत्तर-पत्रिका ठेवून घेतली व परांजपे बाहेर पडले. घराकडे जाण्यासाठीं ते गिरगांवांत कांदेवाडी नाक्यावर आले तर तेथें त्यांना साठे या नांवाच्या आपल्या मित्राचे वडील भेटले. या गृहस्थांनीं रघुनाथाला " तूं आत्तां इथें कसा, परीक्षेला बसला नाहींस का ? " असें विचारलें. रघुनाथाने घडलेली हकीगत सांगितली. त्यावर ते सद्‌गृहस्थ म्हणाले, " इतक्या लवकर उत्तर-पत्रिका देण्यांत तूं चूक केलीस. इतक्या लवकर दिलेली उत्तरपत्रिका इकडे तिकडे पडून गहाळ होण्याचा संभव असतो. एकाच उत्तरपत्रिकेचें रक्षण पर्यवेक्षकाकडून होणें कठीण असतें. " त्या गृहस्थांचे हे अनुभवी बोल ऐकून परांजपे यांना चुटपूट लागून राहिली आणि ही चुटपूट निकाल लागायच्या दिवसापर्यंत टिकून राहिली होती. अखेरीस निकाल लागल्या-नंतर त्यांचा जीव भांड्यांत पडला !

मॅट्रिक झाल्यानंतर पुढें कोणत्या कॉलेजांत जावयाचें हा प्रश्नच पडला नाहीं. योगायोगानें तो सुटला होता. कारण परांजपे मॅट्रिक झाले त्याच सुमारास अण्णासाहेब कर्वे यांची नेमणूक पुण्याच्या फर्ग्युसन कॉलेजांतील गणिताचे प्राध्यापक म्हणून झालेली होती. त्यांच्याबरोबर परांजपेहि पुण्यास आले. परांजपे यांच्या जीवनांतील हा योगायोगहि लक्षांत घेण्यासारखा आहे. जर कर्वे यांची पुण्यास फर्ग्युसन कॉलेजांत नेमणूक होती ना तर परांजपे यांचें शिक्षण मुंबईसच होऊन कदाचित् त्यांच्या जीवनाला निराळेंच वळण लागलें असतें. जर परांजपे मुंबईस शिकते, नामदार गोखले आदि पुण्यांतील मंडळींच्या परिचयांत विद्यार्थिदशेंत न येते, तर ते आज जसे ' डेक्कन एज्युकेशन सोसायटी 'चे आजीव सेवक म्हणून स्वार्थत्यागाचें आयुष्य जगलेले दिसतात तसे दिसते ना. कदाचित् ते आय्. सी. एस्. होऊन अधिक श्रीमंत झाले असते; परंतु त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला आज जें बहुरंगी स्वरूप आलेलें दिसतें तें मात्र दिसलें असतें कीं नाहीं याची शंका वाटते. असो; परंतु व्यक्तीच्या हातीं नसलेले असे कांही बरे-वाईट योगायोग माणसाचें जीवन घडवीत असतात हेंच खरें !

अर्थात् वरील विधानाचा अर्थ असा घ्यावयाचा नाहीं कीं माणसाचें जीवन संपूर्णतः योगायोगांच्या अधीन असतें. उलट, मोठ्या माणसांच्या आयुष्यांतील योगायोग पाहिले कीं, आपणाला असेंच दिसतें कीं स्वतःच्या प्रयत्नांनीं वाईट योगायोगांतील आनिष्टपणा त्यांनीं कमी केलेला असतो आणि चांगल्या योगायोगांतील इष्टपणा वाढविलेला असतो. परांजपे यांच्या जीवनचरित्रापासून हाच बोध घेण्यासारखा आहे. स्वतःला दैवयोगें प्राप्त झालेल्या सुयोगांचा भरपूर उपयोग करण्यांत त्यांनीं कधींच कसूर केलेली नाहीं. जी संधि येईल ती घ्यायची व तिचा पुरेपूर उपयोग करायचा असा विद्यार्थिदशेपासून परांजप्यांचा बाणा असे.

फर्ग्युसन कॉलेजांत नांव घातल्यानंतर परांजपे हे मानसिक, शारीरिक व बौद्धिक अशा सर्व बाजूंनीं झपाट्यानें विकसित होऊं लागले. प्रत्येक परीक्षेत त्यांचा पहिला नंबर येत गेल्यानें त्यांच्यासंबंधीं विद्यार्थिवर्गात कुतूहल पसरूं लागलें. ते अभ्यास कसा करतात, ते अवांतर वाचन कोणतें करतात वगैरे बाबींसंबंधीं जो तो त्यांना विचारूं लागला. असें कोणीं विचारलें तर अगदीं मनमोकळेपणानें परांजपे स्वतःसंबंधीं सांगत. गर्वाची भावना त्यांना कधींच शिवली नाहीं. 'स्कॉलर' विद्यार्थी म्हटला कीं त्यानें इतरांशीं फटकून वागलेंच पाहिजे अशी कांहीं हुशार परंतु शिष्ट विद्यार्थ्यांची समजूत असते. परांजपे याला अपवाद होते. आजचे, येवढी मानमान्यता संपादन केलेले परांजपेहि इतर कांहीं लब्धप्रतिष्ठित पुढाऱ्यांशीं तुलना केली तर अपवादच वाटतात. पुण्यांतील रस्त्यांतून पायींपायीं जातांना ते पुणेकरांना जवळजवळ रोज दिसतात. आपल्या अनेक गरीबगुरीब नातेवाइकांकडे ते अधूनमधून आस्थेनें जाऊन त्यांची विचारपूस करीत असतात. त्यांच्या घरीं तुम्ही गेलांत तरी एका सर्वसामान्य मध्यमवर्गीय महाराष्ट्रीय माणसाच्या घरांत आपण गेलों आहोंत असेंच तुम्हांला वाटेल. तापट, गर्विष्ठ व अहंकारी स्वभाव किंवा आपण सामान्यांपेक्षां चालण्या–बोलण्या-वागण्यांतहि श्रेष्ठ आहोंत असें पदोपदीं दाखविण्याची घमेंडी वृत्ति, या कांहीं मोठ्या माणसांजवळ सांपडणाऱ्या गोष्टी, परांजपे यांच्याजवळ आजहि सांपडणार नाहींत. जसे ते विद्यार्थिदशेंत होते तसेच ते आजहि साधे, मनमोकळ्या स्वभावाचे व निगर्वी आहेत.

आजच्या विद्यार्थ्यांनाहि परांजपे त्या वेळीं अभ्यास कसा करीत, अवांतर वाचन वगैरे कसें करीत याविषयीं माहिती करून घेणें बहुधा आवडेल. म्हणून त्याबद्दल परांजपे यांच्याच शब्दांत थोडक्यांत सांगतों. ते सांगतात, "मी अभ्यास पुष्कळ करीं. त्यांत कधीं कसूर केली नाहीं आणि तोहि अगदीं पहिल्या दिवसापासून करीत असें. कॉलेजच्या पहिल्या परीक्षेला मुंबईला गेलों तेव्हां येतांना पुढील परीक्षेचीं पुस्तकेंच बरोबर घेऊन आलों. पुढेंहि मी तीच प्रथा ठेवली. सुट्टयांचा उपयोग अभ्यासासाठीं करीं. वर्गांत जातांना आधीं वाचून जाई. त्यामुळें प्रोफेसरांचा विषय पूर्ण समजे. वर्गांत मी नोटस् घेई. या माझ्या नोटस् फार व्यवस्थित असत. माझें अक्षर चांगलें असे. त्यामुळें लोक म्हणत, छापून काढाव्यात अशा यांच्या नोटस् आहेत. माझ्या या चांगल्या अक्षराचा फायदा मला प्रत्येक परीक्षेंत झाला. विद्यार्थ्यांचें अक्षर चांगलें असलें तर परीक्षकाचें मत एकदम अनुकूल होतें. केम्ब्रिजमध्येंहि माझ्या अक्षराची तेथील प्राध्यापकांनीं वारंवार तारीफ केली. मी वाचन खूप करीत असें. जें पुस्तक परीक्षेला नेमलेलें असेल त्याच्या अनुरोधानें मी अधिक वाचीत असें. इतरहि मीं खूप वाचलें. डार्विन, मिल्, स्पेन्सर यांचीं पुस्तकें वाचण्याची गोडी मला मॅट्रिकच्या आधींच लागली. तेव्हांपासून मी 'टाइम्स' वाचीत असें. 'केसरी' व 'सुधारक' हीं पत्रेंहि नियमित वाचीत असें. माझे सर्वच विषय चांगले असत. एखादा विषय मला जमत नाहीं असें केव्हांच झालें नाहीं. खेळण्यांत मी फार पुढें नसे. पण माझा खेळ बराच वरच्या दर्जाचा असे. विशेषतः टेनिस मी चांगला खेळें. हाच खेळ वयाच्या अठ्ठावन्न वर्षांपर्यंत मीं नियमितपणें खेळलों. फूटबॉलहि मला आवडे. क्रिकेट मात्र मी फार खेळलों नाहीं. पण मला पाहायला फार आवडे. दिवसभर सारखा अभ्यास करीत राहणें हें मला कधींच जमलें नाहीं. प्रथमपासून अभ्यास करण्याची संवय मला असल्यानें परीक्षा जवळ आल्यानंतरहि मी कधीं रात्रीं फार जागलों नाहीं. वर्गांतला अभ्यास कधीं मागें न पडूं देण्याच्या संवयीमुळेंच मला केंब्रिजला गेल्यावरहि कधीं रोज सात-आठ तासांपेक्षां अधिक अभ्यास करावा लागला नाहीं. विद्यार्थी असतांना -काय किंवा प्रौढपणीं काय माणसाच्या जीवनांत दिवसभर केवळ काम नसावें. प्रथम-

पासून व व्यवस्थितपणें काम करून कामाचा बोजा वाढविला नाहीं म्हणजे करमणुकीसाठींहि प्रत्येकाला वेळ उरतो. विद्यार्थिदशेंत पहांटे उठणारा असा मी कधींच नव्हतों. रात्रीं साडेदहा–अकरापर्यंत अभ्यास करायचा व सकाळीं सहा वाजतां उठायचें असा माझा कार्यक्रम असे. केंब्रिजला जवळपास तसाच असे. ”

बी. एस्‌सी.च्या परीक्षेंतहि उज्ज्वल यश मिळाल्यानें परांजप्यांचा पुढील शिक्षणाचा मार्ग सुकर झाला. फर्ग्युसन कॉलेजांत ते 'फेलो' झाले. पुढील वर्षी भारत सरकारची शिष्यवृत्ति मिळाल्यानें ते केंब्रिजला गेले आणि त्यापुढील त्यांचें यश चढत्या कमानीनें कसें वाढत गेलें याचें धावतें वर्णन या लेखाच्या पहिल्या परिच्छेदांत वाचकांना वाचावयास मिळालेलें आहेच. 'विद्यार्थि-दशा हा पायाभरणीचा काळ असतो ' या विधानाची सत्यता परांजपे यांच्या जीवनयशाकडे पाहिल्यानंतर संपूर्णपणें पटते.

परांजपे यांच्या जीवनक्रमाचा आलेख ( graph ) काढल्यास त्यांची सुयशरेषा सतत वरवर गेलेलीच आढळून येते. त्यांच्या आयुष्यांतील कर्तबगारी अत्यंत मोठी असूनहि त्यांची महाराष्ट्रांतील लोकप्रियता केवळ सुशिक्षित समाजापुरतीच बहुशः मर्यादित राहिली आहे. पण हें जें असें झालें आहे याचें कारण परांजप्यांची पात्रता कमी आहे हें नसून लोक-प्रियतेसाठीं लोकानुनय करण्याची वृत्ति त्यांच्यांत कमी आहे हेंच आहे. परांजपे हाडाचे गणितज्ज्ञ आहेत. एक, दोन, तीन म्हटलें कीं एक, दोन, तीनच समजलें पाहिजे असें त्यांचें काटेकोर गणित असतें. परंतु त्यांची ही निर्भीडता, ही बुद्धिवादी निष्ठाच, त्यांचा हा बाणेदारपणाच परांजप्यांना लोकप्रियतेच्या शिखरावर चढविण्याच्या आड आलेला आहे. पण त्याची खंत त्यांना मुळींच वाटत नाहीं. “ जें पटेल तें बोलेन व जें बोलेन तें करीन ” अशी त्यांची आगरकरी निष्ठा आहे. निर्भीड बुद्धिवादाचा महाराष्ट्रांतील खंदा पुरस्कर्ता म्हणून त्यांची आठवण पुढील पिढीलाहि खात्रीनें राहील.

१७ एप्रिल १९५६ पासून रँग्लर परांजपे यांची पुणें विद्यापीठाच्या उपकुलगुरुपदीं एकमतानें निवड झाली आहे. डॉ. जयकरांसारख्या कुशल व कर्तबगार व्यक्तीच्या कारकीर्दीनंतर रँ. परांजपे यांच्यासारख्या अनुभवी

व नामवंत शिक्षणतज्ज्ञाच्या हातीं पुणें विद्यापीठाचीं सूत्रें सोपविण्यांत आली आहेत, हा योगायोग अपूर्व आहे. ज्या वयांत सामान्यतः इतर माणसांना कोणतेंच नवें काम स्वीकारण्याचें धाडस होत नाहीं त्या वयांत एका नव्यां कार्यांचा वाढता व्याप सांभाळण्यासाठीं परांजपे पुढें सरसावले आहेत हें त्यांच्या ध्येयवादी मनःप्रवृत्तीचें उज्ज्वल गमक मानलें पाहिजे. त्यांची कारकीर्द यशस्वी होऊन पुणें विद्यापीठ हें सामान्य जनतेपर्यंत ज्ञान, विज्ञान व बुद्धिवाद यांचा फैलाव करणारें एक प्रभावी माध्यम होईल व त्यामुळें महाराष्ट्राच्या सामाजिक, आर्थिक व राजकीय प्रगतीला नवी दिशा व नवा जोम प्राप्त होईल असा विश्वास वाटतो.

*विद्यार्थ्यांनीं अभ्यास नियमितपणें, वेळच्या वेळीं, व मन लावून केला तर त्यांस नापास होण्याची भीती नाहीं.*

[illegible]



*तेरा–चौदा वयाच्या मुलामधील या गंभीर व वैराग्यशाली प्रवृत्ति लोकविलक्षण नाहींत असें कोण म्हणेल ! ज्या वयांत मुलें हूडपणें वागत असतात त्या वयांत दत्तूनें सुखदुःखाची मीमांसा करून प्रत्येक बाबीचा व घटनेचा खोलवर विचार करण्यास सुरवात करावी हें विलक्षणच समजलें पाहिजे... इतिहासाचार्य राजवाडे यांचें लिखाण मनःपूर्वक वाचण्याची दत्तूला प्रेरणा होऊं लागली. जों जों तो राजवाड्यांचें लिखाण वाचूं लागला तों तों हे गृहस्थ आपल्याच मनांतील विचार शब्दरूप करीत आहेत असा अनुभव त्याला येऊं लागला.*

बाळाजी बाजीराव, खंडो बल्लाळ, चिमाजी आप्पा इत्यादि मराठेशाहीतील पराक्रमी राष्ट्रसेवकांप्रमाणेंच सद्यःकालांतहि आडनांव न लिहितां ज्या कर्तबगार लोकसेवकाचें नांव महाराष्ट्रभर सर्वश्रुत झालेलें आहे त्या ' दत्तो वामनां 'ची ओळख करून घेण्यासाठीं आज आपणांस त्यांच्या पुण्यांतील राहत्या घरीं जावयाचें आहे.

दत्तो वामनांकडे जावयाचें म्हणजे शनिवारवाड्याच्या भिंतींचें दर्शन घेऊनच आपल्याला जावें लागणार आहे. तशी ओंकारेश्वराच्या देवळाच्या बाजूनें दुसरी वाट आहे. पण ती माझ्या आवडीची वाट नाहीं. जेव्हां जेव्हां मी दत्तो वामनांकडे जातों, तेव्हां तेव्हां याच शनिवारवाड्याच्या रस्त्यानें जातों. वाटेंत त्या पराक्रमी वास्तूच्या अजस्र अवशेषांना मनांतल्या मनांत अभिवादन करतों आणि नदीच्या अंगानें जाणाऱ्या बोळाकडे माझी सायकल वळवितों.

हें पाहा आलेंच त्यांचें घर. घरावरचें नांव वाचलेंत का? ' लोककल्याण '! किती अन्वर्थक नांव आहे, नाहीं? लोकांच्या कल्याणासाठीं ज्या ठिकाणीं अहोरात्र खटपट चालते, त्या वास्तूला लोककल्याण हें नांव किती शोभून दिसतें, नाहीं?

काय म्हणालांत? आपण आधीं कांहींच पत्र न पाठवतां जात आहोंत हें चालेल ना? मित्रहो, कांहीं काळजी करूं नका त्याची. दत्तो वामनांकडे जायला आधीं ' अपॉईंटमेंट ' कोणालाच घ्यावी लागत नाहीं. पहांटेपासून मध्यरात्रीपर्यंत ' लोककल्याणा 'चे दरवाजे उघडेच असतात. अर्थात् आधीं ' अपॉईंटमेंट ' घेण्याचा उपयोग नसतो असें मात्र समजूं नका. व्यवस्थित माणसाजवळ दत्तो वामन फार व्यवस्थित रीतीनें वागतात. त्यांच्या डाव्या किंवा उजव्या हाताजवळ, कागदपत्रांच्या ढिगाऱ्यांतून डोकें वर काढीत असलेली एक छोटीशी डायरी असते. त्यांत त्यांनीं कित्येक 'अपॉईंटमेंटस्'च्या नोंदी केलेल्या असतात. आपण जर आधीं पत्र पाठविलेलें असलें तर आपल्या येण्याची नोंद त्यांच्या डायरींत नक्की झालेली असते. परंतु आधीं वेळ ठरवून एखाद्याला जरी अर्धा-एक तास उशीर झाला तरी दत्तो वामन त्याला फैलावर घेतील असें मुळींच समजूं नका. ' या, बसा ' करीत ते त्याचेंहि नेहमींप्रमाणें दिलदारपणेंच स्वागत करतील. कांहीं विशेष

अडचणीमुळें एकदां मला त्यांच्याकडे जायला 'अपॉईंटमेंट'च्या वेळेपेक्षां दहापंधरा मिनिटें उशीर झाला. तेव्हां आंत जातांच मीं त्यांना म्हटलें, "मला थोडा उशीर झाला याबद्दल क्षमा करा." त्यावर ते एकदम म्हणाले, "होऊं द्या हो. चालायचंच; आम्ही काय हातावर घड्याळ बांधून बसलों आहोंत?" दत्तो वामनांच्या या उत्तरांत त्यांच्या स्वभावांतील गुणदोषांचें यथोचित प्रतिबिंब पडलेलें आहे.

दत्तो वामनांच्या व्यक्तिमत्त्वाची घडण कांहींशा लोकविलक्षण पद्धतीनेंच झालेली आहे. तसें पाहिलें तर त्यांच्या बालपणच्या गृहपरिस्थितींत कोणताच जगावेगळेपणा नव्हता. आई व वडील या दोघांचीहि माया त्यांना लाभलेली होती. आईबापांचे ते पहिलेच चिरंजीव असल्यानें त्यांचे लाडहि बहुधा भरपूर झाले असावेत. वडिलांची सांपत्तिक परिस्थिति एकंदरीनें पाहतां बऱ्यापैकीं होती. ते त्या काळांतहि पदवीधर झालेले होते. त्यामुळें त्यांच्या कुटुंबाला समाजांत मान्यताहि असावी. या अशा सर्व बाबींचा विचार मनांत आणल्यावर दत्तो वामनांच्या बाळपणच्या परिस्थितींत कांहीं न्यूनता होती असें कोणी समजेल असें वाटत नाहीं. चारचौघां मध्यमवर्गीय बुद्धिजीवी कुटुंबांप्रमाणेंच त्यांच्या घरांतील परिस्थिति होती असें समजायला कोणतीच हरकत नाहीं.

परंतु गृहपरिस्थितीपेक्षांहि समाजस्थितीचा अधिक प्रभाव दत्तो वामनांवर पडला असावा असें दिसतें. वडिलांचें ऐकण्यापेक्षां स्वतःचा हेका म्हणून कांहीं तरी चालवावा असें वयाच्या तेरा—चौदा वर्षांपासूनच दत्तूला वाटूं लागलें असावें. समजायला लागल्यापासूनच दत्तू पुण्यांत वाढला होता. त्याचा जन्म जरी कोंकणांत झाला असला व वयाचीं पहिलीं सहा—सात वर्षें जरी तो मुंबईत वाढला असला तरी त्याचा मनःपिंड खऱ्या अर्थानें पुण्यांतील वातावरणांतच पोसला होता. १८९० सालीं दत्तूचा जन्म झाला व १८९६ सालीं तो पुण्यास आला. त्या सालापासून पुढील दहा—बारा वर्षांतील पुण्यांतील वातावरण किती प्रक्षोभक व चळवळीचें होतें याची कल्पना ज्यांनीं त्यासंबंधींचीं वर्णनें एखाद्या पुस्तकांत वाचलीं असतील त्यांनाच येऊं शकेल. ज्यांना उत्सुकता असेल त्यांनीं कै. न. चिं. केळकर-

कृत ' टिळकचरित्रा 'चा पहिला खंड वाचून पाहावा. १८९६ सालापासून प्लेगनें पुण्यांत कहर केला होता. ' ब्यूबॉनिक प्लेग ' ( गांठीचा ताप ) या नांवाचा भयंकर प्लेग पुण्यांतील नागरिकांना सळो का पळो करून सोडीत होता. दररोज शेकड्यांनीं माणसें मरत असत. या प्लेगसंबंधीं केव्हांहि बोलणें निघालें तरी दत्तो वामनांचा आवाज नेहमींपेक्षां एकदम कोरडा होतो. कर्तव्य म्हणून एखाद्या अप्रिय गोष्टीबद्दल बोलावें तसें ते सांगतात, " तुम्हां नवीन पिढींतील मंडळींना त्या भयंकर आपत्तीची कल्पना येणेंहि कठीण आहे. पण माझं सारं बालपणच प्लेगांत गेलं आहे. प्लेगमुळें चार-पांच वर्षे माझी शाळा बुडालेली आहे. गांवाबाहेर आम्ही झोपडींत राहायला जात असूं. गांवांत राह्यची सोयच नसे. एके वर्षी मृत्यूची संख्या दररोज तीनशें नव्याण्णव झाली होती. प्रेतें वाहण्यासाठीं माणसें मिळायला मुष्कील पडे. प्रेतें बांधायला सामान पुरेनासें होई. बांबूला प्रेतें टांगून नेलेलीं मीं पाहिलीं आहेत. कित्येक घरें एकेका दिवसांत—एकेका तासांत—निर्मनुष्य होत असत. बाप, आई, मुलं सारेजण पटापट मरून पडत. सकाळीं भेटलेला मित्र दुपारीं भेटेल अशी शाश्वती नसे. भयंकर प्लेग होता तो. तशांत चाफेकरांनीं रँडसाहेबाचा खून केला. त्यामुळें गोऱ्या पोलिसांचा ससेमिरा सर्वत्र चालू झाला. मी वयानें लहान होतों त्या काळांत. पण पुण्यांतील या साऱ्या घडामोडींचे संस्कार माझ्या मनावर तीव्रतेनें होत होते. असं म्हणायला मुळींच हरकत नाहीं कीं, त्या भयंकर प्लेगनें माझ्या भावी आयुष्यावर बराच खोलवर परिणाम केला आहे. "

गेल्या महायुद्धाच्या काळांत शत्रूच्या बॉंबहल्ल्यांना तोंड द्यावें लागलेल्या शहरांत वाढलेल्या मुलांच्या मनावर कोणते परिणाम झाले असतील याची थोडीशी कल्पना दत्तूच्या कोवळ्या मनावर झालेल्या भीषण परिणामांवरून वाचकांना करतां येतील. भावी आयुष्यासंबंधींचीं सुखस्वप्नें रंगविणें हा तेरा—चौदा वयाच्या मुलांच्या मनाचा स्वाभाविक चाळा असतो. परंतु, प्लेगमधून होरपळून निघालेला दत्तू अकालीं गंभीर होऊन स्वतःच्या सुखाविषयीं उदासीन होत चालला होता. " या जगांत स्वतःच्या सुखासंबंधींचे बेत रचून माणसाला फारसा लाभ होत नाहीं " अशा कांहीं तरी चमत्कारिक निर्णयाला तो आलेला होता. आसपासच्या नातेवाइकांसंबंधीं,

मित्रमंडळींसंबंधीं किंवा भौतिक सुखांसंबंधीं आकर्षण वाटावें असा त्याचा स्वभाव बनत चालला नव्हता. इतरांशीं जरा तुटकपणें किंवा भावना-निरपेक्ष वृत्तीनें वागावें अशीच त्याची धारणा होत होती. एकंदरीनें जगांत सुखापेक्षां दुःखच जास्त आहे अशी त्याची पक्की समजूत झाली होती. यामुळेंच तो अंतर्मुख बनत जाऊन प्रत्येक बाबीसंबंधीं—अगदीं लहान बाबी-संबंधींहि खोलवर विचार करूं लागला होता.

तेरा—चौदा वयाच्या मुलामधील या गंभीर व वैराग्यशील प्रवृत्ति लोक-विलक्षण नाहींत असें कोण म्हणेल! ज्या वयांत मुलें हूडपणें वागत असतात त्या वयांत दत्तूनें सुखदुःखाची मीमांसा करून प्रत्येक बाबीचा व घटनेचा खोलवर विचार करण्यास सुरुवात करावी हें विलक्षणच समजलें पाहिजे. व्यक्तीच्या भावी आयुष्यावर त्याच्या सभोंवतालच्या परिस्थितीचा किती निर्णायक परिणाम होतो याचें एक उदाहरण म्हणून दत्तो वामनांच्या आयुष्याकडे बोट दाखवितां येईल. आईबाप चांगले असणें किंवा एखाद्या शिक्षकाचें किंवा नातेवाइकाचें मार्गदर्शन मिळणें यामुळें व्यक्तीच्या आयुष्याची दिशा पूर्णपणें बदलून जाते. रँग्लर परांजपे यांच्या जीवनचरित्रांत आपण या प्रकारचा परिणाम पाहिला आहे हें वाचकांना आठवत असेलच. त्यांचे आतेभाऊ महर्षि कर्वे यांच्या प्रोत्साहनामुळें परांजप्यांचें सर्व आयुष्य बदलून गेलें आहे. पोतदारांच्या आयुष्यावर असा कोणत्याच व्यक्तीचा प्रभाव पडलेला आढळत नाहीं.

मॅट्रिकच्या वर्गांत असल्यापासूनच ‘ माझें मी पाहून घेईन ’ असा एक आत्यंतिक स्वावलंबी बाणा दत्तूमध्यें प्रकट होऊं लागला होता. अभ्यासा-कडे त्याचें बेताचेंच लक्ष असे—किंबहुना दुर्लक्षच असें, असें म्हटलें तरी तें चुकणार नाहीं. वडील जर त्याला म्हणाले कीं, ‘ दत्तू अभ्यास कर ’ तर त्याचें एक उत्तर ठरलेलें असायचें. तो म्हणायचा, “ परीक्षेंत मी पास होईन. माझी काळजी करूं नका. ” एकदां परीक्षांसंबंधीं बोलणें निघालें तेव्हां दत्तो वामन मला म्हणाले, “ पेपर लिहून झाला कीं मी त्या पेपरांत मला किती मार्क प्रश्नागणिक पडतील याचा अंदाज करीत असें; आणि हा माझा अदमास केव्हांहि चुकला नाहीं. ” पण मुलाचें एकंदर वागणें पाहून

ह्यानें पुढें शिकूं नये असें दत्तूच्या वडिलांना वाटलें असावें. पण दत्तूनें कॉलेजांत जाण्याचा हट्ट धरला व वडिलांनीं त्याचा हट्ट मंजूर केल्यामुळें १९०७ सालीं त्यानें फर्ग्युसन कॉलेजांत नांव घातलें.

कॉलेजांत गेल्यावर दत्तूच्या विचारशील बुद्धीला व्यापक क्षेत्र लाभलें. अवांतर वाचन खूप करावें, समवयस्कांशीं नानाविध विषयांवर चर्चा करावी आणि पुष्कळदां स्वतःशींच विचार करीत तासन् तास घालवावेत असा दत्तूचा आवडता कार्यक्रम झाला होता. स्वातंत्र्यवीर सावरकरादि क्रांतिकारक प्रवृत्तीच्या मंडळींचा प्रत्यक्षाप्रत्यक्ष सहवास दत्तो वामनांना लाभला. परंतु क्रांतिकारकांच्या साक्षात् छायेंत मात्र ते कधींच गेले नाहींत. यासंबंधीं बोलतांना दत्तो वामन मला म्हणाले, " विद्यार्थिदशेपासून माझा स्वभाव भडक वागण्याचा नाहीं. कोणत्याहि प्रश्नाची ही बाजू ती बाजू, मी त्या काळांतहि काळजीपूर्वक अभ्यासीत असे. क्रांतिकारक होण्यासाठीं जसा भावनाप्रधान स्वभाव लागतो तसा माझा नाहीं." आपण कसें आहों व कसें नाहीं याचें त्रयस्थानें करावें तसें मर्मभेदक वर्णन करण्याची अद्भुत शक्ति दत्तो वामनांजवळ आहे. स्वतःच्या स्वभावाविषयीं, बुद्धिमत्तेविषयीं किंवा गुणांविषयीं फुगवून सांगावें अशी आपणांपैकीं अनेकांची प्रवृत्ति असते. दत्तो वामनांइतका स्वतःविषयीं बोलण्याचा प्रांजळपणा इतर माणसांत क्वचितच आढळतो.

त्या काळच्या कोणत्याहि राजकीय नेत्यांच्या छापेखालीं न जातां दत्तोपंत विद्यार्थिदशा पार पाडूं शकले ही गोष्ट खरोखरीच विशेष मानली पाहिजे. परीक्षेंतील उच्च यशाच्या पाठीमागें धांवणारे स्कॉलर विद्यार्थी समकालीन राजकीय पक्षांच्या व पुढाऱ्यांच्या प्रचाराला बळी पडत नाहींत यांत आश्चर्य नाहीं. पण समाजस्थितीचा जागरुकतेनें विचार करणारा दत्तो वामनांसारखा तल्लख बुद्धीचा विद्यार्थी पक्षीय प्रचारापासून व पुढाऱ्यांच्या विभूतिपूजेपासून अलिप्त राहूं शकला ही गोष्ट आजच्या विद्यार्थ्यांनाहि अनुकरणीय वाटली पाहिजे. पोतदारांच्या विचारांत व आचारांत आज जीं विलोभनीय वैशिष्ट्यें दिसतात त्यांचा उगम, प्रवाहपतित न होण्याच्या या प्रवृत्तींत असला पाहिजे. वास्तविक, त्यांच्या काळांत तीन तुल्यबळ पक्ष व

त्यांचे प्रभावी नेते विद्यार्थ्यांना आपापल्या गोटांत ओढण्यासाठीं झटत असत. एका बाजूला लोकमान्य टिळकांचा पक्ष होता, दुसऱ्या बाजूला नामदार गोखल्यांचा गट होता आणि तिसऱ्या बाजूला 'काळ'कर्ते परांजपे, सावरकर यांचा क्रांतिकारक पंथ होता. पण या तिहेरी ओढाताणीमध्येंहि आपलें डोकें शांत ठेवून दत्तूनें सर्वांमधील चांगलें तेवढें उचलून घेण्याची किमया करून दाखविली, हें आजच्या युवकवर्गाला अत्यंत स्फूर्तिदायक असें उदाहरण समजलें पाहिजे.

वर निर्देश केलेल्या तीन पक्षांत जरी दत्तू सामील झाला नाहीं, तरी देशसेवेसाठीं आपलें आयुष्य अर्पण करण्याचा निश्चय मात्र त्यानें स्वतःशीं ठामपणें केला होता. देशांतील परिस्थितीची चिकित्सा शक्य तितक्या मूलग्राही पद्धतीनें करून नंतर आपलें कार्यक्षेत्र निश्चित करावयाचें असा त्याचा हट्ट होता. यामुळें कॉलेजांत आल्यापासून आपल्यासारखे विचार करणारे कोणी इतर विद्यार्थी व बाहेरील ज्येष्ठ मंडळी आहेत काय याच्या शोधांत तो नेहमीं राहत असे. दत्तूच्या मोकळ्या स्वभावामुळें व ध्येयवादी विचारांमुळें त्याच्याभोंवतीं विद्यार्थ्यांचा गट लवकरच जमला. पण ज्येष्ठ माणसांपैकीं विशेष कोणाकडेच दत्तू आकर्षिला जाईना. नाहीं म्हणायला एका व्यक्तीचा अपवाद सांगतां येईल. ती व्यक्ति म्हणजे सुप्रसिद्ध इतिहाससंशोधक विसूभाऊ राजवाडे ही होय.

इतिहासाचार्य राजवाडे यांची व दत्तूच्या वडिलांची ओळख होती, हा दत्तूच्या आयुष्यांतील सुयोगच मानला पाहिजे. राजवाडे व दत्तूचे वडील डेक्कन कॉलेजांत सहाध्यायी होते आणि पुढें कांहीं वर्षें पुण्यांत एकाच वाड्यांत ते राहत असत. राजवाड्यांचा पहिला खंड प्रसिद्ध झाला तेव्हां त्या पुस्तकाचे गठ्ठे दत्तूच्या वडिलांच्या घरींच पडलेले होते. याप्रमाणें राजवाड्यांचा थोडाफार प्रत्यक्ष सहवास लाभल्यानें बेभान होऊन अहोरात्र इतिहास-संशोधनांत रममाण होणाऱ्या राजवाड्यांचें कर्तृत्व दत्तूसारख्या महत्त्वाकांक्षी युवकाला मनापासून आवडावें यांत आश्चर्य वाटण्यासारखें कांहीं नाहीं. राजवाडे जो रस्ता चालत गेले आहेत तोच आपण स्वतःसाठींहि मुक्रर करावा असें दत्तूनें ठरविलें असावें. राजवाड्यांचें लिखाण मननपूर्वक

वाचण्याची दत्तूला प्रेरणा होऊं लागली. जों जों तो राजवाड्यांचें लिखाण वाचूं लागला तों तों हे गृहस्थ आपल्याच मनांतील विचार शब्दरूप करीत आहेत असा अनुभव त्याला येऊं लागला. कॉलेज-शिक्षणासंबंधीं राजवाड्यांच्या मनांत विशेष प्रीति नव्हती. दत्तूला हा विचार साहजिकच आवडला. जगांत स्वतंत्र कर्तृत्व गाजविण्यासाठीं सर्वसंगपरित्याग करण्याची तयारी ठेवली पाहिजे, हाहि राजवाड्यांचा विचार दत्तूच्या हृदयापर्यंत जाऊन भिडला. 'जें जें मराठी आहे व स्वदेशी आहे त्याचा कट्टर अभिमान बाळगला पाहिजे' ही राजवाड्यांची सांगी तर त्याला विशेषच प्रिय झाली. आणि या सर्वांपेक्षांहि महत्त्वाचें म्हणजे राजवाडे यांची संशोधनावरील निष्ठा दत्तूनें ब्रीदवाक्यासारखी जपली.

सार्वजनिक कार्यांत पुढाऱ्यांना मुद्दाम पठ्ठे तयार करावे लागत नाहींत. पुढाऱ्यांचें व्यक्तिमत्त्व व कार्य यांचे ठसे युवकमनावर कळत-नकळतपणें उठत असतात आणि त्यांतूनच समान मनःप्रवृत्ति व विचारप्रवृत्ति असणारे बुद्धिमान् व त्यागी युवक आपापले मार्ग निवडीत असतात.

राजवाड्यांच्या मार्गानें दत्तू जाणार हें लक्षांत आल्यानंतर त्याच्या आप्तेष्टांना कांहींसा धक्काच बसला असणार. कारण राजवाडे यांना लोक 'विलक्षण', 'चक्रम्', 'नादिष्ट' आदि विशेषणें लावीत असत. परंतु दत्तूनें जरी राजवाड्यांचा मार्ग घेतला, तरी राजवाड्यांमधील भडक दोष टाळण्यांतहि त्यानें बरेंच यश संपादिलें आहे असें आतां म्हटलें पाहिजे.

१९१० ते १९१५ हीं वर्षे दत्तोपंतांच्या आयुष्यांत विशेष अडचणीचींच गेलीं. जीवनांत स्वतंत्र मार्ग चोखाळण्याचा प्रयत्न करणाऱ्या व्यक्तीचा खरा कसोटीचा काळ वयाच्या विशीपासून पुढील पांच-दहा वर्षे असतो असें म्हणतात. या नियमाला दत्तो वामन अपवाद कसे असतील ?

संशोधक व्हायचें हा निश्चय करणें जरी सोपें होतें तरी तो प्रत्यक्ष अमलांत आणणें कठिण होतें. १९१० मध्यें राजवाड्यांसमवेत पुण्यांत 'इतिहास-संशोधन मंडळ' स्थापण्यांत दत्तूनें हातभार लावला होता. परंतु कवि जसा कवितांच्या भेंडोळ्यावर जगत नाहीं तसा इतिहास-संशोधकहि बखरींच्या व जुन्या कागदपत्रांच्या गठ्ठयावर उदरनिर्वाह करूं शकत नाहीं. ध्येयवादी तरुणाच्या आयुष्यांत सर्वांत कठिण प्रश्न कोणता उभा राहत

असेल तर तो आर्थिक स्वावलंबनाचा होय. इतरांचें मिंधें होऊन समाजसेवा करण्यानें समाजसेवेंतील अर्धाअधिक आनंद लुप्त होत असतो. यामुळेंच दत्तोपंतांच्या पुढें पदवीधर झाल्यापासून पुढील सात-आठ वर्षें आपलें आर्थिक आसन आपल्या संशोधनाच्या कार्याला पूरक होईल अशा पद्धतीनें स्थिर कसें करायचें हा प्रश्न प्रामुख्यानें होता.

योगायोगानें व कांहींशा प्रयत्नानें त्यांचा हाहि प्रश्न सुटला. शिक्षकाचा पेशा आपल्याला योग्य होईल असें त्यांना आढळून आलें. महाराष्ट्रांतील लोकसेवकांच्या कित्येक पिढ्यांमध्यें ही गोष्ट आढळते. शिक्षकाचा पेशा हा त्यांना उपकारकच ठरलेला आहे. फुले, चिपळूणकर, टिळक, आगरकर, गोखले, कर्वे आदि सर्व समाजसुधारकांनीं शिक्षकाचा पेशा आपखुशीनें स्वीकारलेला आढळतो.

दत्तो वामनांचे मराठी शाळेपासूनचें सर्व शिक्षण पुण्यांतील 'नूतन मराठी विद्यालय' या सुप्रसिद्ध शाळेंत झालें होतें. त्याच शाळेंत त्यांनीं शिक्षकाची नोकरी धरली. पुढें त्याच शाळेतर्फे चालविण्यांत येणाऱ्या 'न्यू पूना कॉलेजांत'त (सध्यांच्या सर परशुरामभाऊ कॉलेजांत) ते प्राध्यापक म्हणूनहि शिकवूं लागले. कित्येक वर्षें ते नू. म. वि. चे मुख्याध्यापक होते. त्यांची ही कारकीर्द फार गाजली. ते विद्यार्थ्यांचे अत्यंत आवडते शिक्षक म्हणून प्रसिद्धि पावले.

५ ऑगस्ट १८९० हा दत्तो वामनांचा जन्मदिवस. १९१० मध्यें त्यांनीं भाग घेण्यास प्रारंभ केलेल्या इतिहास-संशोधनाच्या कार्यानें आज प्रचंड रूप धारण केलें आहे. इतिहास-संशोधनांतील त्यांच्या महत्त्वपूर्ण व मूलगामी कर्तबगारीमुळेंच सरकारनें त्यांना 'महामहोपाध्याय' ही बहुमोल पदवी अर्पण केलेली आहे. ज्या 'शिक्षण प्रसारक मंडळी'चे आजीव सेवक म्हणून त्यांनीं वीस वर्षें निष्ठापूर्वक काम केलें त्या संस्थेचीं सर्व शिक्षणकेंद्रें आज भरभराटींत आहेत. सध्यां दत्तो वामन, विविध समारंभांचे अध्यक्ष म्हणून युवकवर्गाला मुख्यतः परिचित आहेत. सर्व पक्षांच्या मंडळींना प्रिय वाटणारा असा हा लोकसेवक 'प्रपंच-संकोचा'च्या तत्त्वानें आतापर्यंत वागत आला आहे हें किती युवकांना माहीत आहे

कोणास ठाऊक ! ‘ प्रपंच-संकोच ’ हा शब्दहि वाचकांना नवीन वाटेल; परंतु नवीन शब्द वापरणें हा दत्तो वामनांचा खाक्या आहे. अहोरात्र सार्वजनिक कार्य करणाऱ्यानें प्रपंचाची जबाबदारी घेतां कामा नये ही रामदासी शिकवणूक त्यांनीं आचरणांत आणली आहे. पण रामदासी छाटी घालून त्यांनीं आपल्या निवृत्तिपरतेची जाहिरात केलेली नाहीं, हें लक्षांत ठेवलें पाहिजे. अशा रीतीनें कालमान ओळखून वागणारा हा त्यागी इतिहासज्ञ भावी कालांतहि महाराष्ट्राला महत्त्वाच्या प्रसंगीं निर्भीडपणें मार्ग-दर्शन करील अशी खात्री बाळगण्यास कोणती हरकत आहे ?

श्री

भाद्रपद शु. १४।१८७८

तुम्ही माणूस असलांत तरी
भारतीय आहां
आणि
भारतीय असलांत तरी
माणूस आहां

तुमच्यासारखा एक
गरीब मराठा

दत्तो वामन पोतदार

७७ शनिवार
‘लोककल्याण’ पुणे २
अनंतचतुर्दशी
१८।९।५६



पाहिला पेपर संपवून मी हॉलच्या बाहेर आलों. एका तासानें दुसरा पेपर होता. सुटीच्या वेळांत गार पाण्यानें हातपाय धुऊन यावें व नंतर पुढच्या पेपरच्या नोटस् चाळाव्या असा विचार मी करीत होतों. इतक्यांत मी समोर पाहिलें. तों प्रोफेसर मुखर्जी उभे! मी लगेच पुढें होऊन त्यांना नमस्कार केला. तेव्हां त्यांनीं मला पहिला पेपर कसा गेला तें विचारून माझ्यापुढें एक डबा धरला. 'हें काय?' मी म्हटलें. 'ही तुझ्या सुटींतील खाण्याची व्यवस्था' मुखर्जींचें हें शब्द ऐकून माझ्या डोळ्यांत पाणी उभे राहिलें.

१९५६ च्या जानेवारीच्या पहिल्या तारखेची सायंकाळ. ' केसरी 'ला पंचाहत्तर वर्षे पूर्ण झाल्यामुळें डॉ. बाबासाहेब जयकर यांच्या अध्यक्षतेखालीं गायकवाडवाड्याच्या पटांगणांत ' अमृत–महोत्सव ' समारंभ साजरा होत होता. समारंभ सुरू होऊन दहा-पंधरा मिनिटें झालीं होतीं. इतक्यांत श्रोत्यांचें लक्ष प्रवेशद्वाराजवळ चाललेल्या थोड्याशा हालचालीनें वेधून घेतलें. आम्ही सर्वजण तिकडे पाहूं लागलों. तेवढ्यांत माझ्या पलीकडेच बसलेले एक गृहस्थ उत्साहानें उभे राहून प्रवेशद्वाराकडे पाहत म्हणाले, ' लोकनायक अणे आले. ' क्षणभर माझा त्या उद्गारांवर विश्वासच बसेना. ' लोकनायक आले ? कसें येतील ? ते तर अंथरुणाला खिळलेले आहेत ' अशा विचारांनीं माझ्या मनांत गर्दी केली. तितक्यांत श्री. ज. स. करंदीकर ध्वनिवर्धकावरून म्हणाले, " लोकनायक बापूजी अणे आले आहेत. " तात्यासाहेब करंदीकरांचे ते शब्द कानावर पडत असतांनाच बापूजींचें दर्शन आम्हांला घडूं लागलें. स्ट्रेचरवरून त्यांना आणलें जात होतें. हृदय हेलावणारें दृश्य होतें तें. टाचणी पडली तरी ऐकूं येईल अशी गूढ शांतता सर्वत्र पसरली. हळूहळू तें स्ट्रेचर चालत चालत आमच्यासमोरून गेलें. लोकनायकांचें स्पष्ट दर्शन मला घडलें. तीच लाल पगडी, तोच मुद्रेवरील भाव कीं जो १९३८ सालापासून–मी शाळेंत असतांना त्यांना प्रथम पाहिलें तेव्हांपासून–मी अनेकदां पाहिला होता. पुण्याला बापूजी आले कीं, त्यांचें व्याख्यान व्हावयाचेंच आणि त्या वेळीं मी हजर राहिलों नाहीं असें क्वचितच झालें असेल. आज त्यांना स्ट्रेचरवरून आणतांना पाहून पूर्वीं सभास्थानीं ऐटीनें येणारी बापूजींची प्रसन्न मूर्ति माझ्या डोळ्यांपुढें ठळकपणें येऊं लागली.

व्यासपीठाजवळच त्यांचें स्ट्रेचर ठेवण्यांत आलें. पुनः सभेचें काम सुरू झालें. जरा वेळानें डॉ. जयकरांनीं घोषणा केली, " आजचा योग अपूर्व आहे. बापूजी चार शब्द बोलणार आहेत. " बापूजींपुढें ध्वनिवर्धक नेण्यांत आला. सभेंत पुनः उत्कटता वाढली. माझ्या शेजारचे एक गृहस्थ म्हणाले, " कशाला त्यांना बोलण्याचा त्रास देतां ? " इतक्यांत बापूजी अगदीं खणखणीत आवाजांत–जवळपास पूर्वींसारख्याच आवाजांत–बोलूं लागले. ते म्हणत होते, " मला राहवेना म्हणून मी आलों. मी आज

गुरुगृहीं आलों आहें. लोकमान्य माझे गुरु—केसरी माझा गुरु. त्यांच्या पुण्याईनेंच मला थोडीफार देशसेवा करतां आली. आज मी आजारी असलों तरी येण्याइतपत अवस्थेंत असतांना हा अपूर्व समारंभ साजरा होत आहे—मग मी घरीं कसा थांबूं ? ” आणि मग त्यांनीं आणखी पांच-दहा मिनिटें भाषण करून ‘केसरी’चे अभीष्टचिंतन केलें, पण यानंतरच्या भाषणाकडे माझें फारसें लक्ष नव्हतें. माझें लक्ष त्यांच्या वर दिलेल्या प्रास्ताविक उद्गारांनींच खेचून घेतलें होतें. मी मनांत म्हणत होतों, ‘ हा पुरुष खरा मोठ्या मनाचा, दिलदार प्रवृत्तीचा, कोमल हृदयाचा. हेव्या-दाव्यांनीं भरलेल्या, वादविवादवितुष्टांनीं बरबटलेल्या राजकारणासारख्या क्षेत्रांत अहोरात्र चाळीस-पंचेचाळीस वर्षें हिंडूनहि आज हा पुरुष आपल्या गुरुवरील निर्व्याज प्रेम कृतज्ञभावानें व्यक्त करण्यासाठीं, व्याधिजर्जर अवस्थेंत अंथरुणाला खिळून पडला असतांनाहि येथें येतो ही अपूर्व गोष्ट आहे. आज शहात्तरावें वर्ष चालू असलेल्या या थोर पुरुषाचें आजचें हें वर्तन तरुणपिढीला अनेक दृष्टींनीं नमुना म्हणून वाटेल यांत शंका नाहीं.

लोकनायक बापूजी ऊर्फ माधव श्रीहरि अणे यांचा जन्म वऱ्हाडांतील वणी या लहानशा गांवीं २९ ऑगस्ट १८८० रोजीं झाला. बापूजींचे वडील श्री. हरिभटजी ऊर्फ भाऊजी अणे हे वेदशास्त्रसंपन्न पंडित होते. पण भिक्षुकी हा त्यांचा पोटाचा उद्योग नव्हता. व्यवसायानें ते शेतकरी होते. त्यामुळें कोणाचेंहि मिंधें न राहतां त्यांचा विद्याव्यासंग आमरण चालू राहिला. भाऊजींच्या घरांतली सांपत्तिक परिस्थिति कधींच विशेष सुधारली नाहीं. परंतु त्या मानी ब्राह्मणास त्याची पर्वा नव्हती. मोठमोठ्या विद्वत्सभांतून व यज्ञयागांतून भाग घेण्यासाठीं त्यांना लांबलांबच्या गांवीं जावें लागे. यामुळें त्यांच्या घराण्याचा लौकिक वाढण्यास मदत झाली असणार हें उघड आहे. त्याबरोबरच त्यांच्या प्रवासाचा व अन्य शहरांतील मंडळींच्या सहवासाचा आणखी एक लाभ त्यांना झाला असावा. तो म्हणजे इंग्रजी विद्येकडे पाहण्याची त्यांची दृष्टि बदलली. नाहींतर, वणी-सारख्या लहान गांवांत राहून आपल्या मुलांना शेतकरी किंवा भिक्षुक बनवावें हीच आकांक्षा त्यांनीं पोटीं धरली असती. परंतु त्याऐवजीं त्यांनीं

आपल्या मुलांना इंग्रजी विद्या देण्याचा संकल्प केला. यामुळेंच बापूजींचें मराठी शिक्षण वणीला पूर्ण होतांच त्यांना मिड्ल स्कूलच्या शिक्षणासाठीं वऱ्हाडांतील चांदा या गांवीं धाडण्याचा निर्णय भाऊजींनीं ठरविला.

मुलाला चांद्याला धाडण्याचा निर्णय करतांना भाऊजींची व त्यांच्या पत्नीची मनःस्थिति कशी झाली असेल याची कल्पनाच केलेली बरी. विशेषतः बापूजींच्या आईचा जीव किती वेळां खालीं-वर झाला असेल! त्या माउलीच्या मनांत असेंहि आलें असेल कीं, हा दहा-अकरा वर्षांचा मुलगा बाहेरगांवीं राहायला जाऊन बिघडला नाहीं म्हणजे मिळविलें! कारण तिला माहीत होतें कीं, मुलगा एकदां चांद्याला गेला कीं, तो पुनः लवकर परत येणार नाहीं. शिक्षणाची शिडी अशी गमतीदार असते कीं, महत्त्वाकांक्षी व हुशार विद्यार्थी ती चढूं लागला कीं, त्याचा पाय वरवरच खेचला जातो आणि प्रत्यक्षांत पुढें झालेंहि तसेंच. १८९३ च्या सुमारास बापूजींनीं शिक्षणासाठीं जें घर सोडलें तें पुढें तब्बल पंधरा वर्षेपर्यंत त्यांना पुनः घरीं (सुटीचा काळ सोडून) परत येतां आलें नाहीं. १९०८ सालींहि एल्एल्. बी. पास झाल्यावर ते जेव्हां वणीला आले तेव्हांहि तेथें दिवाणी कोर्ट नसल्यानें त्यांना वणीला रामराम ठोकून यवतमाळास स्थायिक होण्यास जावें लागलें; म्हणजे पुढील शिक्षण घेण्याच्या निमित्तानें त्यांना जी एकदां वणी सोडावी लागली ती कायमचीच! कोणीं सांगावें? भविष्यकाळांतील या घटनांचें पुसटसें चित्र बापूजींच्या आईवडिलांच्या डोळ्यांपुढें त्यांना चांद्याला पाठवितांना कदाचित् येऊन गेलें असेलहि.

'आपला हा मुलगा शिकला, इंग्रजी विद्येनें विभूषित झाला कीं आपल्या घराण्याचा कायापालट होईल' असा अंदाज त्या वेदशास्त्रपंडितानें हेरला असावा. आपल्या घराण्यांतील मंडळींनीं जुन्या काळांत जसें पुढारीपण मिळविलें आहे तीच परंपरा नव्या काळांतहि या मुलानें पुढें चालवावी अशी महत्त्वाकांक्षा भाऊजींच्या मनांत वावरत होती असें दिसतें. पैसे मिळवून धनराशींत लोळण्यापेक्षां विद्वत्ता संपादून किंवा लोकसेवा करून समाजांत मानसान्यता मिळविणें हेंच ध्येय आपल्या मुलानें डोळ्यांपुढें ठेवावें असें त्यांना वाटत होतें. यामुळेंच आपल्या मुलाला परगांवीं पाठवून त्यांनीं त्याचें सर्व शिक्षण पार पाडलें; इतकेंच नव्हे तर वकील

झाल्यावर जेव्हां तो टिळकभक्त बनून परकीय सरकारचा रोष अंगावर ओढवून घेऊं लागला तेव्हां त्यांनीं मुलाला पाठिंबाच दिला. या त्यांच्या धैर्यशाली स्वभावाचें सक्रिय उदाहरण सांगायचें म्हणजे असें कीं, १९०९ सालीं देशभक्तीचें शासन म्हणून बापूजींची वकिलीची सनद जेव्हां सरकारनें एका वर्षासाठीं रद्द केली तेव्हां भाऊजींनीं असे उद्गार काढले कीं, " सरकार फार तर तुझी सनद घेईल; पण ज्या बुद्धिबळाच्या जोरावर तूं ही सनद मिळविलीस त्याला तर तें धक्का लावूं शकत नाहीं ना? " वडिलांचा एवढा मनोमन पाठिंबा असलेला, ब्रिटिश राजवटींतील जहाल राजकारण खेळणारा बापूजींसारखा भाग्यवान् पुढारी क्वचितच आढळतो.

आई-वडिलांचे आशीर्वाद घेऊन बापूजी जेव्हां चांद्याकडे जायला निघाले तेव्हां त्यांच्याजवळ एक महत्त्वाचें पाथेय म्हणजेच वाटेंतल्या प्रवासासाठीं घेतलेली शिदोरी होती. ही शिदोरी म्हणजे आई-वडिलांनीं त्यांच्या मनावर केलेले उत्कृष्ट संस्कार होत. सुसंस्कारांची ही शिदोरी विद्यार्थिदशेंतच बापूजींना उपकारक झाली असें नव्हे, तर आजहि ती त्यांना उत्साहवर्धक व मार्गदर्शक ठरत आहे. यामुळेंच आई-वडिलांसंबंधींच्या आठवणी निघाल्या कीं, आजचे बापूजीहि कृतज्ञतेनें बोलूं लागतात. ' चांद्याला जाण्यापूर्वीं मला जे उत्कृष्ट संस्कार लाभले त्यांमुळेंच माझ्या आयुष्यांतील अनेक अडचणींना मी तोंड देऊं शकलों ' असें ते सांगतात. त्यांचे वडील १९१४ सालीं वारले, परंतु आईच्या मायेचें छत्र त्यांना १९३१ सालापर्यंत लाभलें.

आई-वडिलांच्या संस्कारांनीं त्यांना जी मुख्य गोष्ट दिली ती म्हणजे स्नानसंध्यादि नित्यकर्मांवरील निष्ठा ही होय. आजच्या पिढींतील युवकांना या कर्मनिष्ठेचें मर्म सहजासहजीं लक्षांत येणें कठीण आहे. जातीय संकुचित भावना किंवा सनातनी कर्मठ आचार यांचा स्पर्श होऊं न देतांहि उत्कृष्ट कर्मनिष्ठा माणसाच्या प्रगतीला किती उपकारक ठरते याचें प्रत्यंतर पाहण्यासाठीं बापूजींच्या जीवनाचा अभ्यास करणें इष्ट आहे. स्नानसंध्या, जप, पठण यांच्या नियमित आचरणामुळें बापूजींच्या मनाला जो कणखरपणा

प्राप्त झाला आहे त्याचा उपयोग त्यांना आयुष्यभर झालेला आहे; इतकेंच नव्हे तर, त्याचा उपयोग त्यांच्या सध्यांच्या बिकट आजारपणांत तर त्यांना विशेषच होत आहे. कर्मनिष्ठेच्या प्रखर आग्रहाबद्दल बापूजींची तुलना त्यांच्या काळांतील नामांकित पुढारी व बनारस विद्यापीठाचे संस्थापक पंडित मदन मोहन मालवीय यांच्याशींच करतां येईल. एवढें मात्र निश्चित कीं, लहानपणींच मुलाच्या अंगांत मुरविलेल्या या कर्मनिष्ठेच्या शिस्तीमुळेंच त्याला शिक्षणासाठीं परगांवीं पाठवितांना भाऊजींना संपूर्णपणें निर्धास्त वाटत होतें.

मिडल् स्कूलच्या शिक्षणासाठीं चांद्याला बापूजी सुमारें तीन वर्षें राहिले. या काळांत त्यांना केशवराव बक्षी या नांवाच्या एका नाणावलेल्या शिक्षकांचें मार्गदर्शन लाभलें. केशवराव बक्षी हे स्वभावानें ममताळू व इंग्रजी शिकविण्यांत निष्णात होते. त्यांच्या शिक्षणपद्धतीची आठवण बापूजी अजूनहि कृतज्ञभावानें काढीत असतात. चांगले शिक्षक लाभणें हें खरोखरीच दैवाधीन असतें. परंतु बापूजींचें दैव या बाबतींत सतत अनुकूल राहिलें असें दिसतें. चांद्याला केशवराव बक्षी जसे भेटले तसेच हायस्कूल व कॉलेजशिक्षणासाठीं नागपूरला गेल्यावर त्यांना एकापेक्षां एकेक सवाई असे विद्वान्, सुस्वभावी व कर्तबगार गुरु भेटले. त्यांपैकीं श्री. केशवराव जोशी, महामहोपाध्याय प्रिन्सिपॉल केशवरावजी ताह्मन, प्रो. मुखर्जी, प्रो. रॉय वगैरे कांहीं मंडळींचीं नांवें बापूजींच्या तोंडांत अनेकदां येतात. त्यांच्याबद्दल बोलतांना बापूजी एकदां मला म्हणाले, "हीं माणसें म्हणजे पगारी, पोटार्थी शिक्षक नव्हते. आम्हां विद्यार्थ्यांचे ते खरेखुरे मार्गदर्शक होते. यांपैकीं एकेका प्रोफेसराच्या गोष्टी सांगितल्या तर आजच्या पिढीचा त्यावर कदाचित् विश्वास बसणार नाहीं. त्या वेळचे शिक्षक विद्यार्थ्यांसंबंधीं किती आपुलकी बाळगीत याची एक गोष्ट सांगतों. मी मॉरिस कॉलेजमध्यें असतांना प्रो. प्रियानाथ मुखर्जी आम्हांला पदार्थविज्ञान हा विषय शिकवीत. बी. ए. झाल्यावर पुढें पांच वर्षांनीं म्हणजे १९०७ सालीं कलकत्ता विद्यापीठाच्या एल्‌एल्. बी. परीक्षेला बसण्यासाठीं मी कलकत्त्यास गेलों होतों. त्या वेळीं मुखर्जींनीं नागपूरची नोकरी सोडली असल्यामुळें ते कलकत्त्यांत होते. त्यांना मी

भेटलों. त्यांनीं मला सर्व मदत केली. इतकेंच नव्हे तर त्यानंतर मला परीक्षेच्या पहिल्या दिवशीं आश्चर्याचा धक्का दिला! पहिला पेपर संपवून मी हॉलच्या बाहेर आलों. एका तासानें दुसरा पेपर होता. सुटीच्या वेळांत गार पाण्यानें हातपाय धुऊन यावें व नंतर पुढच्या पेपरच्या नोट्स् चाळाव्या असा विचार मी करीत होतों. इतक्यांत मीं समोर पाहिलें तों प्रोफेसर मुखर्जी उभे! मीं लगेच पुढें होऊन त्यांना नमस्कार केला. तेव्हा त्यांनीं मला पाहिला पेपर कसा गेला तें विचारून माझ्यापुढें एक डबा धरला. 'हें काय?' मीं म्हटलें. 'ही तुझ्या सुटींतील खाण्याची व्यवस्था.' मुखर्जींचे हे शब्द ऐकून माझ्या डोळ्यांत पाणी उभें राहिलें. ते म्हणत होते, 'मला माहीत आहे कीं तूं हॉटेलांतलं खाणार नाहींस आणि येथें परक्या गांवीं तुला घरचा डबा कोण देणार? म्हणून मी आलों.' मुखर्जींचें हें प्रेम पाहून माझ्या मनाची कशी अवस्था झाली असेल याची कल्पनाच करा." ही आठवण सांगत असतांना बापूजींचे डोळे ओले झाले व कंठ दाटून आला. त्यांना पुढें बोलवेना. घोगऱ्या आवाजांत ते म्हणाले, "असे असत आमच्या वेळचे शिक्षक. त्यांनींच आम्हांला घडविलें."

परंतु मुलांच्या जीवनाचें व्यापक व सर्वस्पर्शी ध्येय ठरवून देण्याच्या बाबतींत आईबापांचा किंवा शाळा-कॉलेजांतील शिक्षकांचा पूर्णतः उपयोग होतोच असें नाहीं. बापूजींच्या बाबतींत तो जवळजवळ झालाच नाहीं असें म्हटलें तरी चालेल. शिक्षक व आई-बाप यांच्याकडून त्यांना ज्ञान व चारित्र्य पुरेपूर मिळालें; परंतु स्वतःच्या जीवनाचें ध्येय मात्र बाहेरच्या एका लोकोत्तर व्यक्तीकडून त्यांना मिळालें—ही लोकोत्तर व्यक्ति कोण हें चाणाक्ष वाचकांनीं एव्हाना ओळखलेंच असेल.

लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांचें प्रत्यक्ष दर्शन होण्यापूर्वींच, केवळ त्यांचे 'केसरीं'तील लेख वाचूनच, बापूजींनीं त्यांचें शिष्यत्व पत्करलें होतें. १८९७ सालीं लोकमान्यांवर राजद्रोहाचा खटला होऊन त्यांना अठरा महिन्यांची सक्तमजुरीची शिक्षा झाली होती. या घटनेमुळें सारा महाराष्ट्र, सारा भारत हादरून गेला होता. त्या वेळीं बापूजी नागपूरच्या नील सिटी

हायस्कूलमध्यें मॅट्रिकच्या वर्गांत शिकत होते. बापूजींसारख्या संवेदनशील तरुणाचें हृदय लोकमान्यांच्या या अपूर्व त्यागामुळें हेलावून गेलें असल्यास नवल नाहीं. 'केसरी'मधील लेख वाचून मातृभूमीच्या विमोचनार्थ आपणहि कांहींतरी त्याग करावा असें त्यांना वाटूं लागलें होतेंच. त्यामुळें लोकमान्य तुरुंगांतून सुटल्यावर त्यांना एकदां पाहावें म्हणून बापूजींना तीव्र इच्छा उत्पन्न झाली. तो योग १९०२ सालीं त्यांनीं महत्प्रयासानें घडवून आणला. नागपुरांतील सर्व विद्यार्थ्यांतर्फेच लोकमान्यांचें स्वागत करण्याचें ठरलें. कलकत्ता कॉंग्रेसहून परततांना १९०२ च्या जानेवारींत लोकमान्य नागपुरास उतरले. बापूजींचें स्वप्न साकार झालें ! त्यांचें अमूर्त ध्येय प्रत्यक्षांत अवतरलें ! !

लोकमान्यांनीं त्या वेळीं नागपूरच्या विद्यार्थ्यांसमोर जें व्याख्यान दिलें तें एका विशेष कारणासाठीं प्रसिद्ध आहे. त्या कारणाचा सहज जातां जातां उल्लेख करतों. तें कारण असें कीं, या व्याख्यानांत त्यांनीं 'संस्कृत वाङ्मय व पाश्चात्य तत्त्वज्ञान' यासंबंधीं जो ऊहापोह केला त्यांतच त्यांनीं **'गीतारहस्य'** या ( मंडालेच्या सहा वर्षांच्या तुरुंगवासांत पुढें लिहिलेल्या ) अलौकिक ग्रंथांतील तत्त्वज्ञान सूत्ररूपानें प्रथम मांडलें होतें. या बाबीचा उल्लेख गीतारहस्याच्या प्रस्तावनेंत लोकमान्यांनींच करून ठेवला आहे.

लोकमान्यांच्या प्रत्यक्ष दर्शनामुळें बापूजींचें टिळकप्रेम वाढीला लागलें. या टिळक-प्रेमांतूनच भारतसेवेचें व्रत त्यांनीं घेतलें. सरकारी नोकरी न करतां शिक्षक किंवा वकील होऊन आपलें आयुष्य देशसेवेसाठीं अर्पण करावयाचें असा निश्चय त्यांनीं केला. ऐन विशींत असतांना आपल्या भावी आयुष्याचें ध्येय निश्चित करणारीं माणसें विरळाच होत.

बापूजींचें लक्ष बाहेरील घटनांनीं, ध्येयांनीं व पुढाऱ्यांनीं खेचून घेतल्यामुळें त्यांना परीक्षेंतील यशाचें महत्त्व कमी वाटूं लागलें. या कारणामुळें त्यांना कॉलेजांत असतांना एकूण दोन वेळां नापास व्हावें लागलें ! शिक्षक व्हावयाचें का वकिली करावयाची यासंबंधीं प्रयोग करीत करीत निर्णय करावा लागल्यामुळें त्यांची विद्यार्थिदशाहि १९०८ सालापर्यंत, म्हणजे वयाच्या अठ्ठाविशीपर्यंत, लांबत गेलेली दिसते. परंतु बापूजींच्या विद्यार्थिदशेबाबत एक गोष्ट मात्र आपण विसरतां कामा नये. ती अशी कीं,

परीक्षेंतील उच्च यशाकडे जरी बापूजींचें लक्ष नव्हतें तरी ते उनाड विद्यार्थी नव्हते. व्यासंगी व हुशार विद्यार्थी म्हणून त्यांचा लौकिक होता. तत्त्वज्ञान, धर्म व संस्कृत हे त्यांच्या विशेष आवडीचे विषय होते. या विषयांचें त्यांचें वाचन त्या काळांतहि विद्यापीठानें नेमलेल्या पाठ्य-पुस्तकांच्या पलीकडे गेलेलें असे. परीक्षेंत आधिक मार्क मिळवून त्यांना सरकारी नोकरी मागावयाची नव्हती. पण पुढील सार्वजनिक कार्यासाठीं त्यांना विद्वत्ता जरूर हवी होती. याबाबत टिळकांचा आदर्श त्यांच्यापुढें होताच.

मीं वर म्हटलेंच आहे कीं, शिक्षक व्हायचें का वकिली करायची याबाबत प्रयोग करण्यांत बापूजींचीं कांहीं वर्षें गेलीं. १९०४ ते १९०८ या कालांत बापूजींनीं अमरावतीला शिक्षकाचें काम केलें. परंतु नंतर वकील होणें आधिक इष्ट होईल असें त्यांना वाटलें. म्हणून त्यांनीं कलकत्त्यास जाऊन वकिलीची परीक्षा दिली व लगेच सनद काढून यवतमाळास वकिली सुरू केली.

यवतमाळास स्थायिक झाल्यापासून बापूजींचा सार्वजनिक कार्याचा व्याप वाढत गेला. 'यवतमाळ जिल्हा असोसिएशन'च्या द्वारा त्यांनीं धडाडीनें केलेलें कार्य हळूहळू लोकमान्यता पावत गेलें. लो. टिळक मंडालेहून सुटून आल्यावर बापूजींनीं होमरूल लीगच्या द्वारा वऱ्हाडांत मोठेंच कार्य केलें. गांधीयुगांतहि बापूजी सतत आघाडीवरच राहिलेले आहेत. ब्रिटिश सरकारजवळ घ्यावयाच्या लढ्याबाबत त्यांची भूमिका 'प्रतियोगी सहकारिते'ची होती. त्यामुळें त्यांचें गांधीजींशीं कांहीं बाबतींत जुळे, पण कांहीं बाबतींत मतभेद होत. पण आपले प्रामाणिक मतभेद गांधीजींपुढें निर्भयपणें मांडून त्यांनीं गांधीजींचा आदरच संपादन केला. १९२७ सालीं स्वराज्य-पक्षातर्फे ते दिल्लीच्या मध्यवर्ती विधिमंडळांत वऱ्हाडतर्फे निवडून गेले. परंतु देशांतील असंतोष शिगेला पोंचतांच त्या जागेचा राजीनामा देऊन ते १९३० च्या सत्याग्रहयुद्धांत सामील झाले. महात्माजींच्या सुप्रसिद्ध दांडीयात्रेच्या मागोमाग बापूजींनीं पुसद येथें १० जुलै १९३० रोजीं केलेला जंगलसत्याग्रह त्या वेळीं भारतांत सर्वत्र गाजला. सहा महिन्यांचा सरकारी पाहुणचार उपभोगून बापूजी जेव्हां बाहेर आले तेव्हां लोकांनीं त्यांना 'लोकनायक' ही सार्थ पदवी स्वयंस्फूर्तीनें बहाल केली. त्यानंतरच्या पुढील काळांत त्यांची गणना भारतांतील अग्रगण्य पुढाऱ्यांत होऊं लागली.

आज बापूजी अणे गेलीं साडेतीन वर्षें अंथरुणाला खिळून आहेत. या आजारपणाच्या काळांत आपल्या गतायुष्याचा इतिहास, चित्रपटांतील दृश्यांप्रमाणें, त्यांच्या डोळ्यांपुढून किती तरी वेळां सरकला असेल. उद्यां काय होईल याची पर्वा न करतां दुथडी भरून वेगानें वाहणाऱ्या जहाल राष्ट्रीय चळवळीच्या नदींत त्यांनीं आपलें जीवन ऐन तारुण्यांत झोकून दिलें होतें. किती कठीण होता तो काळ ! त्याला आज पन्नास वर्षें होऊन गेलीं. कित्येक खडकांना तोंड देऊन, भोवऱ्यांशीं झुंज देऊन बापूजी पोहत पोहत आज पैलतीराला येऊन पोंचलेले आहेत. कित्येक मानसन्मानांनीं त्यांचें आयुष्य भरलेलें आहे. मध्यवर्ती विधिमंडळांतील सभासद, मध्यवर्ती सरकारच्या कार्यकारी मंडळांतील सभासद, सिलोनमधील परराष्ट्रीय वकील व बिहार राज्याचे गव्हर्नर अशीं अनेक जबाबदारीचीं स्थानें त्यांनीं विभूषित केलेलीं आहेत. या जीवनपटावरून दृष्टि फिरवीत असतांना आपले 'भाग्यविधाते' जे आईबाप, शिक्षक-प्राध्यापक व लोकमान्य यांचें उत्कट स्मरण होऊन बापूजींचे डोळे ओले झाले तर त्यांत आश्चर्य काय !

विद्या ददाति विनयम्
विनयाद् याति पात्रताम्
पात्रत्वात् धनमाप्नोति
धनाद्धर्मम् ततः सुखम्.
हितोपदेश.

मा. श्री. अणे.

ता. १८.८.५६



पण माणसाचें जीवन हें कांहीं केवळ अडचणी व संकटें यांची एक लांबच लांब सांखळी नसते. कांहीं दुवे संकटांचे व कांहीं दुवे संधींचे अशी संमिश्र मांडणी करूनच जीवनाची सांखळी विधात्यानें तयार केलेली असते. आणि त्यामुळेंच तर माणसाला त्याचें जीवन सुसह्य होतें व प्रगति करण्याची त्याची उमेद आमरण टवटवीत राहते. या सामान्य अनुभवाचा प्रत्यय नानांच्या जीवनांतहि पाहावयाला सांपडतो. गृहपरिस्थितींतील अडचणीं-मुळें काळवंडून गेलेल्या नानांच्या जीवनांत १८७९ च्या मध्यास एक विलक्षण संधि हळूच लुकलुकली.

श्रीयुत बापूसाहेब आठल्ये हे मुंबईचे एक थोर गृहस्थ आज शाळा बघायला येणार असल्यामुळें शिपोशी गांवच्या शाळेंतील शिक्षकांची व विद्यार्थ्यांची धांदल उडून गेली होती. ठरलेल्या वेळीं बापूसाहेब आले. त्यांना शाळा दाखविण्यांत आली. विद्यार्थ्यांची थोडी चाचणी घ्यावी म्हणून त्यांनीं मुलांना प्रश्न विचारावयाला सुरुवात केली. इतक्यांत त्यांचें लक्ष एका गौरवर्णीय चुणचुणीत मुलाकडे गेलें. ‘ हा मुलगा कोणाचा ? ’ त्यांनीं शिक्षकांना प्रश्न केला.

बापूसाहेबांच्या प्रश्नाला शिक्षकांनीं जें उत्तर दिलें त्यावरून त्यांच्या असें ध्यानांत आलें कीं, हा विद्यार्थी आपल्या एका बालमैत्रिणीचा मुलगा आहे. शिपोशीमध्यें लहानपणीं ज्या मुलीबरोबर आपण शिवाशिवी, भातुकली वगैरे खेळ खेळलों त्या मुलीचा थोरला मुलगा समोर पाहून बापूसाहेबांना फार कौतुक वाटलें. ते त्या मुलाला म्हणाले “ तुझ्या आईला सांग कीं, मी आलों आहें. सर्व मुलांना घेऊन भेटायला ये. ”

आपुलकीनें ज्या मुलाची चौकशी बापूसाहेब करीत होते, तो मुलगा म्हणजेच महाराष्ट्रांतील सुप्रसिद्ध इतिहासमार्तंड रियासतकार गोविंद सखाराम ऊर्फ नानासाहेब सरदेसाई हे होत.

बालमैत्रिणीची भेट पटल्यावर बापूसाहेबांना तिची आर्थिक परिस्थिति समजल्यावर वाईट वाटलें व म्हणून त्या उदारहृदयी थोर गृहस्थानें “ तुझ्या या हुशार मुलाची पुढील शिक्षणाची व्यवस्था करण्याला मी सर्वतोपरीं साहाय्य करीन ” असें आश्वासन दिलें व लगेच मुलाची रवानगी प्रथम रत्नागिरीच्या हायस्कुलांत करावयास सांगितलें.

हा प्रसंग १८७९ सालच्या वैशाखांतील आहे. नानासाहेब सरदेसाई यांच्या जीवनाला निर्णायक कलाटणी देणारा प्रसंग म्हणून त्यांच्या जीवनचरित्रांत या प्रसंगाचें महत्त्व अनन्यसाधारण आहे.

नानासाहेब सरदेसाई यांचा जन्म १८६५ सालच्या मे महिन्याच्या १७ तारखेस गोविल या नांवाच्या कोंकणांतील एका खेडेगांवांत झाला. माणसाच्या जीवनांतील शैशवावस्थेचा, म्हणजे पहिल्या सहा वर्षांचा, अल्लड परंतु अत्यंत संस्कारक्षम काळ कसा जातो यावर त्याच्या भावी व्यक्तिमत्त्वाची घडण बहुतांशीं अवलंबून असते, असें कित्येक आधुनिक मानसशास्त्रज्ञ मानतात.

विशेषेंकरून जर हा काळ निसर्गाच्या सान्निध्यांत गेला, तर मुलाच्या मनांत निसर्गसान्निध्याची जबरदस्त व कायमची ओढ निर्माण होते असें दिसून येतें. नानासाहेबांच्या पुढील जीवनाकडे पाहिलें म्हणजे वरील सिद्धान्ताची महती पटते. शैशवावस्थेंत निसर्गमातेच्या मांडीवर यथेच्छ वागडल्यामुळेंच नानासाहेबांच्या स्वभावांत खेड्यांतील साध्या व मोकळ्या जीवनाची आवड मुरली असली पाहिजे व त्यामुळेंच सध्यां कामशेतमध्यें नदी, डोंगर व हिरवींगार शेतें यांच्या सहवासांतील निसर्गनिर्मित एकान्त त्यांना अधिक प्रिय वाटत असला पाहिजे. इंद्रायणी नदीच्या काठावरील पुणें जिल्ह्यांतील कामशेतसारख्या लहानशा खेड्यांतील जीवनांत नानासाहेब गेलीं तीस वर्षें जे रमून गेलेले आहेत व आपल्या आवडत्या इतिहासदेवाच्या तपश्चर्येंत एखाद्या प्राचीन ऋषीप्रमाणें जे गढून गेलेले आहेत त्याचें मूळ कारण त्यांच्या लहानपणांतील गोविल येथील जीवनक्रमांतच आपणाला शोधलें पाहिजे हें निश्चित.

सरदेसाई यांच्या लहानपणीं गोविल हें गांव अगदीं लहान होतें—आवतींभोंवतीं डोंगर व जंगल असल्यामुळें वस्ती फारशी नव्हतीच. जी वस्ती होती ती धनगर व गौळी यांचीच होती. मोठमोठाले साप व हिंस्र श्वापदें यांचा सुळसुळाट फार असे. नानांच्या वडिलांनीं या गांवांत जरा हट्टानेंच वस्ती केली होती. आपल्या सावत्र आईशीं न पटल्यामुळें त्यांनीं आपल्या कर्तबगारीवर हा सवता सुभा निर्माण केला होता. गृहपरिस्थितीमुळें त्यांच्या स्वभावांत जरा विचित्रपणा निर्माण झाला असावा असें दिसतें. त्यांच्या लग्नाबाबत कुटुंबांतील वडील मंडळींनीं योग्य वेळीं लक्ष पुरविलें नव्हतें. त्यामुळें त्यांच्या वयाची पंचविशी उलटून गेल्यावर त्यांनीं स्वतःच आपलें लग्न ठरविलें होतें. सुदैवानें या लग्नामुळें त्यांचा संबंध शिपोशीच्या आठल्ये या सुसंस्कृत व सुप्रसिद्ध घराण्याशीं आला. आठल्ये घराण्याशीं जमलेला हा ऋणानुबंध सरदेसाई यांच्या सर्व कुटुंबालाच उपयुक्त कलाटणी देण्याबाबत पुढें अत्यंत मोलाचा ठरला. खुद्द नानांच्या बाबतींत तर असेंच म्हणावें लागेल, कीं त्यांच्या मातुल वंशांतील नातेवाइकांच्या व ओळखीच्या संबंधामुळेंच त्यांच्या जीवनांतील सर्व महत्त्वाचे बनाव घडून आले.

त्या कालांतील रीतिरिवाजाप्रमाणें वयाच्या सातव्या वर्षीं नानांची मुंज

करण्यांत आली. गोविल येथें शाळा नसल्यामुळें त्यांचें नांव वेरवली येथील शाळेंत दाखल करण्यांत आलें. वेरवली गांव गोविलपासून सहा मैल दूर होतें. त्यामुळें रोज शाळेला जाणें-येणें शक्यच नव्हतें. म्हणून त्यांची एका नातेवाइकाकडे राहण्याची व्यवस्था करून देण्यांत आली होती. पण ही व्यवस्था फारशी समाधानकारक नव्हती. अवघ्या वर्ष-दीड वर्षानंतरच नाना कंटाळले. विशेषतः त्यांच्या जेवणाची आबाळ फार होऊं लागल्यानें ते जेरीस आले. अखेरीस त्यांनीं हट्ट धरल्यावरून त्यांना त्या शाळेंतून काढून शिपोशी या दुसऱ्या एका जवळच्या गांवांतील शाळेंत पाठविण्यांत आलें.

शिपोशी म्हणजें नानांच्या आईच्या माहेरचें गांव; तें गांव जरा मोठें होतें व तेथील वातावरणहि गोविल किंवा वेरवलीपेक्षां किती तरी पटींनीं अधिक सुसंस्कृत व पुढारलेलें होतें. गांवांतील लोक अधिक कर्तबगार होते. शाळेंतील शिक्षकांपैकीं विनायकपंत जोशी व दामोदर नारायण आठल्ये यांची आठवण नाना अद्यापीहि काढीत असतात. त्याशिवाय नाना ज्यांच्याकडे राहत असत ते गृहस्थ म्हणजे शिवरामबाबा आठल्ये व त्यांच्या घरांतील इतर मंडळी यांनीं नानांच्या जीवनावर अनेक उत्कृष्ट संस्कार केले. अशा प्रकारें शाळेंत व शाळेच्या बाहेर नानांना ज्या माणसांचा सहवास लाभला, तीं माणसें सत्प्रवृत्त, उद्योगी व महत्त्वाकांक्षी होतीं. त्यामुळें नानांच्या चरित्र्यसंवर्धनाला व बौद्धिक प्रगतीला शिपोशी गांवानें जोरानें चालना दिली असेंच म्हटलें पाहिजे.

पण अशा रीतीनें शिपोशीचा निवास नानांच्या दृष्टीनें जरी नमुनेदार ठरत होता तरी गोविल येथें कांहीं अनपेक्षित घडामोडी घडत गेल्यामुळें त्यांच्या बालमनावर नकळतपणें काळजीची छाया येत गेली. १८७४ सालीं नाना जेव्हां शिपोशीस आले तेव्हां त्यांच्या वडिलांची सांपत्तिक स्थिति बऱ्यापैकीं होती. पण पुढें प्रतिवर्षी ती खालावत गेली. तशांत दुर्दैवानें कहर केला. ५ जून १८७६ या दिवशीं मध्यरात्रीनंतर गोविलांतील त्यांच्या राहत्या घरास आग लागून तें जळून खाक झालें! पुढें, वडिलांनीं जो जो धंदा केला तो तो अंगावर आल्यानें कर्जाचा बोजा वाढत वाढत चार हजारांपर्यंत गेला. दैव जणूं हात धुऊन पाठीशीं लागलें

होते. परिस्थिति इतकी खालावत गेली कीं, घरांतील मंडळींना प्रसंगीं उपास पडूं लागले. अशा या प्रतिकूल परिस्थितींत नानांचें शिक्षण चालू कसें राहिलें याचेंच आश्चर्य वाटतें.

पण माणसाचें जीवन हें कांहीं केवळ अडचणी व संकटें यांची एक लांबच लांब सांखळी नसते. कांहीं दुवे संकटाचे व कांहीं दुवे संधींचे अशी संमिश्र मांडणी करूनच जीवनाची सांखळी विधात्यानें तयार केलेली असते आणि त्यामुळेंच तर माणसाला त्याचें जीवन सुसह्य होतें व प्रगति करण्याची त्याची उमेद आमरण टवटवीत राहते. या सामान्य अनुभवाचा प्रत्यय नानांच्या जीवनांतहि पाहावयाला सांपडतो. गृहपरिस्थितींतील अडचणींमुळें काळवंडून गेलेल्या नानांच्या जीवनांत १८७९ च्या मध्यास एक विलक्षण संधि हळूच लुकलुकली. या संधीनें ज्या थोर गृहस्थांच्या रूपानें नानांच्या जीवनांत प्रवेश केला त्यांचें नांव श्री. यशवंत वासुदेव ऊर्फ बापूसाहेब आठल्ये हें होय आणि त्याबाबत जो प्रसंग घडून आला त्याचें वर्णन या लेखाच्या सुरुवातीला दिलें आहे. एका नातेवाइकाच्या लग्नाच्या निमित्तानें श्री. बापूसाहेब आठल्ये हे आपल्या जन्मगांवीं म्हणजे शिपोशीस गेले होते. पण त्या योगायोगामुळें सरदेसाई यांच्या आयुष्याला अनपेक्षित कलाटणी मिळून त्यांची ताबडतोब रत्नागिरीस पुढील शिक्षणासाठीं रवानगी करण्यांत आली.

रत्नागिरीचें हायस्कूल म्हणजे त्या काळीं सर्व इलाख्यांत नमुनेदार गणलें जात असे. जगन्नाथ शिष्यवृत्ति प्रतिवर्षी त्या शाळेकडे जात असे. अशा या हायस्कुलांत सतत पांच वर्षें शिकण्याची संधि नानांना मिळाली, हा एक उत्कृष्ट योगायोगच होय; परंतु दुसरा एक योगायोग महत्त्वाचा आहे. तो असा कीं, त्या शाळेंतील एक विद्वान् शिक्षक श्री. मोरोपंत कीर्तने यांची नानांवर इतकी मर्जी बसली कीं, त्यांनीं नानांना आपले जांवई करून घेतलें !

"आपल्या कुटुंबांत आर्थिक ओढाताण चालू असल्यामुळें आणखी एका माणसाचें पोट भरण्याची जबाबदारी वाढवूं नये" असें नाना आपल्या वडिलांना म्हणाले. आणि त्यामुळें ते लग्नाला विरोध करूं लागले.

पण " मुलाचें शिक्षण संपेपर्यंत मुलीला आम्ही माहेरीं सांभाळूं व मुलाच्या कॉलेजशिक्षणाचा खर्च आम्ही सोसूं " असें कीर्तन्यांनीं नानांच्या वडिलांना आश्वासन दिलें. त्यामुळें नानांचा विरोध मावळला व १८८४ च्या २९ फेब्रुवारीस विवाहसमारंभ उरकण्यांत आला. अशा प्रकारें, नानांचें पाऊल पुढें पुढें पडण्यास अनुकूल परिस्थिति निर्माण झाली.

रत्नागिरीच्या हायस्कुलांतील पांच वर्षांच्या काळांत नानांच्या बौद्धिक विकासास जोराची चालना मिळाली. हायस्कुलांत त्यांना अत्यंत नाणावलेले शिक्षक लाभले. त्यांतल्या त्यांत लक्षांत राहण्यासारख्या दोन व्यक्ति–एक म्हणजे नानांचे श्वशुर श्री. मोरोपंत कीर्तने व दुसरी म्हणजे श्री. गणेश व्यंकटेश जोशी ह्या होत. श्री. ग. व्यं. जोशी हे एक महाबुद्धिवान् व ध्येयवादी गृहस्थ होते. ह्या असामान्य शिक्षकाचें मार्गदर्शन नानांना मॅट्रिकच्या वर्गांत वर्षभर लाभलें. श्री. जोशी यांनीं सेवानिवृत्तीनंतर महाराष्ट्राच्या तत्कालीन सार्वजनिक जीवनांत 'आंकडेशास्त्रज्ञ' म्हणून ख्याति मिळविली. अशा या थोर गृहस्थांच्या उदाहरणामुळेंच नानांच्या संस्कारक्षम मनांत ज्ञानसाधनेसंबंधींची आत्यंतिक तळमळ, भौतिक सुखासंबंधींची प्रमाणबद्ध अलिप्तता, सततोद्योग व प्रसिद्धिविन्मुखता हीं त्यांच्या पुढील जीवनांत आढळणारीं चार प्रमुख वैशिष्ट्यें खोलवर बिंबलीं असावींत असें दिसतें. जोशीबुवांसंबंधीं बोलतांना नाना मला म्हणाले, " सद्गुरु भेटणें ही भाग्याची गोष्ट आहे; तशी त्यांजबद्दल माझी पूज्यबुद्धि कायम राहिली."

१८८४ च्या डिसेंबरांत नाना मॅट्रिक झाले. त्याच सुमारास त्यांच्या श्वशुरांची बदली पुण्यास झाली होती. त्यामुळें पुण्यास जाऊन श्वशुरगृहीं राहावें व १८८५ च्या जानेवारीपासून नव्यानेंच सुरू होणाऱ्या 'फर्ग्युसन कॉलेजां'त नांव घालावें या गोष्टी आपोआपच ठरून गेल्या होत्या.

फक्त एक टर्म सरदेसाई पुण्यांत राहिले. नंतर कीर्तन्यांची बदली सोलापुरास झाल्यामुळें नानांना मुंबईकडे पाय वळवावे लागले. मुंबईला त्यांचे हितकर्ते बापूसाहेब आठल्ये होतेच. त्यामुळें एल्फिन्स्टन कॉलेजांत नांव घालावें, बापूसाहेबांकडे राहावें व खाणावळींत जेवावें असा कार्यक्रम आंखण्यांत आला.

बी. ए. होईपर्यंत नाना मुंबईस राहिले. या काळांत श्वशुरांकडून

मदत न घेतां स्वतः श्रम करून–शिकविण्या किंवा इतर कारकुनी कामें करून–त्यांनीं पैसे मिळविले. शिवाय त्यांना कधीं शिष्यवृत्ति व कधीं नादारी मिळे. अशाप्रकारें स्वावलंबनानें केलेल्या या शिक्षणामुळें नानांना कोणाबाबतहि मिंधेपणाची भावना निर्माण झाली नाहीं.

अहर्निश बापूसाहेबांच्या घरांतच राहावयास मिळाल्यानें कर्तबगार, महत्त्वाकांक्षी व विद्वान् व्यक्तीचें जीवन कसें असतें हें नानांना जवळून पाहतां आलें. बापूसाहेब म्हणजे मुंबईच्या तत्कालीन जीवनांतील एक पुढारी व्यक्ति होती. त्यामुळें त्यांच्या घरीं भांडारकर, तेलंग, टिळक, जिनसीवाले, मंडलीक आदि अनेक थोर मंडळी वारंवार येत असत. १८८५ सालच्या डिसेंबर महिन्यांत ‘ इंडियन नॅशनल कॉंग्रेस ’ची पहिली बैठक मुंबईस झाली. त्या निमित्तानें अनेक परप्रांतीय पाहुणे बापूसाहेबांकडे आले होते. कॉंग्रेस अधिवेशनाच्या प्रसंगीं नानांना स्वयंसेवक म्हणून काम करण्याची संधि बापूसाहेबांनीं मिळवून दिली. अशा रीतीनें, आपल्या राष्ट्रासाठीं कांहींतरी करावें ही प्रेरणा नानांच्या मनांत दृढमूल होण्यामध्यें बापूसाहेबांच्याद्वारां नानांना मिळालेल्या अनेक संधींचा भाग फार मोठा आहे.

१८८८ च्या डिसेंबरांत नाना बी. ए. झाले व या वेळींहि ‘ पुढें काय ? ’ हा प्रश्न त्यांना पडला नाहीं. बापूसाहेब आठल्ये यांच्यामार्फतच एक नामी संधि दत्त म्हणून त्यांच्यापुढें उभी राहिली होती.

बडोदें संस्थानचे त्या वेळचे सुप्रसिद्ध अधिपति सयाजीरावमहाराज गायकवाड यांना खास स्वतःसाठीं एक ‘रीडर’ हवा होता. बापूसाहेब आठल्ये यांजकडे महाराजांनीं त्याबाबत विचारणा केली होती. बापूसाहेबांनीं नानांचें नांव सुचविलें व अशाप्रकारें कोणाच्या ध्यानींमनींहि नसतां एकाएकीं नानांना सयाजीरावमहाराजांसारख्या कर्तबगार अधिपतींचा दैनंदिन सहवास लाभेल अशी नोकरी करण्याची अपूर्व संधि प्राप्त झाली.

बी. ए. चा निकाल लागल्यानंतर आठ-दहा दिवसांतच म्हणजे १ जानेवारी १८८९ रोजीं नाना बडोद्याच्या नोकरीवर रुजू झाले. तेव्हां-पासून तब्बल ३६ वर्षें नानांनीं सयाजीरावमहाराजांची सेवा केली. या दीर्घ मुदतींत नानांचा विविध अंगांनीं झपाट्यानें विकास झाला. नाना

राजवाड्यांत राहिले-वावरले, महाराजांबरोबर त्यांनीं हिंदुस्थानची अनेकदां सफर केली, युरोपच्या दौऱ्यावर ते चारदां गेले, भारतीय व परदेशी थोर थोर मंडळींचा सहवास त्यांना अनायासें घडला, लाभलेल्या आर्थिक सुवत्तेमुळें धाकट्या बंधूंचें व अनेक नातेवाइकांचें शिक्षण पार पाडण्याचें व वडिलांचें कर्ज फेडण्याचें समाधान त्यांना मिळवितां आलें.

पण या एवढ्याच गोष्टी जर नानांच्या जीवनांत घडून आल्या असत्या तर महाराष्ट्रांतील कर्तबगार पुरुषांच्या यादींत त्यांचें नांव सांगावतां आलें नसतें. नानांची वैशिष्ट्यपूर्ण कर्तबगारी ही त्यांनीं नोकरींत केलेल्या प्रगतींत नाहीं किंवा आपल्या कुटुंबाला दैन्यावस्थेंतून बाहेर काढून उंचावलें यांतहि नाहीं. तर नोकरीच्या व्यापांतून वेळ काढून व सेवानिवृत्तीनंतरहि पुढें सतत वीस-पंचवीस वर्षें काम करून त्यांनीं मराठी सारस्वताला भूषणभूत होतील असे मुसलमानी, मराठा व ब्रिटिश रियासतीवरील हजारों पृष्ठांचे जे अनेक खंड लिहिले आहेत ती होय व त्यामुळेंच त्यांचें नांव महाराष्ट्राच्या इतिहास-वाङ्मयांत अखंडपणें तळपत राहणार आहे.

अखिल भारतांत अजून कोणत्याहि भाषेंत जें झालेलें नाहीं ते सरदेसाई यांनीं मराठींत करून दाखविलेलें आहे. मुसलमानी व मराठा रियासती-वरील सुसंगत, सविस्तर, साधार व सर्वांगीण इतिहास लिहिण्याची कामगिरी कोणत्याहि भाषेंत पूर्ण झालेली नाहीं. ही अपूर्व कामगिरी सरदेसाई यांनीं एकहातीं पुरी करून दाखविलेली आहे, हें महान् आश्चर्यच नव्हे काय ? त्यांनीं सन १००० पासून १८५७ पर्यंतचा भारताचा इतिहास १२ प्रचंड खंडांत मिळून लिहिला आहे. त्यांतल्या त्यांत मराठ्यांच्या इतिहासासाठीं ८ खंड लागले आहेत. म्हणजे त्या विषयाचा त्यांचा व्यासंग विशेष आहे. एवढाच ग्रंथविस्तार पाहिला तरी दहा हजार छापील पृष्ठांहून अधिक होईल. कारण प्रत्येक खंडाच्या पुनरावृत्ति अगदीं नव्या लिहिल्याप्रमाणें निघाल्या आहेत. याखेरीज 'पेशवे दप्तर', ' पुणें रेसिडेन्सी रेकॉर्ड ' वगैरे अनेक जुन्या ऐतिहासिक साधनांतील जे निवडक कागद त्यांच्या मार्गदर्शनाखालीं संपादित झाले आहेत, त्यांची पृष्ठसंख्या वीस हजारांच्या वर जाईल. असा प्रचंड व अवाढव्य उद्योग करून सरदेसाई यांनीं अखिल भारतांत महाराष्ट्राचें नांव उज्ज्वल केलें आहे.

एखाद्या व्यक्तीला आपल्या कर्तबगारीचें क्षेत्र कसें अवचितपणें सापडतें याचें उत्कृष्ट उदाहरण म्हणजे सरदेसाई यांचें होय. मूलतः त्यांची नेमणूक ' रीडर ' म्हणून झाली होती. रीडर म्हणजे वाचून दाखविणारा. सयाजीरावमहाराजांची ज्ञानलालसा तीव्र होती. विविध ग्रंथ नियमितपणें वाचावेत असें त्यांना वाटे. पण स्वतः वाचण्यापेक्षां कोणीतरी वाचून दाखवावे व प्रसंगीं त्यांतील कठीण भाग चर्चा करून सांगावा अशी त्यांची इच्छा होती व म्हणून त्यांनीं सरदेसाई यांची नेमणूक केली होती. त्यामुळें महाराजांना वाचून दाखविणें व जेव्हां त्यांच्या शेजारीं बसून वाचनाचें काम नसेल तेव्हां स्वतःचें स्वतंत्र वाचन चालू ठेवणें हाच सरदेसाई यांचा दैनंदिन व्यवसाय बनला. राजवाड्यांतील विलासी व ऐषआरामी वातावरणांत जाऊन माणसें आळशी होतात हा सर्वसामान्य अनुभव आहे. यण अहर्निश ज्ञानसेवा करीत राहिल्यानें सरदेसाई यांची बुद्धि महत्त्वाकांक्षी व पराक्रमोत्सुक बनली व आपल्या कर्तबगारीसाठीं नवें क्षेत्र शोधूं लागली. ' रीडर 'चा व्यवसाय तिला मर्यादित वाटूं लागला. त्यामुळें सरदेसाई यांनीं महाराजांच्या सूचनेवरून कांहीं निवडक इंग्रजी पुस्तकांचीं भाषांतरें करण्याकडे लक्ष वळविलें. पुढें सरदेसाई यांच्याकडे राजपुत्रांना शिकविण्याचें काम देण्यांत आलें. या कामांत सरदेसाई रमूं लागले. पण राजपुत्रांना रूढ पद्धतींनीं इतिहास शिकविण्याचा त्यांना कंटाळा आला. तेव्हां गोष्टीरूपांनीं इतिहास शिकवावा अशी महाराजांनीं त्यांना सूचना केली. पण इंग्रजांच्या इतिहासाप्रमाणें मुसलमानी व मराठा इतिहासांतील गोष्टी सांगायला एकहि योग्य पुस्तक त्यांना सांपडेना. म्हणून ह्या निमित्तानें सरदेसाई यांना मुसलमानी व मराठी इतिहास-वाङ्मयांतील मूळ साधनांमध्यें प्रवेश करून घ्यावा लागला. त्यांतूनच ' मुसल्मानी रियासत ' हा त्यांचा पहिला ग्रंथ १८९८ मध्यें तयार झाला आणि सरदेसाई यांना कांहींसें अवचितपणें आपल्या जीवनाचें कार्यक्षेत्र सुस्पष्टपणें दिसूं लागलें ! मुसल्मानी व मराठी अंमलावरील एका पाठीमागून एकेक पुस्तकें तयार होऊं लागलीं. १९२५ सालापर्यंत नाना महाराजांच्या सेवेंत होते. राजपुत्र विद्यालयाचे प्रमुखाध्यापक व खाजगी खात्याचे चीफ अकौंटन्ट अशीं कामें सांभाळूनहि सरदेसाई यांनीं आपली

इतिहाससेवा अखंडपणें चालू ठेवली व वयाच्या साठाव्या वर्षीं निवृत्त झाल्यानंतर गेलीं वीस–पंचवीस वर्षें कामशेत येथें राहून आपल्या आवडत्या कार्याला अहोरात्र वाहून घेतलें.

१९५७ सालांतील मे महिन्यांत सरदेसाई यांच्या वयाला ९२ वर्षें पुरीं होतील. अजूनहि त्यांचा थोडाफार लेखनोद्योग चालूच आहे. नुकतेंच त्यांनीं आपल्या जीवनक्रमाचा इतिहास सांगणारें ' माझी संसारयात्रा ' या नांवाचें पुस्तक हातावेगळें केलें आहे. वर्षांतून एकदां मी कामशेतास नानांचा आशीर्वाद घेण्यास जातों, तसा नुकताच गेलों होतों. तेव्हां नाना मला म्हणाले, " अलीकडे वेळ जात नाहीं म्हणून कांहींतरी निश्चित् काम शोधीत आहें. " नानांचे हे उद्गार ऐकून मी थक्क झालों. ज्या कोणा युवकाला कंटाळा, आळस, दिरंगाई आदि अवगुण त्रास देऊं लागले असतील त्यानें नजीकच्या ग्रंथालयाकडे पाय वळवून एकवार सरदेसाई यांच्या प्रचंड रियासतींचें दर्शन घ्यावें. ज्यांना रियासतींचें वाचन व मनन करण्याची स्फूर्ति होईल त्यांना भारतापुढील भविष्यकाळ किती उज्ज्वल आहे याची खात्री पटून त्यांचीं मनें उत्तेजित होतील.

कुर्वन्नेवेह कर्माणि जिजीविषेत् शतं समाः
ईशावास्योपनिषद्
अर्थ उद्योग करीत रहा म्हणजे शंभर
वर्षें जगतां येईल असें उपनिषद् बोलतें
गो. स. सरदेसाई
कामशेत ता ७ नोव्हेंबर
१९५५



*अर्थात् भ्रातृमंडळाचें काम सोडावें लागत असल्यानें त्यांना वाईट वाटलें–आयुष्याचें ध्येय आपणाला सांपडलें असूनहि त्या दिशेनें चालत जाण्याची शक्यता आपणाला नाहीं असा विचार मनांत येऊन ते अस्वस्थ झाले. त्यामुळेंच भ्रातृमंडळानें निरोपप्रसंगीं त्यांना जेव्हां एक घड्याळ भेट म्हणून दिलें, तेव्हां त्याचा स्वीकार करतांना सद्गदित होऊन जगताप म्हणाले, " या घड्याळाचा प्रत्येक ठोका मला बजावेल कीं, ' तुला तुझ्या समाजाची सेवा करायची आहे. ' आणि म्हणून मी सांगतों कीं, जरी मी आतां तुमच्यामधून जात असलों तरी थोड्याच काळांत या घड्याळाचे ठोके परत तुमच्यामध्यें आणून मला सोडतील."*

पुण्याच्या तुळशीबागेमधील राममंदिरांतील दृश्य. सकाळची वेळ. दहा-अकरा वाजण्याचा सुमार. तेरा-चौदा वर्षांचा एक मुलगा डोळ्यांत पाणी आणून प्रभु रामचंद्राची करुणा भाकीत आहे. कालहि याच वेळीं तो येथें होता. परवांहि होता. गेले सात-आठ दिवस तो रोज या देवळांत येत आहे. बेलबाग, रामेश्वर, इत्यादि देवळें आटोपून तो या मंदिरांत येतो. झालें आहे तरी काय असें या मुलाच्या आयुष्यांत? किती दुःखी-कष्टी चेहरा दिसत आहे याचा! हृदयाला पीळ पडावा असें कांहीं तरी भीषण दुःख याच्या वांट्यास तर आलेलें नाहीं ना? तो पहा, प्रभु रामचंद्रापुढें हात जोडून तो कांहीं तरी तोंडानें पुटपुटत आहे. तो म्हणत आहे, " हे परमेश्वरा! माझ्याच वांट्यास तूं एवढं मोठं दुःख कां दिलंस? माझे बाबा नेलेस, माझी आई नेलीस. आम्हां भावंडांना अनाथ केलंस. आमची पुढं वाट काय? आम्हांलाहि घेऊन जा ना तूं! मनुष्य जर मरण्यासाठींच जन्माला येतो तर जगून तरी उपयोग काय? जगण्याची धडपड आम्ही कशाला करूं? दारिद्र्याचे चटके सहन कशाला करूं? लोकांचें मिंधें कशाला होऊं! कुणाच्या तोंडाकडे आम्ही आतां बघूं? कुणासाठीं जगूं? "

' कुणासाठीं जगूं? ' असा प्रश्न अगतिकतेनें विचारणाऱ्या त्या मुलाला परमेश्वरानें उत्तर दिलें असेल का? युगानुयुगें हजारों दुःखीकष्टी जीवांनीं परमेश्वरापुढें अशीच करुणा भाकलेली होती. त्यांतच या मुलाची एक भर! त्या लहानशा मुलाकडे पाहून परमेश्वर स्वतःशीं म्हणाला असेल, " मातृवियोगामुळें या मुलाला जर खरं दुःख झालं असेल तर याचं पुढील जीवन उदात्त होईल. आवतींभोंवतीं जे हजारों जीव याच्यापेक्षांहि दुःखांत आहेत त्यांच्याकडे याचं लक्ष जाईल. आपल्या एकट्याचें आयुष्य सुखी करण्यांत खरा पुरुषार्थ नाहीं असें याला वाटेल आणि अनाथ, अपंग, दलित व पीडित बंधूंच्या सेवेकडे हा वळेल. जनसेवा हीच माझी सेवा असें मानूं लागेल. "

कुमारवयाच्या ऐन सुरुवातीला ज्या मुलांच्या आयुष्यांत मातृ-पितृ-निधनासारखें तीव्र दुःख उपस्थित होतें त्यांच्या आयुष्याला तें दुःखच वेगळें वळण लावतें. बालवयांत असतांना जर असलें हृदयविदारक दुःख

निर्माण झालें तर त्याची बोचणी जरा अल्लडपणानेंच सहन केली जाते. खाऊ, खेळ व खेळणीं यांमुळें तें दुःख लवकर पुसतां येतें. परंतु तेरा ते पंधरा वयाच्या आसपासचा काळ मात्र मातृ-पितृनिधनासारखीं भयंकर दुःखें सहन करण्याच्या दृष्टीनें अत्यंत कठीण असतो. धड ना बालवयांतील अल्लड वृत्ति व धड ना पुढील वयांतील आत्मनिष्ठ व व्यवहारी वृत्ति असा पेच निर्माण होऊन मुलाला पूर्णतः भांबावल्यासारखें होऊन जातें. म्हणूनच, जगतापांच्या आयुष्यांतील तुळशीबागेंतला जो प्रसंग वर वर्णन केला आहे त्या प्रसंगाचें महत्त्व, जगतापांच्या पुढील आयुष्यांतील कर्तबगारीची दिशा निश्चित होण्याच्या दृष्टीनें अतिशय आहे असेंच म्हटलें पाहिजे.

गुरुवर्य बाबूराव गणपतराव जगताप यांचा जन्म सन १८८८ च्या ऑगस्ट महिन्यांतील १७ तारखेला पुण्यांतच झाला. लक्ष्मीरस्त्यावरील गणपति चौकाशेजारच्या चोपदारांच्या वाड्यांत जगताप कुटुंब त्या वेळीं राहत असे. त्या वाड्याचे अवशेष अद्यापहि पहावयास सांपडतात. २५–३० गरीब कुटुंबें त्या मोठ्या वाड्यांत राहत असत. जगतापांचें कुटुंब ज्या खोलींत राहत असे ती खोली अगदीं लहान होती. त्या टीचभर खोलींत गणपतरावांनीं संसार थाटला होता. गरिबीचाच संसार होता तो ! खोलीला भाडें होतें दरमहा आठ आणे. पण यापेक्षां अधिक भाडें देण्याची त्यांची ऐपत नव्हती. कारण, फोटोझिंको या सरकारी कचेरींत त्यांना केवळ पट्टेवाल्याची नोकरी होती व दरमहा पगार मिळत असे अवघा रुपये दहा ! या पगारांतून चार मुलांचें व बायकोचें कुटुंब पोसतांना त्यांना किती विवंचना होत असेल याची कल्पना केलेली बरी. पण या दारिद्र्यांतहि तो स्वाभिमानी व सच्छील पुरुष समाधानांत असावयाचा. वास्तविक गणपतरावांचे बंधु पोलीस फौजदार होते. त्यांच्यापुढें हात पसरला असतां तर त्यांनीं मदतहि केली असती. परंतु गणपतरावांना तें कधींच रुचलें नाहीं. सुदैवानें त्यांची पत्नीहि मानी स्वभावाची होती. नवऱ्याच्या अपुऱ्या मिळकतींत भर घालण्यासाठीं ती मोलमजुरी करीत असे. नवराबायकोच्या या कष्टांमुळेंच मुलांच्या तोंडांत दोन वेळां कसा तरीं घास पडे.

सरकारी ऑफिसांतील सुशिक्षित वातावरणांतील नोकरीमुळें नकळतच एक गोष्ट गणपतरावांच्या मनावर बिंबली होती. ती अशी कीं, आपल्या मुलांना शिक्षण दिलें तरच पुढील काळांत त्यांचा निभाव लागेल; नाहीं तर त्यांच्या वांट्यासहि मोलमजुरीचेंच जिणें येईल. गणपतरावांनीं पत्नी-च्याहि मनांत ही गोष्ट बिंबवून दिली. त्यामुळें स्वतः अर्धपोटीं राहावयाचें व स्वतः वाटेल ते कष्ट करावयाचे, पण गरिबीची झळ मुलांच्या शिक्षणाला लागूं द्यावयाची नाहीं असा निश्चय त्या दोघांनीं केला.

पण विधिघटना कांहीं निराळीच होती. १८९६ सालीं पुण्यांत प्लेगनें कहर केला. प्लेगनें भरभरा माणसें मरूं लागलीं. दुर्दैवानें त्या भयंकर साथीनें गणपतरावांचा बळी घेतला !

गणपतरावांच्या आकस्मिक मृत्यूमुळें त्यांच्या पत्नीवरील जबाबदारी वाढली. बाबू त्या वेळीं मराठी तिसरींत होता. या मुलाचें शिक्षण कसें पार पाडावें ही चिंता त्यांच्यापुढें आ वासून उभी राहिली. सरूबाईचे थोरले दीर पोलिस फौजदार होते. त्यांची स्थिति बरी होती; पण त्यांच्या घरीं जाऊन राहावयाला सरूबाई तयार नव्हत्या. गरिबीचें पण मानाचें जिणें जगणेंच त्यांना अधिक श्रेयस्कर वाटलें. दिरानें जेव्हां त्यांना आपल्या घरीं येऊन राहण्याविषयीं सुचविलें तेव्हां सरूबाईंनीं जें उत्तर दिलें तें स्त्रीस्वभावाचा एक उत्कृष्ट नमुना म्हणून लक्षांत घेण्यासारखें आहे. त्या म्हणाल्या, " भावोजी, आपलं कुटुंब मोठं. त्यांत आम्हीं पांच माणसं ! कसं होणार ! शिवाय आपण नोकरीसाठीं बाहेर फिरणार. आमचं बायांचं घरांत जमलं पाहिजे ना ! नाहीं तर तुम्हांला तरास. मी दळणकांडण करून संसार चालवीत होतें तसंच पुढंहि करून पोरांना वाढवीन. तुम्ही माझ्या बाबूला तेवढं संभाळा. त्याला चांगली इद्या द्या. त्याला हुशार करा. तो जरा मोठा झाला म्हंजे हा संसार त्याच्या गळ्यांत घालून मी मोकळी होईन."

अशा रीतीनें बाबूच्या शिक्षणाची व्यवस्था चुलत्यांच्या मार्फत करण्यांत आली. अर्थात् राहण्यासाठीं तो चुलत्याकडे गेला नाहीं. चुलते त्याच्या घराच्या जवळच राहत असत. त्यांच्याकडे तो फक्त अभ्यासासाठीं व जेवणासाठीं जाई. शाळेची फी, पुस्तकांचे पैसे, कपडेलत्ते तो त्यांच्या-

करून घेई. या जीवनक्रमाबद्दल बोलतांना जगताप मला म्हणाले, " जसं शाळेंत पुस्तकं घेऊन जातों, त्याप्रमाणें चुलत्यांकडे विद्या शिकण्याकरितां म्हणून मी जात असें. त्यामुळें तेथें फारसा जिव्हाळा निर्माण झाला नाहीं. दिवसांतून कितीतरी वेळां मी आईची भेट घेण्यासाठीं घरीं पळून येत असे."

पण अशी ही प्रेमळ व स्वतः अशिक्षित असूनहि आपला मुलगा खूप शिकावा अशी महत्त्वाकांक्षा बाळगणारी आई बाबूला फार वर्षे लाभली नाहीं. १९०२ सालीं तीहि पतीप्रमाणेंच प्लेगला बळी पडली.

प्लेग ! प्लेग ! प्लेग ! १८९६ सालापासून पुढील वीस-पंचवीस वर्षे या राक्षसी साथीनें आपल्या प्रांतांतील किती मुलांना अनाथ केलें असेल याची गणती करणेंहि कठीण आहे. जगतापांच्या आयुष्यांत प्लेगनें थैमान घातलेलें आढळतें. १८९६ सालीं वडील; १९०२ सालीं आई; १९०६ सालीं चुलती, चुलतबहीण व सख्खा धाकटा भाऊ असे एकामागून एक प्लेगला बळी पडले. १९०७ सालीं बाबूरावांनाहि प्लेग झाला होता. पण मामांच्या परिश्रमानें व परमेश्वराच्या कृपेनें ते त्यांतून वांचले.

आई वारल्यानंतर जगताप किती भांबावून गेले होते याचें वर्णन या लेखांत सुरुवातीला आलेलेंच आहे. सुदैवानें हळूहळू त्यांची मनःस्थिति सुधारूं लागली. ते आतां चुलत्याकडे राहण्यास गेले. पण आई-वडिलांच्या मायेंत वाढणें आणि दुसऱ्या नातेवाइकांच्या घरीं राहणें यांत खूप अंतर पडणें अपरिहार्य असतें. तसें चुलत्याचें बाबूवर प्रेम होतें, पण त्यामुळें आईच्या मायेची भरणी होईना. हळूहळू बाबू अंतर्मुख होऊं लागला. कामापुरतें घरांत राहावें व बाकीचा वेळ आपल्या उद्योगांत मन रमवावें असें जीवन तो जगूं लागला. चुलत्याच्या घरीं लहानसहान बरींच कामें त्याच्याकडे येत. तीं तो दक्षतेनें करी व उरलेल्या वेळांत शाळेंतील अभ्यासाकडे तो वळे. पण अभ्यास संपल्यावर काय करावें, विशेषतः सुटीच्या दिवशीं काय करावें, हा प्रश्न पडे. पण बाबूच्या मनांतील सहजप्रवृत्तींनीं तो प्रश्न अवचितपणें सोडविला होता. चित्रें काढण्यांत तो रंगून जाऊं लागला होता ! भिंतीवर चिकटविलेलीं पोस्टर्स पाहून किंवा योगायोगानें हातीं पडलेल्या चित्रांकडे पाहून पाहून बाबू आपली चित्रकलेची

उपजत ऊर्मि भागवून घेत होता. त्याच्या या कलेचें कौतुक घरांत विशेषसें कोणालाच वाटत नव्हतें. पण सुदैवानें त्याच्या शाळेंतील चित्रकला-शिक्षकांनीं त्याला प्रोत्साहन देण्यास सुरुवात केली. बाबू या सुमारास 'नूतन मराठी विद्यालया'च्या इंग्रजी शाळेंत होता. या शाळेंतील कित्येक शिक्षकांचा अजूनहि जगताप अधूनमधून कृतज्ञतेनें उल्लेख करीत असतात. विद्यार्थ्यांमधील गुणांचा विकास करण्यासाठीं आपलेपणानें मदत करणारे शिक्षक मिळणें हा विद्यार्थ्यांच्या जीवनांतील एक योगायोगच म्हटला पाहिजे. शिक्षकांच्या उत्तेजनामुळें जगतापांच्या चित्रकलेचा विकास झपाट्यानें होत गेला. क्रमाक्रमानें ते ड्रॉइंगच्या परीक्षा पास होत गेले व थर्ड ग्रेडच्या परीक्षेंत त्यांचा सबंध मुंबई इलाख्यांत पहिला क्रमांक येऊन त्यांना तीन पारितोषिकें मिळालीं. थर्ड ग्रेडच्या परीक्षेंतील त्यांच्या या अपूर्व यशामुळें ते मॅट्रिक झाल्यावर चित्रकलेंतील उच्च शिक्षणासाठीं मुंबईच्या जे. जे. स्कूल ऑफ आर्ट्स्मध्यें जाणार हें जवळजवळ ठरूनच गेलें होतें. परंतु जगतापांचें आयुष्य अपेक्षित चाकोरींतून विकसित होण्याचा योग नव्हता !

त्या काळांत चित्रकलेकडे पाहण्याचा समाजाचा दृष्टिकोन हल्लींपेक्षां फार निराळा होता. चित्रें काढणें म्हणजे लहरीपणा असा समज सुशिक्षितांतहि रूढ होता. शिवाय पैसे मिळविण्याच्या दृष्टीनें चित्रकाराचा जम बसूं शकेल अशी परिस्थिति तेव्हां नव्हती. त्यामुळें बाबूरावांच्या पालकांनीं त्यांना चित्रकलेचा नाद सोडण्याचा सल्ला दिला. 'या मुलानें कॉलेजांत जाऊन पदवीधर व्हावें व मामलेदार किंवा अशीच बडी सरकारी नोकरी पटकवावी' असें त्यांना वाटत होतें. त्यामुळेंच १९०८ सालीं मॅट्रिक झाल्यावर बाबूरावांनीं चित्रकलेचा व्यासंग सोडून फर्ग्युसन कॉलेजांत नांव घातलें.

शाळेंत असतांना चित्रकलेप्रमाणें आणखी दोन छंद बाबूरावांना लागले होते. एक म्हणजे क्रिकेट खेळण्याचा व दुसरा तालीम करण्याचा. प्लेगमुळें अधून-मधून चार-चार महिने किंवा अधिक कालहि शाळा बंद राहत. या सुट्ट्यांतून क्रिकेट खेळण्यासाठीं बाबूरावांना भरपूर वेळ मिळाला असावा. बाबूरावांच्या प्रौढपणींच्या जीवनक्रमाकडे पाहिलें म्हणजे

ते विद्यार्थिदशेंत पट्टीचे क्रिकेट खेळाडू असतील असें वाटणारहि नाहीं. पण सुप्रसिद्ध क्रिकेटपटु प्रा. दि. ब. देवधर हे जगतापांबरोबर शाळा-कॉलेजांत होते व त्यांनींच अशी आठवण सांगितली आहे कीं, जगताप हे दमदार व आघाडीचे खेळाडू म्हणून विद्यार्थिदशेंत प्रसिद्ध होते. आंतरशालेय व आंतरकॉलेज सामन्यांतील संघांमध्यें जगतापांचा समावेश हमखास होत असे. आपल्या क्रिकेटच्या आवडीसंबंधीं व शालेय जीवनासंबंधीं बोलतांना जगताप मला म्हणाले, " माझ्या खेळाचें श्रेय मुख्यतः आमच्या शाळेंतील केसकर या शिक्षकांच्या प्रोत्साहनाला व देवधरबंधूंसारख्या मित्रांना दिलें पाहिजे. आमच्या शाळेंतील केसकर मास्तर म्हणजे हल्लींचे नभोवाणी व माहिती खात्यांचे कर्तबगार मंत्री श्री. बाळकृष्ण केसकर यांचे वडील होत. ग्राउंडवर येऊन ते विद्यार्थ्यांना उत्तेजन देत. त्यांच्या प्रयत्नामुळेंच शाळेचें पहिलें संमेलन १९०६ सालीं भरलें. त्याचप्रमाणें चित्रकलेचें पहिलें प्रदर्शनहि त्यांनींच भरविलें होतें. त्यांत मला बक्षिसें मिळालीं होतीं. केसकरांच्या व्यक्तिमत्त्वाचा व कर्तृत्वाचा ठसा माझ्या मनावर अद्यापहि कायम आहे. "

जगतापांना व्यायामाचा नाद कसा लागला व त्यांचें शरीर कसदार कसें होत गेलें याचीहि हकीगत उद्बोधक आहे. चुलत्यांच्या ज्या घरांत जगताप राहत त्याच्याजवळच एका सोनार जातीच्या सद्गृहस्थांचें घर होतें. त्या गृहस्थांना व्यायामाची व कुस्तीची आवड होती—आवड कसली, विलक्षण वेडच होतें असें म्हणाना ! वाचनाचें वेड लागलेला माणूस जसा आपल्या घरांत खाजगी ग्रंथालय तयार करतो, त्याप्रमाणें या गृहस्थांनीं आपल्या घरांतच तालीम बांधली होती. या आपल्या खाजगी तालमींत ते जवळपासच्या कांहीं निवडक मुलांना मेहनतीसाठीं येऊं देत असत. सुदैवानें जगतापांचा शिरकाव या तालमींत झाला व रोज सकाळ-संध्याकाळ ते तेथें जाऊन घुमूं लागले. याबद्दलची आठवण सांगतांना जगताप मला म्हणाले, " मी इंग्रजी तिसरींत असतांना रोजीं तीन-चारशें जोर-बैठका काढीत असें व कुस्तीहि खेळत असें. त्या सोनार गृहस्थांच्या उत्तेजनामुळेंच व्यायामाचा नाद मला लागला होता. पण मेहनतीच्या मानानें मी कोणताच खुराक खात नसे. कारण मला खुराक कोण देणार ! आई वारलेली; चुलत्याकडे मागण्याची सोय नव्हती. पण याबाबत एक चांगला योग

घडला. १९०३ किंवा १९०४ चा मे महिना असेल. सुटीचा दिवस होता. तालीम संपवून मी मामांच्या दुकानीं गेलों. माझे मामा म्हणजे पुण्यांतील प्रसिद्ध दुकानदार गणपत विठूजी शिंदे. बाहुलीच्या हौदाजवळ त्यांचें दुकान होतें. माझ्या केसांतली तांबडी माती पाहून मामांनीं मला विचारलें, 'बाबू, तूं कुस्ती करून आलास काय?' त्यावर मी सोनाराच्या तालमींत रोज तीनशें जोर व चार-पांचशें बैठका काढून कुस्ती खेळत असल्याचें त्यांना सांगितलें. मामांनाहि तालमीचा शौक होता. त्यामुळें त्यांना माझें कौतुक वाटलें. म्हणून ते म्हणाले, 'पण खुराक कोणता खातोस? एवढ्या मेहनतीला चांगला खुराक हवा.' त्यावर मी काय बोलणार! माझी अडचण ओळखून मामा लगेच म्हणाले, "ठीक. उद्यांपासून मेहनत आटोपली कीं माझ्या दुकानीं येत जा व दोन पैसे घेऊन जात जा!' याप्रमाणें क्रम सुरू झाला. दूध, बदाम असा कांहीं तरी खुराक मीं रोज खाऊं लागलों. त्या काळीं खूप स्वस्ताई होती. दोन पैशांत तांब्याभर दूध मिळे. सोनाराच्या तालमीनें आणि मामांच्या खुराकानें माझ्यावर फार मोठे उपकार केले आहेत. कॉलेजांत गेल्यावर मामांनीं मला बढती दिली! रोज दोनाऐवजीं तीन पैसे ते देऊं लागले. खुराकाचा हा रतीब मी बी. ए. होऊन १९१३ सालीं पुणें सोडीपर्यंत चालू होता."

जगतापांचीं कॉलेजजीवनांतील पहिलीं दोन वर्षें मुख्यतः अभ्यासाची जबाबदारी सांभाळून नव्या वातावरणाशीं समरस होण्यांतच गेलीं. शिवाय वैयक्तिक जीवनांतील अडचणींमुळें ते फारसे कोणांत मिसळतहि नसत. पण इंटर पास झाल्यानंतर त्यांचा आत्मविश्वास वाढला. आतां आपण पदवीधर नक्की होणार अशी खात्री त्यांना वाटूं लागली व अशा प्रकारें वैयक्तिक अडचणींचा संकोच होऊं लागल्याबरोबर त्यांना समाजाची आठवण होऊं लागली. त्यामुळें त्यांचें लक्ष पुण्यांतील 'मराठा भ्रातृमंडळ' या संस्थेच्या समाजकार्यानें खेचून घेतलें.

समाजहिताची कळकळ बाळगणाऱ्या श्री. लक्ष्मणराव ठोसर या एका उद्योगी गृहस्थांनीं 'मराठा भ्रातृमंडळ' ही संस्था १९१० सालापासून पुण्यांत सुरू केली होती. ते स्वतः आपली सरकारी नोकरी सांभाळून

स्वार्थत्यागपूर्वक हें कार्य करीत असत. मराठा समाजापुरतें जरी त्यांचें कार्य मर्यादित होतें तरी त्यांत संकुचित भावना नव्हती. इंग्रजी विद्येच्या प्रसारामुळें राजकीय व सामाजिक क्रांतीचा जो सूर्यनारायण भारतीय सार्वजनिक जीवनांत एक-दोन पिढ्यांपासून आधुनिकतेची ऊब निर्माण करीत आलेला होता त्याचे किरण आपल्या समाजापर्यंतहि पोंचवावेत अशी त्यांची दुर्दम्य इच्छा होती. ब्राह्मण, प्रभू आदि कांहीं जातींनींच शिक्षणाकडे वळावें, इतर जातींनीं त्या भानगडींत पडूं नये अशीच समजूत त्या काळीं समाजाच्या सर्व थरांत पसरलेली होती. महात्मा फुल्यांच्या कार्यामुळें वरिष्ठ वर्गांच्या विद्येसंबंधींच्या मक्तेदारीला खिंडारें पडलीं होतीं हें खरें; परंतु शिक्षणप्रसाराचें कार्य संथपणानें करावयाला लागणारी सामग्री व तपश्चर्येची मनोवृत्ति अद्यापि तयार झालेली नव्हती. ठोसरांनीं आपल्या ‘ भ्रातृमंडळा ’च्या द्वारां इंग्रजी शिक्षणासंबंधींची आपुलकी खेड्यापाड्यापर्यंत पसरविण्याचें काम अंगावर घेतलें होतें. या कामांत त्यांना साहजिकच सुशिक्षित मराठा तरुणांची गरज होती. जगतापांकडे त्यांचें लक्ष गेलें. १९१० सालीं देवासच्या महाराजांच्या अध्यक्षतेखालीं पुण्यांत भ्रातृमंडळाचें पहिलें संमेलन भरलें. या वेळीं जगतापांचें बहुरंगी व्यक्तिमत्त्व ज्येष्ठ मंडळींच्या डोळ्यांत प्रथम भरलें आणि चिटणीसपदीं त्यांची निवडणूक करण्यांत आली.

चिटणिसाचें काम स्वीकारल्यापासून जगताप भ्रातृमंडळाच्या कार्याकडे अधिक लक्ष पुरवूं लागले. कुस्त्यांच्या हंगामांत खेडोपाडीं जाऊन ते शिक्षणाचें महत्त्व स्पष्ट करून सांगूं लागले. एका दृष्टीनें, सध्यां ‘ महाराष्ट्र प्रदेश लोकशिक्षण समिती ’चे अध्यक्ष म्हणून ते जें कार्य करीत आहेत त्याचा श्रीगणेशाच त्या वेळीं त्यांनीं गिरविला ! भ्रातृमंडळाच्या कार्यामुळें जगतापांचा संबंध त्या वेळच्या पुण्यांतील पुढारी मंडळींशीं येऊं लागला. विशेषतः शेतकी कॉलेजचे प्रि. हॅरोल्ड मॅन, डॉ. भांडारकर, श्री. चंदावरकर रँ. परांजपे, श्री. कामत आदि प्रागतिक पुढाऱ्यांकडे ते अधिक आकर्षिले गेले पदवी घेतल्यानंतर आपणहि समाजकार्याकडे वळावें, विशेषतः शिक्षणदानाच्या कार्याकडे वळावें अशी त्यांच्या मनाची धारणा होऊं लागली. आपल्या शिक्षणाचा उपयोग आपल्या समाजाला करून देण्यानेंच त्या शिक्षणाचें खरें चीज होऊं शकेल असा उदात्त विचार

चिपळूणकर-टिळक-आगरकर आदि मंडळींप्रमाणें त्यांच्याहि मनांत स्थिर होऊं लागला. आजपर्यंतचें सारें आयुष्य गरिबींतच गेलें असल्यानें त्यांच्या पैशाच्या अपेक्षा फार वाढलेल्या नव्हत्या. पोटापुरतें मिळण्याची सोय होत असल्यास शिक्षणदानाच्या पवित्र कार्याकडे बेधडक वळावें अशी ध्येयवादी वृत्ति त्यांच्या अंतःकरणांत बळावूं लागली होती.

पण सहजासहजीं तसा योग यावयाचा नव्हता ! चुलत्यांनीं आतांपर्यंत आपणांवर केलेला खर्च व त्यांचे उपकार यांचा बोजा जगतापांच्या मनावर कळत-नकळतपणें होता. त्यामुळें चुलत्यांच्या इच्छेला मान देऊन बी. ए. झाल्यावर १९१४ सालीं ते नाशिकच्या पोलिस ट्रेनिंग स्कूलमध्यें दाखल झाले. चुलते स्वतः डेप्युटी सुपरिंटेंडेंटच्या जागेपर्यंत चढले होते. त्यामुळें पदवीधर असलेला आपला हुशार पुतण्या किती तरी आणखी वर चढेल व सहज हजार-बाराशें रुपयांपर्यंत पगार मिळवील असें गणित त्यांनीं स्वतःशीं केलें असावें. म्हणून त्यांनीं पुतण्याला नाशिकला जाण्याचा सल्ला दिला. ‘ शिक्षणक्रम पूर्ण होतांच या तरुणाला आम्ही एकदम इन्स्पेक्टरची जागा देऊं ’ असें आश्वासनहि त्यांनीं प्रांतांतील मुख्य पोलिस अधिकाऱ्याकडून मिळविलें होतें. आपल्या बाबतींत हा अपवाद करण्याचें ठरल्यानें जगतापांनाहि नाशिकला जातांना थोडा उत्साह वाटला असावा. अर्थात् भ्रातृमंडळाचें काम सोडावें लागत असल्यानें त्यांना वाईट वाटलें, कारण आयुष्याचें ध्येय आपणाला सांपडलें असूनहि त्या दिशेनें चालत जाण्याची शक्यता आपणाला नाहीं असा विचार मनांत येऊन ते अस्वस्थ झाले. त्यामुळेंच भ्रातृमंडळानें निरोपप्रसंगीं त्यांना जेव्हां एक घड्याळ भेट म्हणून दिलें तेव्हां त्याचा स्वीकार करतांना सद्गदित होऊन जगताप म्हणाले, “ या घड्याळाचा प्रत्येक ठोका मला बजावेल कीं, ‘ तुला तुझ्या समाजाची सेवा करायची आहे ’ आणि म्हणून मी सांगतों कीं, जरी मी आतां तुमच्यामधून जात असलों तरी थोड्याच काळांत या घड्याळाचे ठोके परत तुमच्यामध्यें मला आणून सोडतील. ”

आणि प्रत्यक्षांत झालेंहि तसेंच. नाशिकचा शिक्षणक्रम त्यांनीं उत्कृष्ट प्रकारें पूर्ण करूनहि मध्यंतरीं जुने पोलिसप्रमुख जाऊन नवे आल्यानें त्यांनीं जगतापांना इन्स्पेक्टर करण्याचें आश्वासन पाळण्याचें नाकारलें. हा अपमान

सहन करणें जगतापांना इष्ट वाटलें नाहीं. त्यामुळें त्यांनीं पोलिस डिपार्ट-मेंटमध्यें जाण्याचा रस्ता कायमचाच सोडून देण्याचें ठरविलें. याच सुमारास त्यांचे चुलते वारले. त्यामुळेंहि कदाचित् जगतापांना हा निर्णय करणें सोपें गेलें असावें.

'आतां पुढें काय?' हा प्रश्न होता. जगतापांचें लग्न होऊन त्यांना दोन मुलें झालेलीं होतीं. त्यामुळें प्रपंचाचा खर्च भागविण्याची बाब महत्त्वाची होती. शिवाय आपण अननुभवी अशी टोचणी होतीच. भ्रातृ-मंडळाच्या द्वारां स्वतःच्या जबाबदारीवर विद्यादानाचें कार्य करणें म्हणजे लहान तोंडीं मोठा घास घेणें होईल असें त्यांना वाटलें. त्यामुळें बडोद्याच्या श्रीमंत सयाजीरावमहाराजांकडून 'ए.डी.सी.'च्या नोकरीसंबंधीं जेव्हां बोलावणें आलें तेव्हां त्यांनीं बडोद्याकडे पाय वळविले. आपलें आयुष्य गरिबींत गेलेलें, साधेपणाचें व समाजाच्या सेवेचे विचार आपल्या अंतःकरणांत मुरलेले अशा स्थितींत दरबारी वातावरणाशीं आपलें कितपत जमेल अशी शंका बाबूरावांच्या मनाला अनेकदां चाटून गेली. परंतु अल्पावधींतच महाराज मात्र जगतापांच्या कामावर प्रसन्न झाले. 'लेफ्टनंट'चा हुद्दा त्यांना देण्यांत आला. लेफ्टनंटच्या पोषाखांतील जगतापांचा ऐन तिशींतला (१९१७) फोटो पाहण्यासारखा आहे. त्यांच्या घरीं जर तुम्ही कधीं गेलांत तर तेथें तो तुम्हांला दिसेल. लष्करी पोषाखांत जगताप फार रुबाबदार दिसतात. पण फोटोकडे पाहून एक गोष्ट माझ्याप्रमाणेंच तुमच्याहि मनांत कदाचित् येईल. लष्करी पोषाख घातल्यानेंहि त्यांच्या चेहऱ्यावरील सात्त्विकता लपत नाहीं. लेखणीला जर तलवारीचें म्यान तोंडापर्यंत चढविलें तर जसें दिसेल तसें दिसतें.

तलवारीला रामराम ठोकून लेखणीची, म्हणजेच विद्येची, उपासना करण्यासाठीं जगताप बडोद्यास गेल्यापासून उण्यापुऱ्या दोन वर्षांतच माघारीं आले हें वाचून वाचकांना आश्चर्याचा धक्का बसल्यास नवल नाहीं. त्यासंबंधींची हकीकत थोडक्यांत सांगायची तर अशी : सुप्रसिद्ध समाजसेवक कै. कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे यांच्याशीं जगतापांचा बडोद्याहून पत्रव्यवहार चालू होता. आपल्या मनांतील अस्वस्थता व तळमळ त्यांनीं कर्मवीरांजवळ

प्रकट करून त्यांचा सल्ला मागणें चालविलें होतें. पहिल्या दोन पत्रांत जगतापांनीं शिक्षणदानाचें कार्य हातीं घ्यावें असें कर्मवीरांनीं निश्चितपणें सुचाविलें होतें. पण जेव्हां जगतापांकडून पुनः पत्र आलें तेव्हां त्यांनीं तडकाफडकी थोडेसें झटकून टाकल्यासारखें लिहिलें कीं, "नुसता सल्ला विचारण्यासाठीं पुनः मला पत्र लिहूं नका." कर्मवीरांसारख्या आदरणीय व्यक्तीनें आपल्या स्वाभिमानाला व ध्येयवादाला डिवचलें असें जगतापांना वाटलें व या आव्हानाचा स्वीकार करण्यासाठीं ते लगोलग पुण्यास आले. त्यांनीं येथें शाळा उघडली व नंतर बडोद्याच्या ऐषआरामी नोकरीचा राजीनामा महाराजांकडे धाडून दिला !

१९१८ च्या जुलैमध्यें पुण्यांतील शुक्रवार पेठेंतल्या सरदार पानसे यांच्या वाड्यांतल्या एका खोलींत जगतापांची शाळा सुरू झाली. पहिल्या दिवशीं विद्यार्थी अवघे दोन ! जगतापच हेडमास्तर, जगतापच मास्तर, जगतापच कारकून, जगतापच पट्टेवाला. सुदैवानें त्यांची पत्नी पतीच्या नव्या कार्यांत उत्साहानें समरस झाली. जागा सारवून रोज केर काढण्यापर्यंत सर्व लहान-सहान कामें उभयतां पतिपत्नी करीत. बाबूरावांची अंगीकृत कार्यावरील श्रद्धा दांडगी होती, आत्मविश्वास जबरदस्त होता आणि त्याग करण्याची तयारीहि मोठी होती. त्यामुळें अवघ्या वर्ष-दोन वर्षांतच त्यांच्या शाळेची गणना पुण्यांतील प्रमुख शाळांत होऊं लागली. मराठा मनुष्य विद्यादानाचें कार्य स्वार्थत्यागपूर्वक व उच्च दर्जा कायम राखून करूं शकतो असा नवा आत्म-विश्वास बहुजनसमाजाच्या मनांत निर्माण झाला.

१९१८ सालापुढील त्यांचें जीवन म्हणजे त्यांच्या आवडत्या 'श्रीशिवाजी मराठा हायस्कूल'चें जीवन होय. जगताप म्हणजे शिवाजी शाळा व शिवाजी शाळा म्हणजे जगताप असें समीकरण अखिल महाराष्ट्रांत गेलीं तीस-पसतीस वर्षें रूढ आहे. पुण्यांतीलच नव्हे तर महाराष्ट्रांतील एक प्रमुख शिक्षणकेंद्र म्हणून जगतापांनीं सुरू केलेल्या, हायस्कूल, प्राथमिक शाळा, गांधी ट्रेनिंग कॉलेज आदि संस्थांकडे अभिमानानें बोट दाखवितां येईल.

वयाला अडुसष्ट वर्षें उलटून गेलेल्या जगतापांचा कामाचा पसारा पाहून कोणाचेंहि मन थक्क होऊन जाईल. काम करण्याची त्यांची उमेद

व शक्तीहि आश्चर्यकारक आहे. पहाटेपासून रात्रीपर्यंत केव्हांहि त्यांच्याकडे गेलांत तरी ते कांहीं तरी काम करीत आहेत असेंच तुम्हांला दिसेल. शिवाय सदा हंसतमुख. दुखवून कोणाला बोलावयाचे नाहींत. कोणाला रागवावयाचें नाहींत. एखाद्याचा मुद्दा पटला नाहीं व म्हणून विरोध करावयाचा झाला तर तो इतक्या गोड भाषेंत करतील कीं, समोरच्या माणसास ते आपल्या विरुद्ध बोलत आहेत हें प्रथमतः लक्षांतहि यावयाचें नाहीं. त्यामुळें पुण्यांतील सर्व राजकीय पक्षांच्या मंडळींकडे त्यांचें येणें-जाणें असतें. त्यांचें वैयक्तिक जीवन अत्यंत शुद्ध आहे. पत्नीच्या अंगावर त्यांनीं कधीं सोनें घातलें नाहीं. मिशनरी व्रतानें आपण बांधलेलों आहों अशी त्यांची श्रद्धा आहे. पुण्यामधील 'प्रार्थना समाजा'चे ते प्रमुख सभासद आहेत. एका उच्च धार्मिक पातळीवर त्यांचें मन सतत वावरत असतें. पहाटें उठणें, नियमित फिरण्याचा व्यायाम घेणें, थंड पाण्यानें स्नान करणें, या उतारवयांतहि स्वतःचे कपडे स्वतः धुणें, चहा-सिगारेट-सुपारी अशी कोणतीहि संवय नसणें हीं चटकन् विश्वास न बसणारीं वैशिष्ट्यें जगतापांच्या जीवनांत आहेत. त्यांचें अक्षर फार सुंदर आहे. कोणतेंहि काम करावयाचें तर तें अत्यंत व्यवस्थितपणें करावयाचें असा त्यांचा स्वभाव बनलेला आहे. त्यांचा विद्यार्थिवर्ग सर्व महाराष्ट्रभर पसरलेला आहे. त्यापैकीं कोणी विद्यार्थी तुम्हाला भेटल्यास तो जगतापांची मुक्तकंठानें स्तुति करीत आहे असेंच तुम्हाला आढळून येईल.

मराठ्यांच्या शिक्षणासाठीं जरी त्यांनीं कार्य केलें असलें तरी तें मानवतावादी उच्च पातळीवरून केलेलें असल्यानें त्यांच्या कार्याचें मोल वाढलेलें आहे. मराठा समाजाच्या उन्नतीपासून सुरुवात करीत करीत त्यांची सेवावृत्ति अखिल बहुजनसमाजाच्या व सर्व थरांतील दलितांच्या सेवेसाठीं तत्पर होत गेलेली दिसते. सध्यां ते जाति-धर्म-पंथ-राष्ट्र यांतील भेद नष्ट करण्याची तत्त्वप्रणाली पुढें मांडणाऱ्या महर्षि कर्वे यांनीं स्थापिलेल्या 'समता-संघा'चे प्रमुख आधारस्तंभ आहेत. आणि त्याचप्रमाणें 'जातिनिर्मूलन संस्था' या हिंदु समाजांतील जातींमधील विषमता नष्ट करण्यासाठीं झटणाऱ्या संस्थेचे ते मुख्य चिटणीस आहेत. शिक्षणक्षेत्राप्रमाणेंच समाजक्षेत्रांतहि जगताप कळकळीनें कार्य करीत आहेत. जगतापांच्या मनाची ही उत्क्रान्ति त्यांना लहानपणीं मातृनिधनामुळें मिळालेल्या धक्क्यामुळेंच शक्य झाली असावी असा माझा कयास आहे.

दुःखाच्या आत्मानुभूतींतुन समाजकार्याकडे वळणारीं माणसें सामान्यतः मानवतावादी पातळीवरूनच आपापल्या सेवाक्षेत्रांत रममाण होतात. स्वातंत्र्योत्तर नवभारताची प्रभावशाली उभारणी होत असतांना जगतापां-सारख्या शिक्षणाचार्यांकडून व कर्त्या सुधारकाकडून बहुमोल मार्गदर्शन मिळेल, यांत काय संशय ?

केल्यानें होत आहे रे
आधीं केलेंचि पाहिजे.

बा. ग. जगताप

ता. ५।५।६६



‘ प्रत्येक हृदयांत ईश्वराचा अंश झोपलेला असतो; फक्त तो अंश जागा होण्याची गरज असते ’ अशा अर्थाचें एक इंग्रजी सुभाषित आहे. खरोखरीच हें सुभाषित फार अर्थपूर्ण आहे. आपण प्रत्येकजण वरवर दिसायला सारखेच असतों, चार-चौघांसारखें असतों, सामान्य असतों; परंतु जर आपल्या हृदयांत कसली तरी अलौकिक तळमळ जागी झाली तर त्या हृदयांतील ईश्वरी अंश जागृत होईल यांत काय नवल ! कर्वे यांच्या हृदयांतील ईश्वरी अंश कांहीं एका योगायोगानें जिवंत झाला व त्या ईश्वरी अंशाची निष्ठापूर्वक उपासना करण्यांत त्यांनीं पुढील सर्व आयुष्य वेंचल्यामुळेंच त्यांचें मूळचें सामान्य जीवन असामान्यत्वाला पोंचलेलें आहे.

गेल्या विजयादशमीची गोष्ट. सोनं देण्यासाठीं म्हणून मीं महर्षि कर्वे यांच्याकडे गेलों होतों. त्यांच्या हातांत आदरपूर्वक शमीचीं पानं ठेवून नमस्कार करण्यासाठीं मीं वाकलों. तेव्हां त्यांच्या कृश देहाकडे पाहून माझ्या मनांत एकदम विचार आला कीं, " मी कोणापुढें वाकत आहें ? अठ्याण्णव नव्याण्णव पावसाळ्यांना यशस्वी रीतीनें तोंड देऊन उभ्या असलेल्या या परिपक्क देहापुढें नम्र होत आहे का लोकक्षोभाची पर्वा न करतां साठ-बासष्ट वर्षांपूर्वीं विधवेशीं विवाह करणाऱ्या खंबीर मनाच्या एका सुधारकापुढें मान लववीत आहें ? का विधवांच्या व कुमारिकांच्या शिक्षणाचा प्रसार करण्यासाठीं हिंगण्याच्या तपोभूमींत संस्थांचें जाळें विणणाऱ्या या कुशल कार्यकर्त्याला वंदन करीत आहें ? का स्त्रीजीवनाची सर्व अंगांनीं झपाट्यानें प्रगति व्हावी म्हणून महत्प्रयासानें ' अखिल भारतीय महिला विद्यापीठ ' स्थापन करणाऱ्या एका द्रष्ट्या समाजनेत्याविषयीं आदर प्रकट करीत आहें ? का जातिभेदांमुळें व अस्पृश्यतेमुळें पोखरल्या गेलेल्या भारतीय समाजाला नवचैतन्य आणण्यासाठीं ' जातिनिर्मूलनसंस्था ' व ' समता संघ ' या महत्त्वाच्या संस्थांना जन्म देणाऱ्या थोर मनाच्या महाभागाचा आशीर्वाद मागत आहें ? "......अशा विचारलाटा माझ्या मनांत उद्‌भवत असतांनाच नमस्कार संपवून मी पूर्ववत् उभा राहिल्यानें माझी विचार-मालिका खंडित झाली.

आजहि तो विजयादशमीचा प्रसंग डोळ्यापुढें आला कीं, माझ्या मनांत गूढ भावना निर्माण होतात. महर्षि कर्व्यांच्या सहवासांत जरी केव्हांहि दोन-चार क्षण घालवावयास मिळाले तरी मला ते अमोल वाटतात. महाराष्ट्राचें हें एक मोठें भाग्य आहे कीं, अण्णासाहेब कर्वे या उतारवयांतहि सभा-संमेलनांतून थोडाफार भाग घेऊं शकतात व घरीं भेटायला येणाऱ्या मंडळींशीं चार शब्द बोलूं शकतात. शरीरानें ते आतां थकत चालले आहेत हें खरें; पण त्यांचें मन अजूनहि एका युयुत्सु ध्येयवादी तंद्रींतच वावरत असतें व त्यामुळें अण्णासाहेबांना भेटून आल्यानंतर म्हाताऱ्या माणसाला भेटून आल्यासारखें वाटत नाहीं. प्रकृतीसंबंधीचें रडगाणें ते येणाऱ्याजाणाऱ्याजवळ, फार काय आप्तेष्टांजवळसुद्धां, गात नाहींत. त्यांच्या विशिष्ट कोकणी स्वरांत व खणखणीत आवाजांत ते अजून बोलतात. त्यामुळेंच

त्यांना भेटून परत येतांना आपण उत्साही मनानें परत येतों. ज्या युवक-युवतींना महर्षि कर्व्यांचें दर्शन घेण्याची सुसंधि अद्यापि लाभलेली नसेल, ते एका उच्च आनंदाला व गूढ अनुभवाला मुकलेले आहेत असेंच म्हटलें पाहिजे.

महर्षींना पाहिलें कीं, १८५८ ते १९५६ एवढा मोठा अठ्याण्णव वर्षांचा कालखंड सशरीर होऊन जिवंतपणें आपल्यापुढें उभा आहे असें वाटतें. अठ्याण्णव वर्षें! केवढा प्रदीर्घ काळ आहे हा! या काळांत केवढ्या विलक्षण व क्रांतिकारक घडामोडी आपल्या देशांत व महाराष्ट्रांत झालेल्या आहेत. या चार-पांच पिढ्यांमध्यें आपलें जीवन मुळापासून हलविलें गेलें आहे. नवा समाजच निर्माण झालेला आहे. त्यामुळें जुन्या समाजाचें स्वरूप कसें होतें, आपले पणजे किंवा खापरपणजे आयुष्य कसें जगत होते याची कल्पना करणेंहि कठीण होऊन बसतें. त्यामुळेंच बाळशास्त्री जांभेकर, महात्मा फुले, न्यायमूर्ति रानडे, विष्णुशास्त्री चिपळूणकर, लोकमान्य टिळक, प्रिन्सिपॉल आगरकर, नामदार गोखले आदि अग्रगण्य लोकनायकांच्या कार्यांचें महत्त्व किती होतें, याची कल्पनाहि करणें सध्यां शाळा-कॉलेजांत असलेल्या युवकवर्गाला कठीण जातें. रानडे, चिपळूणकर, फुले, टिळक आदि वर उल्लेख केलेल्या व्यक्तींच्या कार्यासंबंधीं कोणी सांगूं लागलें, तर तें वर्णन खूप दूरच्या भूतकाळांतील आहे असें आजच्या युवकवर्गाला वाटतें. हा असा समज होण्याचें मुख्य कारण म्हणजे वरील सर्व व्यक्ति दिवंगत आहेत. सुदैवानें महर्षि कर्वे हयात आहेत व त्यामुळें त्यांचें कार्य ताजें वाटतें. वास्तविक टिळक—आगरकर व कर्वे यांच्या वयांत अवघ्या दोन वर्षांचें अंतर होतें. टिळक व आगरकर यांचे जन्म १८५६ सालामधील, तर कर्वे यांचा जन्म १८५८ मधील!

अण्णासाहेबांनीं जरी कोणतेंहि सार्वजनिक कार्य केलें नसतें, तरी त्यांच्या विद्यार्थिदशेचा इतिहास लिहिण्यासारखाच झाला असता यांत मुळींच संशय नाहीं. विद्यार्थिजीवनांत जितक्या अडचणी येणें शक्य असतें तितक्या बहुतेक सर्व अडचणी त्यांना आलेल्या होत्या. लहानशा गांवांत जन्म; घरची अत्यंत गरिबी; मुलानें प्राथमिक शिक्षक व्हावें इतकीच आईबापांची

अपेक्षा; शरिराची अंगलट अशी कीं, वयाला सतरा वर्षें पूर्ण झालेलीं असूनहि परीक्षकांना तें न पटल्यानें त्यांनीं प्राथमिक शालान्त परीक्षेला बसूं देण्यास नकार दिलेला व त्यामुळें विलक्षण निराशा वांट्यास आलेली; योगायोगानें गांवांतच इंग्रजी शिक्षणाची व्यवस्था जमलेली, पण त्यांतहि अनेक विघ्नें; पुढें कर्ज काढून हायस्कूल-शिक्षणासाठीं मुंबईस जाण्याचें धाडस केलेलें, तेथें स्वयंपाक हातानें करून व शिकवण्या वगैरे अनेक लहान-सहान कामें करून थोडेफार पैसे मिळविण्याचा प्रयत्न केलेला; त्यांतच मोठी विपत्ति म्हणजे मुंबईस येऊन सात-आठ महिने झाले नाहींत तोंच वडिलांच्या मृत्यूचा भयंकर धक्का; तशा स्थितींतहि नादारी मिळवून व शिकवण्यावर पैसे संपादून मोठ्या कष्टानें पार पाडलेलें बी. ए.पर्यंतचें शिक्षण ...या अशा विविध अडचणींची हकीगत जरी कोणा विद्यार्थ्यानें वाचली तरी त्याला ती अत्यंत स्फूर्तिदायक वाटेल. सुदैवानें, खास युवकवर्गासाठीं म्हणून कर्वे यांनीं आपल्या विस्तृत 'आत्मवृत्ता'ची संक्षिप्त आवृत्तीहि तयार केली आहे. हें अवघ्या दोनशें पानांचें पुस्तक प्रत्येक युवकानें व युवतीनें अवश्य वाचावें अशी माझी आग्रहाची शिफारस आहे. हें पुस्तक वाचीत असतांना एक थोर गृहस्थ आपल्या हृदयाचें कपाट खोलून आपल्याला दाखवीत आहेत असाच अनुभव तुम्हांला येईल. आत्मप्रौढी किंवा आत्मसमर्थन या उद्देशांनीं लिहिलेलीं कांहीं आत्मचरित्रें असतात. कर्व्यांचें ' आत्मवृत्त ' तसें नाहीं. तें एक साधेंसुधें, जसें घडलें तसें सांगणारें प्रामाणिक वृत्त आहे. तें कर्व्यांचें वृत्त नसून त्यांच्या आत्म्याचें वृत्त आहे असें म्हणावेसें वाटतें. महात्मा गांधींचें आत्मवृत्त (**सत्याचे प्रयोग**) वाचीत असतांना आपल्या हृदयावर जसे उच्च संस्कार होतात, तसेच कर्व्यांचें आत्मवृत्त वाचतांना होतात. जो युवक अगर जी युवती कर्व्यांचें आत्मवृत्त वाचणार नाहीं तो अगर ती अभागी होय असें म्हटलें पाहिजे.

अर्थात् कर्व्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा व कार्याचा थोरपणा समजण्याच्या दृष्टीनें त्यांच्याकडे पाहण्याचा विशिष्ट दृष्टिकोन ( perspective ) निर्माण होण्याची गरज आहे. माणसें जन्मतःच अलौकिक असतात अगर जन्मतःच सामान्य असतात, अशी ज्या युवकांची समजूत झालेली असेल त्यांना कर्वे

यांच्या थोरपणाचें रहस्य सहजासहजीं उलगडणार नाहीं. प्रभावी वाणीनें व्यासपीठें गाजविणें, चुरचुरीत किंवा विद्वत्तापूर्ण लेखनानें वाचकांचीं मनें जिंकणें, राजकीय प्रश्नांवर चळवळी उभारणें व तुरुंगांत जाणें या कारणांमुळेंच माणसें थोर या पदवीस पोंचतात किंवा ज्यांच्या अंगीं हे गुण नसतात त्यांना थोरपणा प्राप्त होत नाहीं अशी ज्यांची समजूत झालेली असेल त्यांना कर्वे यांच्या कार्याचें मोजमाप करणें कठीण जाईल. कर्वे यांच्यासारखे अबोल कार्यकर्ते महाराष्ट्रांत फार झालेले नाहींत, फार काय भारतांतहि झालेले नाहींत व त्यामुळें कर्वे यांच्या व्यक्तिमत्त्वाचें रहस्य समजून घेणें अनेकांना अवघड जातें.

कार्याच्या तळमळीमुळें एखादा वरवर सामान्य वाटणारा माणूस असामान्य कर्तबगारी कशी गाजवूं शकतो व समाजाची बहुमोल सेवा कशी करूं शकतो, याचें उत्कृष्ट उदाहरण म्हणजे महर्षि कर्वे यांचें जीवन होय. 'प्रत्येक हृदयांत ईश्वराचा अंश झोंपलेला असतो; फक्त तो अंश जागा होण्याची गरज असते' अशा अर्थाचें एक इंग्रजी सुभाषित आहे. खरोखरीच हें सुभाषित फार अर्थपूर्ण आहे. आपण प्रत्येकजण वरवर दिसायला सारखेच असतों, चार-चौघांसारखे असतों, सामान्य असतों; परंतु जर आपल्या हृदयांत कसल्या तरी अलौकिक तळमळीनें पेट घेतला तर आपल्यामधील ईश्वरी अंश जागा होईल यांत काय नवल ! कर्वे यांच्या हृदयांतील ईश्वरी अंश कांहीं एका योगायोगानें जिवंत झाला व त्या ईश्वरी अंशाची निष्ठापूर्वक उपासना करण्यांत त्यांनीं पुढील सर्व आयुष्य वेंचल्यामुळेंच त्यांचें मूळचें सामान्य जीवन असामान्यत्वाला पोंचलेलें आहे.

१८९२ व १८९३ हीं दोन वर्षें महर्षि कर्वे यांच्या जीवनांतील अत्यंत महत्त्वाचीं वर्षें आहेत. या दोन वर्षांत दोन महत्त्वाच्या घडामोडी घडल्या व त्यांच्यामुळेंच कर्व्यांच्या जीवनाचा घाटच एकदम बदलून गेला.

१८९२ सालीं त्यांची पुण्याच्या फर्ग्युसन कॉलेजांत गणिताचे प्राध्यापक म्हणून नेमणूक झाली. कर्व्यांच्या जीवनांतील ही अत्यंत अनपेक्षित घटना होती. हायस्कुलांतील शिक्षक म्हणून मुंबईतच आपलें सर्व आयुष्य जाणार अशी कर्व्यांची एव्हांना खात्री झालेली होती. १८८४ सालीं बी. ए.

झाल्यापासून सतत आठ वर्षे त्यांनीं शिक्षकाचेंच काम केलें होतें. त्यांत त्यांचा जमहि बसलेला होता. खाजगी शिकवण्यांमुळें त्यांना आर्थिक प्राप्तीहि चांगली होत होती. जुनें कर्ज फेडून टाकून त्यांनीं थोडीफार शिल्लकहि मागें टाकली होती. पण इतक्यांत १८९१ च्या अखेरीस नामदार गोपाळ कृष्ण गोखले यांचें कर्व्यांना एक पत्र आलें! या पत्रांत गोखल्यांनीं कर्व्यांना ' पुण्यास फर्ग्युसन कॉलेजांत येतां का ' असें विचारलें होतें. गोखल्यांचें पत्र पाहून कर्व्यांचा त्यावर प्रथम विश्वास बसेना. इतका हा अकल्पित योग होता. गोखले व कर्वे हे एल्फिन्स्टन कॉलेजांत बी. ए. ला सहाध्यायी होते. त्यामुळें कर्वे यांची खरी योग्यता गोखले जाणून होते. म्हणून त्यांनीं कर्वे यांना पुण्यास प्रोफेसराची जागा स्वीकारण्यास बोलाविलें होतें. त्याप्रमाणें कर्वे लवकरच पुण्यास आले व १८९२ च्या एप्रिलांत त्यांना डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे आजीव सदस्य होण्याची बहुमोल संधि प्राप्त झाली.

१८९३ सालीं आणखी एक महत्त्वाचा प्रसंग कर्व्यांच्या आयुष्यांत घडला. तो म्हणजे ११ मार्च रोजीं त्यांनीं एका विधवेशीं विवाह केला.

विधवा-विवाह ! विधवा-विवाह म्हणजे त्या काळीं अत्यंत अधर्म्य गोष्ट समजली जात होती. एखाद्या पुरुषाची बायको वारली तर त्याला रूढी-प्रमाणें पुनः विवाह करण्याची परवानगी होती. पण एखाद्या स्त्रीचा जर नवरा वारला तर तिनें जन्मभर अविवाहितच राहिलें पाहिजे अशी धर्म-रूढींची सक्ती असे. स्त्रियांना व पुरुषांना असे वेगवेगळे म्हणजेच पक्षपाती नियम लावणें हें माणुसकीला किती सोडून होतें याचा विचार करा. पण शेंकडों वर्षें हे नियम चालत आलेले होते व त्यांच्या जुनेपणामुळें ते भोळ्याभाबड्या समाजाला अधिकच प्रिय झाले होते ! विधवा–विवाहावरील प्रतिबंधामुळें केवळ विधवांवरच अन्याय होत होता असें नाहीं, तर लहान वयाच्या कुमारिकांवरहि अन्याय होत होता. कसें तें पाहा. एखाद्या पुरुषाची बायको त्याच्या कोणत्याहि वयाला वारली तरी तो कुमारिकेशींच लग्न करी. आणि त्या काळीं कुमारिका प्रौढ नसतच. दहाबारा, फार तर चौदा वयापर्यंत सर्व मुलींचीं लग्नें झालेलींच असत. चौदा वयापलीकडे मुलींना बिनलग्नाच्या ठेवणें

हा अधर्म मानीत असत. या अशा परिस्थितीमुळें चाळीशी किंवा पन्नाशी ओलांडलेले पुरुषहि पहिली बायको वारल्यावर दहा-बारा वर्षांच्या अजाण मुलींशीं लग्न करीत. हा निष्ठुर व्यवहार हिंदुसमाजाच्या रक्तांत शेंकडों वर्षांच्या रूढीमुळें इतका मुरून गेलेला होता कीं, त्यांत आपण कांहीं गैर करीत आहोंत असेंहि फारसें कोणाला वाटत नसे. आणि त्यांतून ज्या चार-दोन टक्के सज्जनांना वाटत असे ते विधवांच्या दुःखाशीं व त्याच-प्रमाणें विधुरांना दिल्या जाणाऱ्या अल्पवयी कुमारिकांच्या दुःखाशीं वैचारिक सहानुभूति व्यक्त करून स्वस्थ बसत असत. लेखांमध्यें किंवा भाषणांमध्यें विधवाविवाहाचें समर्थन करणारे गृहस्थ आपणा स्वतःवर प्रसंग आला कीं दहा-बारा वर्षांच्या मुलीशीं लग्न करून मोकळे होत असत!

कर्वे यांचें पहिलें लग्न वयाच्या पंधराव्या वर्षी झालें होतें. त्या वेळीं त्यांची पत्नी नऊ वर्षांची होती. बी. ए. च्या वर्गांत असतांना कर्व्यांच्या संसारास सुरुवात झाली होती व हळूहळू कर्व्यांना प्राप्तीहि बरी होऊं लागल्यानें त्यांच्या संसाराचा जम चांगला बसूं लागला होता. पण अशा वेळीं दुर्दैव आड आलें! थोड्याशा आजारानंतर १८९१ सालीं राधाबाई मरण पावल्या.

आतां संसाराची व मुलाबाळांची पुढें व्यवस्था काय? कर्वे यांनीं पुनः लग्न करावें म्हणून नातेवाईकांनीं आग्रह केला. त्यांना मुली सांगून येऊं लागल्या. अर्थात् रूढीप्रमाणें त्या सर्व अल्पवयी कुमारिकाच होत्या. कर्वे यांचें मन असें लग्न करण्याकडे होईना. त्यांच्या मनाची कालवाकालव होऊं लागली. याच सुमारास ते फर्ग्युसन कॉलेजांतील नोकरीसाठीं पुण्यास आले. पुण्याच्या हवापाण्यांत कोणता गुण आहे कोणास ठाऊक! परंतु एवढें खरें कीं, एखाद्या व्यक्तीचा आत्मविश्वास वाढविण्याचा गुण पुण्याच्या हवापाण्यांत विशेष असावा असें वाटतें. शिवाय आणखी एक गुण आहे. तो म्हणजे व्यक्तीचें समाजमन जागें करण्याचा. कर्वे यांचें समाज-मन आधींच जागें झालेलें होतें—पुण्यांत आल्यानें गोखले-आगरकर इत्यादि नेत्यांचा नित्य सहवास घडूं लागल्यानें तें अधिकच प्रज्वलित होत गेलें. ‘कांहीं झालें तरी मी कुमारिकेशीं विवाह करणार नाहीं’ असा निश्चय कर्व्यांनीं केला. पण ही अर्धी लढाई जिंकणें होतें. ती त्यांनीं जिंकली. पण

पुढें काय ? ते जन्मभर अविवाहित राहणार होते काय ? तसें राहण्याबद्दल कदाचित् लोकांनीं त्यांची स्तुति केली असती. पण विधवांच्या दुःखांचें व एकूणच स्त्रीसमाजाच्या वांट्यास येणाऱ्या दुःखांचें अहर्निश चिंतन करूं लागल्यामुळें त्यांचें समग्र जीवनच उच्च पातळीवर जाऊं लागलें होतें. ' मी स्वतः विधवेशीं विवाह करीन व नंतर समाजाला त्याबद्दल उपदेश करीन ' असें त्यांनीं अखेरीस ठरविलें.

हा निश्चय सोपा नव्हता. जिवंतपणीं आप्तेष्टांना मुकण्याचें भयंकर दुःख त्यांत होतें. समाजाकडून वाळींत पडण्याची भीति त्यांत होती. ( आणि हें सर्व पुढें त्यांच्या वांट्यास आलेंहि. ) पण या अडचणींना न जुमानतां कर्वे यांनीं ११ मार्च १८९३ रोजीं गोदूबाई जोशी या नांवाच्या विधवेशीं विवाह केला व असें लोकोत्तर धैर्य दाखवून त्यांनीं आपल्या वैयक्तिक जीवनांतील उत्क्रान्तीचें नवें दालन उघडलें; इतकेंच नव्हे तर महाराष्ट्रीय स्त्रीसमाजाच्या विकासाची, वेडगळ रूढींच्या अजस्र भिंतींनीं शेंकडों वर्षें अडवून धरलेली वाट त्यांनीं फोडून दिली.

१८९३ सालापासून पुढील बावीस वर्षें कर्वे यांच्या जीवनाचे दोन भाग पडले. दिवसाचे विशिष्ट ठराविक तास ते फर्ग्युसन कॉलेजांत अगर न्यू इंग्लिश स्कूलमध्यें शिकवीत व उरलेला सर्व वेळ स्त्रीवर्गाच्या उन्नतीसाठीं करावयाच्या कामाला देत. १९१४ सालीं ते डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या सेवेंतून निवृत्त झाले व तेव्हांपासून शरीरांत हिंडण्या-फिरण्याची ताकद असेपर्यंत, म्हणजे जवळजवळ १९४८ च्या अखेरीपर्यंत ते दिवसाचा सर्व वेळ आपल्या संस्थांच्या कामासाठीं देत.

एखाद्या चंदनाप्रमाणें झिजत झिजत कर्वे यांनीं स्त्रीसमाजाची सेवा केलेली आहे. त्यांच्या जीवनांत चमत्कार नाहींत, पण नाट्य मात्र भरपूर आहे. सार्वजनिक कार्यावरील त्यांची निष्ठा पणाला लागेल असे किती तरी आणीबाणीचे प्रसंग त्यांच्या जीवनांत येऊन गेलेले आहेत. कष्ट करण्यांत त्यांनीं कदापीहि कसूर केलेली नाहीं. नवीन नवीन युक्त्या शोधून काढून आपलें कार्य चिकाटीनें पुढें नेण्यांत त्यांनीं अपूर्व करामत दाखविलेली आहे. अंगीकृत कार्यासाठीं पैसा जमविण्याकरितां व नवीन कल्पनांचा शोध घेण्याकरितां त्यांनीं भारताच्या कानाकोपऱ्यांत दौरे


काढले आहेत; असेंच नव्हे तर अमेरिका, युरोप, आफ्रिका या खंडांत व पूर्वेकडे जपानपर्यंत त्यांनीं संचार केलेला आहे. लाखों रुपये जमा करून त्याचा त्यांनीं काटकसरीनें विनियोग केला आहे व शेंकडों नव्हे हजारों भारतीय मुलींना सुमार्ग दाखविलेला आहे.

आपल्या हातून घडलेल्या या अवाढव्य सार्वजनिक सेवेविषयीं यत्किंचितहि गर्वाची भावना त्यांच्या मनांत नाहीं. स्वतःसंबंधीं तर ते नम्रपणानें असें म्हणतात कीं, " माझी किंमत मी जाणून आहें. मी मोठेंसें कांहीं केलें नाहीं ही जाणीव मला आहे. पण परिस्थितीच्या व सद्दीच्या जोरावर लहानसें कार्य माझ्या हातून झालें आहे असें मला वाटतें व त्याबद्दल समाधानहि होतें. " आत्मचरित्रांतच ते पुढें एके ठिकाणीं म्हणतात, " आपण, आपली बायको व आपलीं मुलें एवढेंच काय तें आपलें कुटुंब आणि इतक्यांचें सुख साधलें कीं इहलोकींच्या आपल्या कर्तव्याची सीमा झाली असें ज्यांच्या कृतींत दिसून येतें, असे मनुष्यप्राणी या जगांत किती तरी आढळतात आणि सुशिक्षितांमध्यें देखील अशांच प्रमाण असावें त्यापेक्षां किती तरी अधिक आढळतें. सुदैवानें माझ्या मनावर बरे संस्कार होऊन माझी बुद्धि इतकी आकुंचित राहिला नाहीं. "

दुर्दैवानें आपल्या समाजांत अजून किती तरी रूढिग्रस्त अन्याय मूळ धरून आहेत व परिस्थितिपरत्वें नवीन अन्याय निर्माण होत आहेत. म्हणून कर्वे यांच्या चरित्रापासून स्फूर्ति घेणारे शेंकडों युवक व युवती पुढें सरसावण्याची आवश्यकता किती आहे हें काय सांगावयास पाहिजे? अलौकिक त्याग करणारे थोडे पुढारी पुढें सरसावून यापुढें आपल्या स्वातंत्र्योत्तर भारतीय समाजाचें भागणार नाहीं. आतां शेंकडों, नव्हे हजारों सुशिक्षित तरुण-तरुणी समाजहितबुद्धीनें पुढें येण्याची गरज आहे. उदरंभरणासाठीं दुसरा व्यवसाय करून व संसार नेटका करून आणि कणाकणाला व क्षणाक्षणाला जपून, एखाद्या आवडीच्या व आटोपशीर समाजक्षेत्रांत रममाण होणारे कर्व्यांसारखे कर्मवीर आतां अधिक हवे आहेत. हें कसें शक्य आहे असा ज्यांना प्रश्न पडत असेल त्यांनीं कर्वे यांचें समग्र आत्मवृत्त लक्षपूर्वक वाचावें. त्या आत्मवृत्तासंबंधीं रँग्लर र. पु. परांजपे यांनीं असे उद्गार प्रस्तावनेंत काढले आहेत कीं, " अण्णा

कर्वे यांनीं आपल्या देशाच्या उन्नतीकरितां जीं अनेक बहुमोल कामें केलीं आहेत, त्यांतच आत्मवृत्त लिहून आणखी एक महत्त्वाची भर घातली आहे."

१९५७ च्या १८ एप्रिलला अण्णासाहेबांच्या वयाला नव्याणव वर्षें पूर्ण होऊन शंभरावें सुरू होत आहे. प्रत्येक वर्षाचा १८ एप्रिल हा दिवस महाराष्ट्राच्या इतिहासांतील एक पवित्र दिवस म्हणून सर्वांनीं मानला पाहिजे. त्या दिवशीं सर्व युवकयुवतींनीं अंतर्मुख होऊन आपल्या समाजापुढील तांतडीचे प्रश्न सोडविण्यासाठीं विचारपूर्वक कंबर कसली पाहिजे.





ज्या खैर कुटुंबांत आजपर्यंत कोणतेंच वैशिष्ट्य दिसत नव्हतें, त्याच कुटुंबांत एका धगधगत्या महत्त्वाकांक्षेचा उदय झालेला दिसूं लागला. अडचणी किंवा संकटें नसलेल्या सामान्य परिस्थितींत माणसाच्या कर्तृत्वाला आव्हान मिळत नाहीं. म्हणूनच कीं काय दुर्दैवाचे तडाखे माणसाला अधूनमधून बसत असतात ! कर्त्या पुरुषाच्या निधनामुळें निर्माण झालेल्या भीषण परिस्थितीमुळें खचून न जातां अण्णांच्या आईनें प्राप्त परिस्थितीचें आव्हान स्वीकारलें व कष्टांची पराकाष्ठा चालविली. हळूहळू मुलें मोठीं होऊं लागलीं. त्या मुलांनाहि तिनें आपल्या महत्त्वाकांक्षेची दीक्षा दिली. त्यांना शाळेंत घातलें व कांहीं झालें तरी शाळा सोडूं नका असा कानमंत्र त्यांना दिला.

शाळा सुरू होऊन सुमारें वीस-पंचवीस मिनिटें होऊन गेलीं होतीं. मास्तरांचें शिकवणें अगदीं रंगांत आलें होतें. इतक्यांत वर्गाच्या दाराशीं एक मुलगा येऊन उभा राहिला. मास्तरांनीं त्याच्याकडे ढुंकूनहि पाहिलें नाहीं. त्यांची शिस्त फार कडक असे. मुलांनीं शाळेंत उशीरां आलेलें त्यांना खपत नसे. जरा वेळानें रागीट स्वरांत त्यांनीं विचारलें, “ कां उशीर झाला तुला ? ” पण यावर तो मुलगा काय उत्तर देणार ? तो मान खालीं घालून मुकेपणानें उभा राहिला. असें त्यानें कां केलें ? कारण, मास्तरांच्या प्रश्नाला उत्तर द्यावयाचें म्हणजे आपल्या दारिद्र्याला व आपत्तींना वाचा फोडण्याचें दिव्य पार पाडण्यासारखेंच होतें. “ मी सकाळीं लवकर उठून ‘ केसरी ’, ‘ राष्ट्रमत ’ हीं वर्तमानपत्रें विकतों, नंतर पैसे मिळविण्यासाठीं लहानसहान कामें करतों, त्यानंतर माधुकरी मागण्यासाठीं हिंडून येतों व कसे तरी चार घास घशाखालीं लोटून धांवत धांवतच शाळेला येतों—” अशी सर्व हकीकत सांगण्याची त्या मुलाला लाज वाटली असावी. ‘ मला शाळा आवडत नाहीं म्हणून मी शाळेला उशीरां आलों असें नाहीं; तर शाळा मला फार आवडते म्हणून सकाळ-संध्याकाळ मोल-मजुरीचीं कामें करून मी धांवतपळत अर्धपोटीं शाळेला आलों आहें. असें असतांना मला तुम्ही आंत कां घेत नाहीं ? ’ असें रागारागानें मास्तरांना विचारावेंसें त्याला वाटत होतें. पण त्या मुलाच्या तोंडांतून एकहि शब्द बाहेर पडला नाहीं. त्यामुळें आपल्या प्रश्नाला उत्तरहि न देणाऱ्या त्या मुलाकडे मास्तरांनीं रागाचा एक दृष्टिक्षेप टाकला व त्या मुलाला वर्गांत येण्याची परवानगी न देतां वर्गांतील इतर मुलांकडे वळून त्यांनीं शिकविण्यास सुरुवात केली.

पांच-सात मिनिटें अशीं गेलीं असतील नसतील इतक्यांत मास्तरांनीं शिकविण्याच्या भरांत वर्गांतल्या मुलांना व्याकरणांतील एक जरा अवघड प्रश्न विचारला आणि उत्तरासाठीं ते मुलांकडे पाहूं लागले. पण सगळीं मुलें गप्प झालीं होतीं. कोणालाच उत्तर सुचत नव्हतें. तेव्हां मास्तर म्हणाले, “ एवढा वेळ कां लावतां ! आतांपर्यंत जे नियम शिकविले ते आठवा कीं लगेच उत्तर सांपडेल. ” पण तरीहि मुलें गप्पच !

आतां काय करावें ? मास्तर जरा अस्वस्थ झाले. नकळतपणें त्यांनीं

दाराकडे पाहिलें. त्याबरोबर दाराशीं उभ्या केलेल्या त्या मुलानें हात वर केलेला त्यांना दिसला. जरा आश्चर्यचकित होऊन मास्तर उद्गारले, " येतंय उत्तर तुला ? " त्या मुलानें मान हलविली. मास्तर म्हणाले, " सांग. " त्याबरोबर त्या मुलानें उत्तर सांगितलें. अचूक होतें तें ! उत्तर ऐकून मास्तरांना केवढें आश्चर्य वाटलें असेल व केवढा आनंद झाला असेल याची कल्पनाच केलेली बरी. त्यांनीं त्या मुलाला आंत बोलाविलें व त्याला शाबासकी देऊन पहिल्या रांगेंत बसावयास सांगितलें.

अशा प्रकारें ज्यांस लहानपणीं दाराच्या बाहेर उभें राहण्याचे कष्ट केल्यानंतर विद्यादेवीच्या उपासनेचा अधिकार प्राप्त झाला आणि जे गृहस्थ स्वतःचें उच्च शिक्षण पार पडल्यानंतर आत्मतृप्त भावनेनें स्वतःचें वैयक्तिक जीवन सुखी करण्याकडे न वळतां पुनः गरिबी पत्करून आपल्याप्रमाणेंच अभागी व निराश्रित असलेल्या मुलांच्या शिक्षणासाठीं अविरत कष्ट करीत आहेत त्या **डॉक्टर गजानन श्रीपत खैर** या थोर समाजसेवकाचा व शिक्षणतज्ज्ञाचा परिचय आपणांस करून घ्यावयाचा आहे.

डॉ. गजानन श्रीपत ऊर्फ अण्णासाहेब खैर यांचा जन्म १८९८ च्या जून महिन्यांतील १५ तारखेला पुण्यांतच झाला. गणेशपेठेंतील डुल्या मारुतीजवळील एका जुन्या वाड्यांत खैर कुटुंब त्या वेळीं राहत असे. सहजासहजीं त्या कुटुंबाकडे कोणाचें लक्ष गेलें असतें असें कोणतेंच वैशिष्ट्य त्या कुटुंबांत नव्हतें. शिक्षणाची परंपरा नव्हती, पैसा नव्हता, कीर्ति नव्हती, सत्ता नव्हती, चार सर्वसामान्य गरीब कुटुंबांप्रमाणेंच खैर कुटुंबाची कालक्रमणा चाललेली होती. पण दैवाला तितकेंहि पाहवलें नाहीं ! अण्णांचे वडील ठाणें जिल्ह्यांतील ज्या गांवीं बदलून गेले होते तेथेंच प्लेगची बाधा होऊन ते एकाएकीं मृत्युमुखीं पडले. ही भयंकर बातमी पुण्यास पोंचली तेव्हां खैर कुटुंबाची काय अवस्था झाली असेल याची कल्पनाच केलेली बरी.

वडील वारले तेव्हां अण्णा जेमतेम सहा महिन्यांचे होते. त्यांची वडील बहीण सुमारें चार वर्षांची होती व वडील भाऊ सुमारें दोन वर्षांचा असेल. या तीन लहान मुलांच्या संगोपनाची सर्व जबाबदारी त्यांच्या

आईवर अवचितपणें येऊन पडल्यामुळें आतां काय करावें हें त्या माउलीला कळेना. नवऱ्याच्या पाठीमागें शिल्लक अशी फारशी नव्हतीच. हातावर पोट असणाऱ्यांचाच तो संसार होता. त्यामुळें त्या संसारांत सोन्या-चांदीचे दागिने कोठून असणार? बँकेंत पैसे कोठून असणार? जीं काय चारदोन भांडींकुंडीं जादा होतीं तीं विकून आठ-पंधरा दिवसांची गुजराण झाली. पण पुढें काय? माहेरच्या व सासरच्या एकाहि नातेवाइकाचा आधार नव्हता. अशा भयंकर परिस्थितींत त्या माउलीनें कष्टाचे जे मार्ग सुचतील ते अवलंबिण्यास सुरुवात केली. दळणकांडण, स्वयंपाक वगैरे कामें पहांटेपासून रात्रीपर्यंत करून आपल्या चिमण्या बाळांच्या तोंडांत दोन वेळां घास घालण्यास सुरुवात केली.

एखाद्या विशिष्ट ध्येयानें प्रेरित झाल्यानंतर सामान्य व्यक्तीच्या जीवनांतहि कसें असामान्य तेज संचारूं लागतें याचें उदाहरण म्हणून अण्णांच्या आईकडे बोट दाखवितां येईल. पतिनिधनामुळें मिळालेल्या धक्क्यामुळें त्या बाईच्या जीवनांत अंतर्बाह्य कायापालट झाला. ज्या खैर कुटुंबांत आजपर्यंत कोणतेंच वैशिष्ट्य दिसत नव्हतें त्याच कुटुंबांत एका धगधगत्या महत्त्वाकांक्षेचा उदय झालेला दिसूं लागला. अडचणी किंवा संकटें नसलेल्या सामान्य परिस्थितींत माणसांच्या कर्तृत्वाला आव्हान मिळत नाहीं. म्हणूनच कीं काय दुर्दैवाचे तडाखे माणसाला अधूनमधून बसत असतात! कर्त्या पुरुषाच्या निधनामुळें निर्माण झालेल्या भीषण परिस्थितीमुळें खचून न जातां अण्णांच्या आईनें प्राप्त परिस्थितीचें आव्हान स्वीकारलें व कष्टांची पराकाष्ठा चालविली. हळूहळू मुलें मोठीं होऊं लागलीं. त्या मुलांनाहि तिनें आपल्या महत्त्वाकांक्षेची दीक्षा दिली. त्यांना शाळेंत घातलें व कांहीं झालें तरी शाळा सोडूं नका असा कानमंत्र दिला. 'जर तुम्ही शिकलांत तरच आपली परिस्थिति बदलेल' असें तिनें मुलांना पुन्हां पुन्हां पटवून दिलें. अण्णांची आई निरक्षर होती; पण आधुनिक समाजांत शिक्षणामुळें माणसांच्या परिस्थितींत कसा अनुकूल फरक पडूं शकतो हें ती पूर्णपणें जाणून होती. त्यामुळेंच मुलांच्या शिक्षणासाठीं तिनें स्वयंपाक वगैरे कामें पत्करलीं होतीं.

सुदैवानें मुलांची शाळेंतील प्रगतीहि चांगली होत गेली व आईच्या

मिळकतींत थोडी-फार भर घालण्यासाठीं नादारीव्यतिरिक्त इतर कांहीं उपायहि मुलांना सांपडत गेले. गरीब विद्यार्थ्यांना अभ्यास संभाळून पैसे मिळविण्यासाठीं तत्कालीन समाजांत जेवढे मार्ग चोखाळण्यासारखे होते तेवढे सर्व मार्ग अण्णांनीं वापरून पाहिले. सकाळीं ते वर्तमानपत्रें विकीत; नंतर लोकांच्या घरीं लहानसहान कामें करीत; पंचांगें, राजा रविवर्म्याचीं चित्रें, नाग-नरसोबाचीं चित्रें, लहान मुलांचीं खेळणीं, स्वदेशी काड्यांच्या पेट्या वगैरे वस्तु अधूनमधून संध्याकाळीं व सुटीच्या दिवशीं विकीत; लग्नमुंजीच्या प्रसंगीं गरीब विद्यार्थ्यांना कोंडी करून जी दक्षिणा वांटली जाई तिचाहि क्वचित् लाभ घेत. याशिवाय ते मधुकरीहि मागत. या मधुकरीमुळेंच त्यांना एकदा वर्गाबाहेर कसें उभें राहावें लागलें याची हकीगत या लेखाच्या सुरुवातीस दिलीच आहे.

विद्यार्थिजीवन चालू असतांना अण्णांच्या आईचें मुलांच्या वर्तनावर फार बारीक लक्ष असे. परीक्षेंतील यशाइतकेंच चारित्र्यसंवर्धनाचें महत्त्व असतें हें ती माउली जाणून होती. आपल्या मुलांनीं वाईट मुलांची संगत धरूं नये व त्यांनीं नियमितपणें अभ्यास करावा याबद्दल ती फार दक्ष असे. त्यामुळें वडील नसलेल्या गरीब विद्यार्थ्याला जे मोह चुकीच्या मार्गावर नेण्यासाठीं टपलेले असतात त्यांचा उपसर्ग अण्णांच्या जीवनाला झाला नाहीं. आईच्या मार्गदर्शनामुळें आपण चांगल्या मार्गावर कसें राहिलों याची आठवण सांगतांना अण्णा मला म्हणाले, " वाईट संगत लागूं नये म्हणून आई आम्हांला जपायची. पण बालसुलभ प्रवृत्तींना योग्य तितका वाव देण्याचेंहि तारतम्य ती कसें दाखवीत असे याचें एक उदाहरण सांगतों. माझा आवाज चांगला असल्यानें नाटकासंबंधीं मला फार ओढा वाटूं लागला होता व एका नामांकित नाटककंपनीच्या पुण्यांतील मुक्कामाच्या वेळीं मी नाटकाकडे फार आकर्षिला गेलों होतों. नाटक कंपनीमधील वातावरणाचा संसर्ग मला लागल्यास मी बिघडेन अशी भीति आईला वाटली व ती रास्त होती. म्हणून तिनें मला नाटक कंपनीच्या बिऱ्हाडाकडे फिरकण्यास बंदी केली. पण त्याच वेळीं ती मला म्हणाली कीं, तूं नाटकाच्या क्लबांत जा. माझ्या उपजत कलाप्रवृत्तींचा कोंडमारा होऊं नये म्हणून तिनें क्लबाचा पर्याय सुचविला होता. तिच्या या दृष्टिकोनाचें मला

अद्यापहि फार कौतुक वाटतें. ती अशिक्षित होती, पण तिनें आम्हांला करड्या शिस्तीच्या लोखंडी पिंजऱ्यांत कोंडलें नाहीं. किंवा फाजील लाडामुळें बिघडाविलेंहि नाहीं. आपण सुचविलेला पर्याय ठीक आहे कीं नाहीं याकडेहि तिनें लक्ष ठेवलें होतेंच. क्लबांतील एक मुलगा तिला एकदां विडी पितांना दिसला. म्हणून लगेच तिनें मला क्लबांत जाण्याचीहि बंदी केली." आईच्या आणखी कांहीं आठवणी सांगितल्यानंतर अण्णा पुढें म्हणाले, " विद्येचें अपार महत्त्व तिनें जाणलें होतें. ती स्वतः अशिक्षित होती; पण शिक्षणामुळेंच माणूस पुढें जातो हें तत्त्व तिला पुरेपूर समजलें होतें. पण दुर्दैवानें माझें शिक्षण पूर्ण झालेलें पाहायला ती वांचली नाहीं. मी मॅट्रिकला बसलों त्याच वर्षीं ती प्लेगनें वारली. पण त्यापूर्वींच तिनें मला दादांच्या म्हणजे केतकरांच्या स्वाधीन केलें होतें. त्यामुळें अनाथ विद्यार्थि गृहांत माझें शिक्षण चालू राहील असा विश्वास तिला आला होता. या समाधानांतच तिनें या लोकींची यात्रा संपविली. "

' अनाथ विद्यार्थि गृह ' या संस्थेंत १९१४ च्या डिसेंबरमध्यें अण्णांचा प्रवेश झाला व तेव्हांपासून त्यांच्या जीवनाला निश्चित दिशा प्राप्त झाली.

' अनाथ विद्यार्थि गृह ' ही संस्था गरीब व अनाथ मुलांच्या शिक्षणाची व्यवस्था करण्यासाठीं १९०९ सालीं जन्माला आली होती. त्या वेळच्या समाजांत माधुकरी मागून अगर वारानें किंवा आश्रित राहून अनेक गरीब मुलांचें शिक्षण पुरें होऊं शकत असे. पण त्यांत सुसूत्रता नसे, शाश्वती नसे, राष्ट्रीय किंवा सामाजिक दृष्टिकोन नसे. शिवाय ती संधि सर्व मुलांना मिळूंहि शकत नसे. याकरितां संघटित प्रयत्न करणाऱ्या एखाद्या संस्थेनें पुढें येऊन लोकांच्या वैयक्तिक दातृत्वबुद्धीला सामाजिक वळण लावण्याची गरज होती. हें महत्त्वाचें कार्य अ. वि. गृहाच्या संस्थापकांनीं हातीं घेतलें होतें. गरीब मुलांना शिक्षणाची संधि प्राप्त व्हावी म्हणून त्यांनीं स्वतः भिक्षापात्र हातांत घेतलें होतें. तत्कालीन परिस्थितींत अ. वि. गृहाच्या संस्थापकांना किती विलक्षण अडचणींतून जावें लागलें याचा इतिहास समजून घेण्यासारखा आहे. त्याकरितां " कुलगुरु कै. केतकर चरित्र " हें श्री. बा. दा. गांगल यांनीं लिहिलेलें उत्कृष्ट पुस्तक

युवकांनीं जरूर वाचावें. सार्वजनिक संस्थांचा उदय कसा होतो, त्यासाठीं कार्यकर्त्यांना कोणकोणत्या दिव्यांतून जावें लागतें वगैरे बाबींचा त्यामुळें उलगडा होईल. दारिद्र्य व विद्यार्जनाची तळमळ यांमध्यें चालू असलेल्या वैयक्तिक झगड्याला अ. वि. गृहानें सामुदायिक व पद्धतशीर स्वरूप दिलें हें अ. वि. गृहाचें वैशिष्ट्य महाराष्ट्राच्या आधुनिक इतिहासांत संस्मरणीय आहे. सध्यांच्या अ. वि. गृहानें तीच परंपरा चालू ठेवलेली आहे.

अण्णा जेव्हां अ. वि. गृहांत राहण्यास आले तेव्हां ती संस्था शैशवावस्थेंत होती—अवघ्या पांच-सहा वर्षांची होती. आज संस्था ४७ वर्षांची झाल्यानंतर अ. वि. गृहाच्या आवारांत जशा अनेक लहान-मोठ्या इमारती दिसतात तसा पसारा तेव्हां नव्हता. कै. दादासाहेब केतकर व संस्थेंतील सर्व विद्यार्थी माधुकरी मागून आणून जेवत. इतरहि अनेक लहानसहान मार्गांनीं संस्थेला दान मिळविण्यासाठीं ते प्रयत्न करीत. संस्थेमध्यें आल्यामुळें अण्णांच्या जीवनांतील कष्ट कमी झाले नाहींत; परंतु केतकरांसारख्या चारित्र्यसंपन्न व्यक्तीचें मार्गदर्शन मिळूं लागल्यामुळें आणि आपल्याप्रमाणेंच कौटुंबिक व आर्थिक अडचणींत असलेल्या संस्थेंतील इतर अनेक विद्यार्थ्यांबरोबर राहावयास मिळाल्यामुळें अण्णांच्या जीवनांत एक नवीन प्रकारचा आत्मविश्वास वाढीस लागला असावा हें मात्र निश्चित. संस्थेमध्यें आल्यावर केतकरांप्रमाणेंच आणखी एका व्यक्तीच्या सहवासाचा अण्णांच्या जीवनावर खोलवर परिणाम झाला. ही व्यक्ति म्हणजे पुण्यांतील ‘सकाळ’ या लोकप्रिय वर्तमानपत्राचे कर्तबगार संपादक डॉ. ना. भि. ऊर्फ नानासाहेब परुळेकर होत.

डॉ. परुळेकर हे त्या वेळीं अण्णांप्रमाणेंच अ. वि. गृहांत विद्यार्थी होते. दोघेहि एकाच इयत्तेंत शिकत होते. त्यामुळें त्या दोघांची चांगलीच मैत्री जमली. परुळेकरांशीं आलेल्या संबंधाबद्दल बोलतांना अण्णा मला म्हणाले, “नानांची मैत्री हा मी माझ्या आयुष्यांतील एक मोठा योगायोगच समजतों. दारिद्र्य, संकटें, अडचणी यांमुळें त्यांचें मन केव्हांहि खचून जात नव्हतें. त्या काळांत त्यांनीं व मी कित्येक वेळां तासन्तास चर्चा करून प्रौढपणीं देशाच्या उन्नतीसाठीं कोणते नवे मार्ग शोधतां येतील याची चर्चा केली आहे. एम्. ए. पर्यंतचे विद्यार्थी व पुढें

संस्थेमधील कार्यकर्ते म्हणून आमचा सहवास १९१४ सालापासून नाना अमेरिकेला उच्च शिक्षणासाठीं १९२६ सालीं जाईपर्यंत सतत आला. नानांसारख्या महत्त्वाकांक्षी, उद्योगी, कर्तबगार व कल्पक मित्राचा सहवास मला अ. वि. गृहांत मिळाला हा मी माझ्या आयुष्यांतील सुयोगच समजतों."

सामान्यतः गरिबीशीं झगडणाऱ्या विद्यार्थ्यांचें जीवन अतिशय अंतर्मुख व आत्मनिष्ठ होण्याची शक्यता फार असते. त्यामुळेंच विद्यार्थिदशा संपली कीं या विद्यार्थ्यांमध्यें अतिशय फरक पडलेला दिसतो; ते जगापासून अधिकाधिक आंत ओढले जातात; स्वतःच्या व स्वतःच्या कुटुंबाच्या सुखापलीकडे त्यांना कांहीं दिसत नाहीं. अण्णा जर अ. वि. गृहाच्या छायेंत वाढले नसते तर त्यांचें जीवन बहुधा व्यक्तिवादी, आत्मतृप्त व समाजपराङ्मुखच झालें असतें असा अंदाज करावासा वाटतो. अ. वि. गृहानें विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची नमुनेदार व्यवस्था केली आहे याइतकेंच त्या संस्थेनें गरीब विद्यार्थ्यांच्या मनःस्थितीला समाजाभिमुख बनविलें आहे ही गोष्ट अत्यंत महत्त्वाची मानली पाहिजे. गरीब विद्यार्थ्यांच्या जीवनांतील असहायतेमुळें त्यांच्या भावी जीवनांत ज्या मनोविकृति निर्माण होतात त्या विकृतींपासून शेकडों नव्हे हजारों विद्यार्थ्यांना अ. वि. गृहानें वांचविलें आहे, ही त्या संस्थेची राष्ट्रीय दृष्ट्या अत्यंत मोलाची कामगिरी समजली पाहिजे. गुरुशिष्यसंबंधांतील निकटत्वामुळें व्यक्तित्वविकासाला अतिशय साहाय्य होतें हें प्राचीन हिंदु शिक्षणपद्धतीमधील अत्यंत महत्त्वाचें तत्त्व हल्लींच्या प्रतिकूल परिस्थितींतहि अ. वि. गृहानें जिवंत ठेवलें आहे हें अत्यंत अभिमानास्पद आहे. राष्ट्रीय शिक्षणाचा एक यशस्वी प्रयोग म्हणून अ. वि. गृहानें परप्रांतांतहि मान मिळविला आहे.

अर्थात् हा सर्व पुढचा इतिहास झाला. अण्णा जेव्हां संस्थेंत दाखल झाले तेव्हां संस्था वाढण्याच्या अवस्थेंत होती; अडीअडचणीच जास्त होत्या. पण केतकरांच्या पितृतुल्य मार्गदर्शनामुळें व सन्मित्रांच्या उत्साहवर्धक सहवासामुळें अण्णांच्या जीवनांत अंतर्बाह्य बदल घडून आला असणार यांत शंका नाहीं. स्वतःच्या वैयक्तिक अडचणींचा विचार सामाजिक व राष्ट्रीय पातळीवरून करण्याची संवय त्यांना लागली असावी.

अडचणींची किंवा संकटांची गंमत अशी असते कीं, त्यांना जितकें अधिक महत्त्व द्यावें तितका त्यांचा जोर वाढतो. अण्णांनीं स्वतःच्या अडचणींना समाजांतील हजारों गरीब विद्यार्थ्यांच्या अडचणींमध्यें सामावून टाकलें होतें. त्यामुळें त्यांची स्वतःची हिंमत तर वाढीला लागलीच, पण त्यांना पुढील जीवनाचें ध्येयहि अनायासें सांपडलें. त्यामुळेंच १९२० सालीं ते बी. ए. झाल्यावर जेव्हां केतकरांनीं त्यांना "तूं पुढें काय करणार?" असा प्रश्न विचारला तेव्हां अण्णा म्हणाले, "व्यापाऱ्याचा मुलगा जसा घरच्या पेढींतच कामाला लागतो तसा मी आपल्या संस्थेंतच काम करणार आहें. माझ्याप्रमाणेंच जे असंख्य विद्यार्थी अडचणींत असतात त्यांच्या शिक्षणासाठीं मी संस्थेच्या द्वारांच प्रयत्न करणार आहें." त्यांचें हें उत्तर ऐकून केतकरांना किती समाधान वाटलें असेल याची कल्पनाच केलेली बरी !

अशा प्रकारें १९२० सालापासून डॉ. खैर यांच्या जीवनाचा नवा कालखंड सुरू झाला. संस्थेचा व्याप खूपच वाढत चालला होता. संस्थेनें 'महाराष्ट्र विद्यालय' चालू केलें होतें. हीं कामें संभाळूनहि अण्णांनीं आपलें उच्च शिक्षण चालू ठेवलें व १९२३ सालीं ते दुसऱ्या वर्गांत एम्. ए. पास झाले. त्या काळांत एम्. ए. ला दुसरा वर्ग मिळविणें कठीण समजलें जात असे. त्यामुळें एम्. ए. ला सुयश मिळवितांच त्यांना एखाद्या कॉलेजांत प्रोफेसराची नोकरी मिळाली असती. पण अण्णांना तो मोह झाला नाहीं. त्यांनीं आपल्या आयुष्याचें ध्येय निश्चित केलें होतें. गरीब विद्यार्थ्यांच्या उन्नतीकरितां त्यांनीं गरिबी पत्करली होती.

अ. वि. गृहाचा व विशेषतः त्यांतील 'महाराष्ट्र विद्यालय' या शाखेचा पुढील काळांतील विकास म्हणजे अण्णांच्याच कर्तबगारीचा विकास होय असें म्हटलें पाहिजे. एक नमुनेदार शिक्षणसंस्था म्हणून 'महाराष्ट्र विद्यालया'नें जें नांव कमावलें आहे त्याचें श्रेय डॉ. खैर यांच्याच प्रयत्नांना दिलें पाहिजे. आपल्या शैक्षणिक प्रयोगांना उच्च ज्ञानाची व परदेशीय अनुभवाची जोड मिळावी म्हणून ते १९३१ सालीं अमेरिकेस जाऊन कोलंबिया विद्यापीठांत एम्. ए. व न्यूयॉर्क विद्यापीठांत पीएच्. डी. या पदव्या मिळवून १९३३ सालीं परत आले. हिंदुस्थानांत परत

येतांना ते इंग्लंड, डेन्मार्क, जर्मनी, रशिया, फ्रान्स व इटाली या देशांतील शिक्षणसंस्थांचें निरीक्षण करून आले. अमेरिकेंतील त्यांच्या शिक्षणाचा निम्मा खर्च संस्थेनें सोसला व निम्मा खर्च त्यांनीं तेथें स्वतः कष्ट करून भागविला.

अमेरिकेहून परत आल्यानंतर अण्णांनीं आपल्या अनुभवाचें सार म्हणून ' जगांतील समाजक्रांति व हिंदुस्थान ' व 'पाश्चिमात्य शिक्षणपद्धति' हे दोन बहुमोल ग्रंथ प्रसिद्ध केले. पुढें १९३७ सालीं जागतिक शिक्षण-परिषदेच्या निमित्तानें त्यांना जपानला जाण्याची संधि मिळाली. तेथील निरीक्षणाच्या आधारें त्यांनीं भारतांत परतल्यावर 'जपानची जीवनक्रान्ति' हा ग्रंथ लिहिला व त्या ग्रंथांतील मौलिक आणि माहितीपूर्ण विवेचनामुळें तो अत्यंत लोकप्रिय झाला आहे.

डॉ. खैर यांच्यासारखा जन्मभर विद्यार्थी राहिलेला अन्य शिक्षणतज्ज्ञ क्वचितच आढळेल. उपजत प्रसिद्धिविन्मुख स्वभावामुळें अण्णा कामाशिवाय संस्थेच्या बाहेर कोठें फारसे जात नाहींत. स्वतःचा व्याप फारसा वाढवावयाचा नाहीं असें त्यांचें एक सूत्र आहे. त्यामुळेंच व्याख्यानांचीं व परिषदांचीं निमंत्रणें ते सहजासहजीं स्वीकारीत नाहींत. सार्वजनिक कार्य करणाऱ्या पुढारी मंडळींना आपल्या सेवाक्षेत्राच्या मर्यादा वाढतील तितक्या वाढूं देण्याचा मोह अनावर होत असतो. पण याबाबत अण्णांनीं स्वतःवर निर्बंध घालून घेतले असावेत असें दिसतें. यासंबंधांत केतकरांचा आदर्श त्यांच्यापुढें असावा. कार्याचा विस्तार वाढविला कीं त्याची खोली व त्याचा कस कमी होत जातो हें महत्त्वाचें तत्त्व अण्णांनीं सतत डोळ्यापुढें ठेवलेलें आहे. " अ. वि. गृहाच्या शाखा तुम्ही आणखी कांहीं गांवीं कां काढीत नाहीं ? " असें मीं एकदां त्यांना विचारलें. तेव्हां ते म्हणाले, " कामाचा व्याप व विस्तार वाढविण्यापेक्षां पुणें व नाशिक येथील आमच्या शाखा अधिक नमुनेदार करणें हेंच आमच्यापुढील महत्त्वाचें कार्य अजून अपूर्ण आहे असें आम्हांला वाटतें. अ. वि. गृहाच्या धर्तीवर इतर गांवीं कोणी संस्था काढीत असेल तर आम्ही त्याला अवश्य मदत करूं. आतांपर्यंत आम्ही तसें अनेकदां केलें आहे. " अण्णांच्या या उत्तरांत अण्णांच्या

सार्वजनिक जीवनाचें तत्त्वज्ञान प्रतिबिंबित झालेलें आहे असेंच म्हटलें पाहिजे. आपल्या अंगीकृत कार्यांत अजून सुधारणेला व प्रगतीला पुष्कळ वाव आहे असें साठीजवळ आलेल्या त्यांना व सुवर्णमहोत्सव साजरा करण्याच्या जवळ आलेल्या अ. वि. गृहासारख्या संस्थेला वाटत आहे, हीं बाब विशेष उल्लेखनीय समजली पाहिजे.

चिंतनशीलता हें अण्णांच्या जीवनाचें एक विलोभनीय वैशिष्ट्य आहे. अण्णांना भेटावयाला गेलों व परत येतांना मी कोणता तरी नवीन विचार घेऊन आलों नाहीं असें क्वचितच झालें असेल. जुन्या मुद्द्याची नवी बाजूहि ते अनपेक्षितपणें व अत्यंत सफाईनें दाखवितात. तपशिलांत शिरून कांटेकोर विचार करीत असतांना व्यापक तत्त्वांचा विसर पडूं न देणें अशी त्यांची समन्वयबुद्धि आहे. अण्णांइतका संभाषणकलेचा विकास झालेला माणूस क्वचितच दृष्टीस पडतो. त्यांच्या बोलण्यांत अगदीं सहजपणें एखादी मार्मिक सत्यकथा किंवा एखादा विनोदी प्रसंग पेरला जातो.

शिक्षणतज्ज्ञ म्हणून डॉ. खैर यांची कीर्ति महाराष्ट्राबाहेरहि पसरलेली आहे. अखिल भारतीय शिक्षण-परिषदेच्या शाखा-संमेलनांचें अध्यक्षपद त्यांनीं भूषविलेलें आहे. महाराष्ट्रांतील शिक्षकांचे प्रतिनिधि म्हणून ते मुंबई विधानसभेंत व पुणें विद्यापीठांत निवडून आलेले आहेत. शिक्षणक्षेत्रांत निघणाऱ्या प्रत्येक नव्या चळवळीशीं त्यांचा संबंध पोंचलेला असतो. मध्यवर्ती सरकार व मुंबई सरकार त्यांच्या अनुभवाचा वारंवार उपयोग करून घेत असतात. हायस्कूल-कॉलेजांतील विद्यार्थी व प्रौढ नागरिक बहुश्रुत व्हावे म्हणून ' स्वाध्यायमाला ' संपादित करून त्यांनीं एक नवा शैक्षणिक प्रयोग केला आहे. स्वाध्यायमालेंत आतांपर्यंत विविध विषयांवरील दोनशें छोटीं छोटीं पुस्तकें प्रकाशित झालीं आहेत. या मालेंतील जास्तींत जास्त पुस्तकें वाचण्याचा प्रयत्न युवकयुवतींनीं केला पाहिजे. अ. वि. गृहाच्या द्वारां व विशेषतः त्यांतील ' आश्रम ' पद्धतीमुळें शेंकडों होतकरू विद्यार्थ्यांच्या जीवनाला डॉ. खैर यांनीं उत्कृष्ट वळण लावलें आहे. ही त्यांची सर्वांत मोठी राष्ट्रीय कामगिरी समजली पाहिजे. अशा प्रकारें डॉ. खैर यांनीं चालविलेल्या नानाविध शैक्षणिक

व राष्ट्रीय कार्यांचा अधिकाधिक विस्तार होत जावो व गरिबींतून वर येणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांचें जीवन स्फूर्तिप्रद व दीपस्तंभासारखें मार्गदर्शक ठरो अशीच इच्छा कोणीहि व्यक्त करील.

'पुण्यामध्यें पहाण्यासारखें काय काय आहे ?' असा प्रश्न जेव्हां मला बाहेर गांवाहून आलेला जिज्ञासू विद्यार्थी किंवा पालक विचारतो तेव्हां 'अनाथ विद्यार्थी गृहा'चें नांव माझ्या यादींत हमखास येतें, हें स्वाभाविकच नाहीं का ?

कोणतेंही आवडीचें काम
घेऊन तें जन्मभर सतत
करीत रहा.
पुणें ११।७।६८ ग.श्री.खैर



प्रेमाचे बंध तोडूनच त्या मुलांनीं घराचा उंबरठा ओलांडला होता. या जगांत माणसाला दुसऱ्या कशाचीहि सरहद्द ओलांडणें शक्य आहे. पण घराचा उंबरठा ओलांडणें अगदीं अशक्य असतें. पोटाचीं आतडीं आतड्यांना आकर्षित असतात; एकमेकांकडे ओढीत असतात. गुरुत्वाकर्षणाचा नियमसुद्धां एक वेळ खोटा ठरेल, लोहचुंबकाची शक्तीसुद्धां एक वेळ लटकी ठरेल, पण मातापित्यांच्या मायेचें पांघरूण कोणालाहि नकोसें होणार नाहीं. मग हें मऊ, उबदार पांघरूण दूर फेकून हीं मुलें कां निघाली होतीं ?

## बॅ. रामराव माधवराव देशमुख

सूर्यास्त झाल्यानंतरहि ते तिघे मित्र लगबगीनें रस्ता कापीतच होते. कमींत कमी दहा-बारा मैल अंतर तरी त्यांनीं आतांपर्यंत कापलें होतें. कोठें चालले होते ते ? जवळ सामान-सुमान तर कांहींच नव्हतें. तिघां मित्रांचे जीव अगदीं एक झालेले दिसत होते, मनें मिळालेलीं होतीं, हृदयें जुळलेलीं होतीं. त्यांतला तो तरतरीत नाकाचा, तेजस्वी चेहऱ्याचा अन् गौरवर्ण शरीरयष्टीचा चौदा-पंधरा वर्षांचा मुलगाच त्या गटाचा पुढारी दिसत होता. त्याच्या बंडीच्या खिशांत एक रुपया होता. कोठून आणला हा रुपया त्यानें ? घरांतून निघतांना कोणाला न विचारतांच त्यानें तो हळूच उचलला होता. म्हणजे रुपयाची चोरी करूनच ही मंडळी निघाली होती म्हणाना !

बुलढाण्याचा डोंगर उतरून ही टोळी अमरावतीच्या दिशेनें एका दरीमधून चालली होती. हिंस्र श्वापदांची भीति नव्हती का वाटत यांना ? गेल्या आठवड्यांत याच जंगलांत एका क्रूर मानवभक्षकानें कहर उडविला होता, हें या पोरांच्या कानावर आलेलें दिसत नाहीं. क्रूर पशूंना आणि अकाळविकाळ निसर्गाला आज हीं कोवळीं बाळें चट्ट करायला मिळणार असा रंग दिसत आहे.

एखादी वनदेवता जर या कातरवेळीं या बाजूनें गेली असती तर तिनें या कोंवळ्या मुलांना हृदयाशीं घट्ट धरलें असतें, त्यांच्यावर मातृवात्सल्याच्या अमृताचें सिंचन केलें असतें अन् डोळ्यांतील पाणी कसें तरी आवरून त्यांना तिनें प्रेमभरानें म्हटलें असतें, " बाळांनो, परत वळा अन् आपापल्या घरीं जा. तुमचे आईबाप तिकडे दुःखानें विव्हळत असतील, तुमचीं भावंडें विरहानें व्याकुळ झालीं असतील, तुमचं सारं घर काळजीनं खंगून गेलं असेल. तुमची आठवण काढून काढून साऱ्या नातेवाइक मंडळींचीं हृदयं पिळवटून गेलीं असतील. फिरा, परत फिरा. मी तुम्हांला परत जायचा जवळचा अन् सुरक्षित रस्ता दाखवतें. "

पण वनदेवतेच्या या प्रेमळ समजावणीला तीं मुलें बधलीं असतीं काय ?

प्रेमाचे बंध तोडूनच त्या मुलांनीं घराचा उंबरठा ओलांडला होता. या जगांत माणसाला दुसऱ्या कशाचीहि सरहद्द ओलांडणें शक्य आहे

पण घराचा उंबरठा ओलांडणें अगदीं अशक्य असतें. पोटाचीं आतडीं आतड्यांना आकर्षित असतात; एकमेकांकडे ओढीत असतात. गुरुत्वाकर्षणाचा नियमसुद्धां एक वेळ खोटा ठरेल, लोहचुंबकाची शक्तीसुद्धां एक वेळ लटकी ठरेल, पण मातापित्यांच्या मायेचें पांघरूण कोणालाहि नकोसें होणार नाहीं.

मग हें मऊ, उबदार पांघरूण दूर फेकून हीं मुलें कां निघालीं होतीं ? घरामध्यें यांना वागणूक वाईट होती का ? नव्हती. मग शाळेमध्यें यांची ' ढ ' म्हणून अवहेलना होत होती का ? नव्हती. मग काय झालें होतें ?

जर या तीन मुलांच्या पाठीमागून चोरपावलानें कोणी गेलें तर त्याला त्यांचें बोलणें ऐकूं येईल का ? पण हे तिघे मोठे सावध दिसतात. ते हळूहळू बोलत आहेत. एखादा कट तर ते रचीत नसावेतना ? फारच तीक्ष्ण कानाचा इसम जर गुप्तचराप्रमाणें यांच्यामागें सोडला तर कांहीं शब्द व थोडीं तुटक वाक्यें हातीं येणार नाहींत का ?

योगायोगानें तसें होतच आहे. पाणी प्यायला म्हणून ही छोटी मंडळी एका ओढ्याजवळ थांबली आहेत आणि पलीकडेच अंधार पडल्यामुळें बैल सोडून कांहीं गाडीवान भाकर खात ओढ्याच्या त्या बाजूला सुखावले आहेत. पण या पोरांच्या कुजबुजीचा आवाज येऊन ' या अशा कातरवेळीं हीं लहान मुलें एकटींच इकडे कां ? ' असा बोभाटा मनांत येऊन ते गाडीवान कान तीक्ष्ण करून ऐकत आहेत.

' हिमालय ' ' तपश्चर्या करून अस्त्र का मिळणार नाहीं ? ' ' अर्जुनाला मिळालें होतें ' ' आणि कर्णाला नव्हतें का ? ' ' घटोत्कचालासुद्धां ' ' देवांपाशीं भांडूं आपण ' ' आमचाच देश परतंत्र कां ? ' ' राक्षसांना मारलं तर या गोऱ्यांना का नाहीं पिटून काढणार ? ' ' नक्कीच देव प्रसन्न होईल ' ' होईपर्यंत तपश्चर्या करूं ' वगैरे वगैरे हा तुटक तुटक मालमसाला ऐकून ते गाडीवान डोळे विस्फारून पाहूं लागले. काय करावें हेंच त्यांना सुचेना. तेवढ्यांत त्यांच्यांतला एकजण पुढें झाला व त्यानें मुलांना हटकलें. ' कोण रे तुम्ही ! कुठवर निघाला ? ' पोरांनीं उत्तर द्यायच्या आंतच त्या गाडीवानानें त्यांतल्या मोठ्या मुलाला

ओळखून एकदम विचारलें, " काय रं ? तूं तर आमच्या आप्पासाहेब देशमुखांचा मुलगा. कुठं रं मग निघालास एकलाच ? " या प्रश्नाला देशमुखांच्या मुलानें थापाथापीचें उत्तर दिलें, " गाड्या पुढं गेल्यात. आम्ही जरा रेंगाळलों." पण हें उत्तर पचण्यासारखें नव्हतें. तो गाडीवान आप्पासाहेबांचा शेतकरीमित्र होता. म्हणून त्यानें खरी हकीकत बाहेर काढायचें ठरवलें अन् जरा उग्र रूप धारण केलें. खडसावून बोलायला सुरवात केली. मात्रा बरोबर लागू पडली. त्या तिघांतला सर्वांत धाकटा जो होता तो एकदम रडायला लागला आणि ही कटवाली मंडळी घरीं न विचारतां पळून चालली आहेत हें गुपित उघडें पडलें. मग काय विचारतां ? लगेच गाडीवानानें त्या पोरांना गिरफदार करून गाडींत कोंबलें व बुलढाण्याच्या दिशेनें गाड्या हाकल्या.

वऱ्हाड-महाराष्ट्राचे कर्तृत्ववान् पुढारी बॅरिस्टर रामराव माधवराव देशमुख यांची विद्यार्थिदशा कोणत्या प्रकारच्या स्वप्नांनीं सचेतन झालेली होती याची कल्पना वर सविस्तरपणें वर्णन केलेल्या प्रसंगावरून वाचकांच्या ध्यानांत येऊं शकेल. वरील प्रसंग घडला १९०७ सालामध्यें. त्या वेळीं रामराव चौदा-पंधरा वर्षांचे होते. पण या सुमारासहि त्यांचें मन राष्ट्र-भक्तीच्या संगीतानें पूर्णपणें नादावलेलें होतें. तोडावयास अत्यंत कठीण असलेल्या प्रेमबंधांतून मुक्त होऊन ते तपसिद्धीसाठीं हिमालयाची वाट चालण्यास निघाले होते.

रामरावांच्या संस्कारक्षम मनामध्यें अध्यात्म व राजकारण यांची बेमालूम सांगड घातली गेली हा योगायोगहि अर्थपूर्ण समजला पाहिजे. त्यासंबंधीं मी जेव्हां रामरावांना विचारलें तेव्हां ते म्हणाले, " लहानपणीं मी अत्यंत धार्मिक वातावरणांत वाढलों होतों. माझ्या वयाचीं पहिलीं बारा-तेरा वर्षें पिंपळोद या अमरावती जिल्ह्यांतील खेड्यांत आजोळीं गेलीं. माझे आजोबा धर्मशील व पापभीरु मनोवृत्तीचे होते. त्यांनीं माझ्याकडून अनेक स्तोत्रांचें व धार्मिक पोथ्यांचें पठन करून घेतलें होतें. धर्मशिक्षणामुळें बालपणींच माणसाच्या मनावर जे सूक्ष्म संस्कार होतात

त्यांचा लाभ मला आजोबांकडून मिळाला होता. पुढें मी वडिलांकडे राहण्यास आलों व परिस्थिति एकदम पालटली. माझे वडील आजोबांप्रमाणें हिंदुधर्मामधील आचारकांड, त्यांतील पूजा, जपजाप्य वगैरे फारसें मानीत नसत. त्यांच्या तरुणपणीं तर ते सुधारक मताचे झालेले होते. पण पुढें कांहीं विशेष आपत्तींमुळें ते पुन: आस्तिक बनले होते. तरी पण आचारकांडाचा महिमा त्यांनीं कधींच वाढविला नाहीं. ते सरकारी नोकर होते, पण समाजाची सुधारणा, राष्ट्राचें स्वातंत्र्य हे त्यांच्या श्रद्धेचे विषय बनलेले होते. आपलें घराणें देशमुखाचें, आपण या भूमीचे खरे राज्यकर्ते व इंग्रजांना येथून हुसकून देणें आपलें कर्तव्य आहे या स्वाभाविक विचारांनीं त्यांच्या श्रद्धेचें अंतरंग विणलेलें होतें. ‘ केसरी ’, ‘ राष्ट्रमत ’, ‘ वंदे मातरम् ’ हीं जहाल राष्ट्रीय वृत्तपत्रें स्वतः सरकारी नोकर असूनहि ते नियमितपणें वाचीत. ‘ केसरी ’ व ‘ राष्ट्रमत ’ वाचण्याची गोडी त्यांनींच मला लावली. त्यामुळेंच आजोबांनीं निर्माण केलेल्या श्रद्धायुक्त मनाचें पोषण पुढें राष्ट्रीय विचारांनीं होऊं लागलें. आजोबांकडून वडिलांकडे राहावयास आल्यावर कांहीं काळ माझ्या मनांत पोकळी होती. पण लवकरच नाशिकच्या ‘ मित्रमेळ्या ’च्या जहाल पदांनीं मला जागें केलें. सावरकर व कवि गोविंद यांच्या काव्यांनीं माझी राष्ट्रभक्ति प्रथम जागृत केली. तरुणपणच्या उतावीळ अन् अपरिपक्व विचारांनीं माझ्या मनाचा पूर्ण ताबा घेतला होता. वाटेल तो त्याग करायला माझें मन तयार झालें होतें. उग्र तपश्चर्या करून अमोघ अस्त्र हस्तगत करण्याची कल्पना त्यांतूनच निघाली होती. धर्मश्रद्धा व राष्ट्रप्रेम यांचें रोमांचकारी मिश्रण झालें होतें. ”

चालू पिढीमधील विद्यार्थ्यांचें मानसिक अंतरंग ज्या प्रकारच्या वातावरणांत पोसलें जात आहे त्यापेक्षां स्वातंत्र्यपूर्व काळांतील वातावरण फारच वेगळें होतें. विशेषत: १८९८ सालापासून १९१० सालापर्यंतच्या कालखंडांत देशभर जें सशस्त्र क्रांतिवादी जहाल वातावरण पसरलेलें होतें त्याची नीटशी कल्पना करणेंहि आजच्या विद्यार्थ्यांना कठीण आहे. देशांतील राजकीय परिस्थितीचा, विशेषतः तिनें क्रान्तिकारक रूप धारण केलें कीं तिचा, विद्यार्थ्यांच्या जीवनाशीं अत्यंत निकटचा संबंध पोंचतो

हेंच खरें. जहाल, आत्यंतिक व शस्त्रवादी राजकारणाचा शिरकाव ज्या विद्यार्थ्यांच्या मनांत होतो त्यांच्या जीवनांत संघर्ष निर्माण होणें अपरिहार्य ठरतें. रामरावांच्या बाबतींतहि असेंच झालें होतें. घरीं पालकांशीं त्यांचा संघर्ष आला व शाळेंत शिक्षकांच्या अपेक्षांशींहि रामरावांना समरस होतां आलें नाहीं.

कांहीं का कारणानें होईना एकदां घरांतून पळून गेलेला मुलगा घरीं परत आणला गेला कीं, कुटुंबांतील वडील मंडळींच्या कसोटीचा काळ सुरू होतो. संतापाच्या व दुःखाच्या भरांत वडील मंडळींकडून सहानुभूति-शून्य कठोर वर्तणूक मुलाच्या वांट्यास येते व त्यामुळें नुकतेंच उमलूं लागलेलें त्याचें जीवनपुष्प सुकून जाऊं लागतें. सुदैवानें, रामरावांच्या वडिलांनीं म्हणजे माधवरावांनीं फार समजूतदार दृष्टिकोन धारण केला. या बाबतींत आपल्या वडिलांनीं गुरुस्थानीं मानलेल्या सरंजामे या वडीलधाऱ्या पति-पत्नीच्या सल्ल्याचा त्यांना फार उपयोग झाला अशी आठवण रामराव अत्यंत कृतज्ञतेनें सांगत असतात. अर्थात् माधवराव हे फार हुषार गृहस्थ होते. आपल्या या मुलामध्यें कांहीं निराळेंच पाणी आहे आणि याच्या कर्तृत्वाला योग्य क्षेत्र सांपडलें तर हा अलौकिक कर्तबगारी गाजवील हें त्यांनीं बरोबर हेरलें. कदाचित् त्यांच्या डोळ्यांपुढें स्वतःच्या विद्यार्थिदशेंतील दिवस येऊं लागून ते स्वतःशीं असेंहि पुटपुटले असतील कीं, “ हा मुलगा माझ्याच पावलावर पाऊल टाकणार असें दिसत आहे. याचा काळ वेगळा म्हणून याचीं स्वप्नें वेगळीं झालीं आहेत. पण याच्या अंगामधील धाडस, हिंमत अन् हिकमतीपणा माझ्याच रक्तांतून आला आहे, दुसरें काय ? ”

खरोखरच माधवरावांची विद्यार्थिदशाहि एका तीव्र संघर्षांतूनच विकसित झाली होती. त्यांचें घराणें म्हणजे देशमुखांचें; जातिवंत शहाण्णव-कुळी मराठ्यांचें. अमरावती जिल्ह्यांतील दर्यापूर तालुक्यांत त्यांची मोठी वतनदारी होती. केवळ वऱ्हाडांतच नव्हे तर ग्वाल्हेर, बडोदा, धार, कोल्हापूर, सातारा या दूरदूरच्या ठिकाणच्या मराठे सरदारांच्या राज-घराण्यांतहि त्यांचे आप्तसंबंध पसरलेले होते. इंग्रज सरकारची कृपाहि त्यांच्या कुटुंबावर भरपूर होती. यामुळें माधवरावांचें बालपण कशा

वातावरणांत गेलें असेल याची आपण कल्पना करूं शकतों. पण माधवरावांच्या मनांत स्फूर्तीचा स्फुलिंग फुलला, महत्त्वाकांक्षेचा वारा वाहूं लागला. सरंजामशाहींतील बहुश: निष्क्रिय व सुखासीन जीवनांत आपणहि रमावें हें त्यांना पटेना. कुटुंबांतील ते सर्वांत धाकटे भाऊ होते. वडील वारलेले होते. सर्वांत मोठे बंधु वतनाचा कारभार बघत. मग आपण काय करायचें हेंच माधवरावांना सुचेना. सभोंवतीं ब्रिटिश राजवटीमधील नोकऱ्या पत्करून अंगच्या कर्तबगारीला वाट फोडून घेणारीं सुशिक्षित माणसें त्यांना दिसत होतीं. म्हणून त्यांनींहि तोच मार्ग चोखाळण्याचें ठरविलें. कोणालाहि न कळवितां त्यांनीं अवघ्या पंधरा रुपयांवर दर्यापुरास कारकुनाची नोकरी पत्करली व आपलें नशीब काढावयाचें असा निश्चय केला. माधवरावांच्या या बाणेदार कृत्यामुळें त्यांच्या विद्यार्थिदशेंत व्यत्यय आला होता व कुटुंबीय मंडळींशीं थोडासा तेढा उत्पन्न झाला होता. परंतु माधवरावांच्या कर्तबगारीला बाळसें येऊं लागल्यावर सर्व ठाकठीक झालें. नोकरीमध्यें ते धीरे धीरे वाढत गेले. सेवानिवृत्त होतांना ते डेप्युटी कलेक्टरच्या जागेवर होते. पण रामराव ज्या सुमारास घरांतून पळून गेले तेव्हां माधवराव बुलढाण्यास तहशीलदाराच्या म्हणजे मामलेदाराच्या हुद्द्यावर होते. पन्नास वर्षांपूर्वी मामलेदाराचा इतमाम फार असे. अशा सुखवस्तु वरिष्ठ सरकारी अधिकाऱ्याचा मुलगा राष्ट्रीय चळवळीकडे वळावा ही गोष्ट स्वाभाविक नव्हती. पण देशमुखीचा परंपरागत मान-सन्मान सोडून कारकुनी पत्करणाऱ्या माणसाच्या वडील मुलाकडून ‘ बापसे बेटा सवाई ’ अशा वृत्तीचें वर्तन घडावें हेंहि एका परीनें सुसंगत नाहीं का ?

आपल्या मुलाचें उच्च शिक्षण खंड न पडतां व योग्य प्रकारें कसें चालूं राहील यासंबंधीं माधवरावांच्या मनांत भीतीचा विचार वावरत असल्यास नवल नाहीं. शाळेंतील दैनंदिन अभ्यासाकडे रामरावांचें फार कमी लक्ष असे. त्यांची बुद्धिमत्ता निःसंशयपणें पहिल्या दर्जाची होती. पण आयत्या वेळीं अभ्यास करून परीक्षा पास होण्यापलीकडे त्यांनीं परीक्षेंतील यशाला कधींच महत्त्व दिलें नव्हतें. त्यामुळें माधवरावांना अशी काळजी वाटे कीं, न जाणो पुन्हा या मुलाच्या मनांत अतिरेकी

विचारांनीं घर केलें तर याचें शिक्षण अर्धवटच राहून जावयाचें. माधवरावांचें स्वतःचें शिक्षण मॅट्रिकच्या पलीकडे गेलें नव्हतें. त्यामुळें आपल्या मुलानें खूप शिकावें असें त्यांना वाटत असे.

सुदैवानें १९११ सालीं अगदीं अकल्पितपणें एक नामी संधि चालून आली. बडोद्याचे अधिपति सयाजीराव महाराज यांच्या कुटुंबांतील कांहीं तरुण मुलांना शिक्षणासाठीं इंग्लंडांत पाठविण्याची योजना निश्चित होत होती. 'या मुलांबरोबर तुमच्या रामरावालाहि पाठवा' असें पत्र, महाराजांचे सल्लागार श्री. खाशेराव जाधव यांच्याकडून माधवरावांना एक दिवस अचानक आलें. या पत्रामुळें रामरावांच्या पुढील जीवनाची दिशाच एकदम बदलून गेली. ते अजून मॅट्रिकहि झालेले नव्हते; पण त्यांनीं लगेच इंग्लंडला जाण्यास निघावें असें ठरविण्यांत आलें.

संस्कारक्षम वयामध्यें असतांना इंग्लंडसारख्या पुढारलेल्या देशांत जाऊन शिक्षण घेण्यास मिळणें ही एक अपूर्व संधि समजली पाहिजे. १९११ पासून पुढील पांच वर्षें रामरावांनीं इंग्लंडांत राहून मुख्यतः अर्थशास्त्र व कायदा या विषयांचा अभ्यास केला; परंतु कळत नकळतपणें त्यांनीं इंग्रजांच्या संस्कृतीमधील, विचारपद्धतीमधील व राजकारणामधील उत्कृष्ट भाग आत्मसात् केला असणार हें उघड आहे. १९१६ सालीं ते परत आल्यानंतर 'an old head on young shoulders' असेंच त्यांचें वर्णन अनेकांनीं केलें असल्यास आश्चर्य नाहीं.

रामराव स्वदेशीं परत आल्यानंतर त्यांच्यापुढें अनेक प्रलोभनें वाढून ठेवलेलीं होतीं. ते बॅरिस्टर असल्यामुळें व उच्च वजनदार कुटुंबांतील असल्यामुळें ब्रिटिश नोकरशाहीला त्यांची गरज होती. डिस्ट्रिक्ट जज्जाची नोकरी त्यांना देऊं करण्यांत आली व ती त्यांनीं पत्करली असती तर रामराव आज हायकोर्ट जज्ज म्हणून सेवानिवृत्त झालें असते !

परंतु रामरावांच्या अंतर्मनांतील लहानपणींची राष्ट्रीय चळवळीचीं स्वप्नें त्यांना असा सुखासीनतेचा व आंखीव कर्तबगारीचा मार्ग चोखाळूं देईनात. सुदैवानें त्या सुमारास लोकमान्य टिळक मंडालेहून सुटले होते व जहाल परंतु घटनावादी राजकारणाचें नेतृत्व त्यांनीं स्वीकारलें होतें.


' होमरूल लीग ' स्थापन झालेली होती. अशा वेळीं रामरावांसारख्या विधायक मनोवृत्तीच्या माणसाला भरपूर काम पुढें दिसूं लागलें.

१९१७ सालीं बेळगांव येथें भरलेल्या ' अखिल भारतीय मराठा परिषदे ' चें अध्यक्षस्थान रामराव यांस देण्यांत आलें. या प्रसंगीं रामराव यांनीं केलेल्या भाषणामुळें ते प्रथम प्रसिद्धीस आले. आपल्या भाषणांत त्यांनीं निर्भेळ व पुरोगामी राष्ट्रवादाचा पुरस्कार केला व जातीयवादाचा धिक्कार केला. याच वेळीं लोकमान्यांनीं त्यांची पाठ थोपटली व ' हा तरुण मनुष्य वऱ्हाडचा पुढारी होईल ' असे उद्‌गार काढले. लोकमान्यांची भविष्यवाणी खरी झाली आहे.

१९१७ पासून आजतागायत रामराव वऱ्हाडच्या राजकारणांत अग्रभागीं तळपत आहेत. तीन वेळां ते प्रांतिक मंत्री होते. त्यांची कारकीर्द नमुनेदार म्हणून दरवेळीं गाजलेली आहे.

रामरावांचा स्वभाव प्रसिद्धिविन्मुख आहे. आपणहून कोणतेंच काम अंगावर ओढवून घ्यावयाचें नाहीं अशी त्यांची वृत्ति आहे. त्यांच्या वृत्तीमध्यें पुढारीपणाची अतिरेकी हौस नाहीं असेंहि म्हणतां येईल. परंतु एखादें काम अंगावर पडलें कीं, मग मात्र तें अत्यंत चोखपणें व लोकहितदक्ष राहून बजावावयाचें असा त्यांचा बाणा आहे. राजकारणासारख्या धकाधकीच्या व्यवसायांत पडणाऱ्यांना आपली अभ्यासू व चिकित्सक दृष्टि कायम राखणें फार कठीण जातें. परंतु रामरावांनीं आपली स्वतंत्र विचारशक्ति कायम राखली आहे व त्यामुळेंच राजकारणांतील गुंतागुंतीच्या प्रश्नांवर ते सडेतोडपणें आपलीं मतें मांडीत असतात. परंतु या सडेतोडपणामुळें कार्यहानी होऊं नये अशी खबरदारी घेण्यांतहि ते कुशल आहेत. याबाबत आपला जन्मजात खिलाडू स्वभाव त्यांच्या उपयोगी पडतो. महाराष्ट्राच्या प्रत्येक उपप्रदेशांत कांहीं कांहीं चांगले गुण उपजतच सांपडतात हें जर खरें असलें तर वऱ्हाडकडील मंडळींमध्यें अनुभवास येणारा मनाचा दिलदारपणा व स्वभावाचा मोकळेपणा रामरावांमध्यें प्रकर्षानें आढळतो असें म्हणावें लागेल. रामरावांप्रमाणेंच प्रामाणिक व खिलाडू वृत्तीचीं माणसेंच जर राजकारणांत बहुसंख्येनें आढळूं लागलीं तर राजकारणासंबंधींचा सामान्य माणसांमधील हल्लींचा गैरसमज लयाला जाईल असा मला विश्वास वाटतो.

१९४५ पासून दोन वर्षें दक्षिण आफ्रिकेंत परराष्ट्रीय वकील म्हणून त्यांनीं काम पाहिलें. सध्यां ते लोकसभेचे सभासद आहेत व परिपक्क विचारांचा कुशल राजकारणी पुरुष म्हणून त्यांनीं दिल्लीमध्यें लौकिक संपादिलेला आहे. स्वतंत्र भारताची उभारणी होत असतांना रामरावां-सारख्या उमद्या मनाच्या, निर्मळ अंतःकरणाच्या व तल्लख बुद्धीच्या अनुभवी पुढाऱ्याकडून जनतेनें विशेष अपेक्षा बाळगणें रास्तच ठरणार नाहीं का ?





*तेव्हां माझ्याहि मनांत असा विचार येऊं लागला कीं, आपणाहि मुंबईला चित्रशाळेंत शिकायला जाऊन एन्ग्रेव्हिंग करण्याची कला तेथें शिकावी. याच सुमाराला म्हणजे १८८४ सालीं धारवाडला आगगाडी आली. वेळ सांपडला कीं मी स्टेशनवर जाऊन आगगाडीचें एंजिन पाहत बसें. त्या अजब यत्राची मला विलक्षण गंमत वाटत असे व याच आगगाडीनें प्रवास करून आपण मुंबईला जावें असा रोमांचकारी विचार माझ्या मनांत उसळी मारीत असे......... तेव्हां प्रवासापुरते पैसे वडिलांजवळून घेऊन मीं धारवाड सोडलें व सोलापूर अन् पुणें येथें मुक्काम करीत एके दिवशीं मुंबईस जाऊन पोंचलों......... मला पाहातांच वासुअण्णाला आश्चर्य वाटल्यासारखें दिसलें व त्यानें मला प्रश्न केला, ' तूं इकडे कसा आलास ? '*

" To youth, I have but three words – work, work, work. " अशा दमदार व निश्चयी शब्दांत प्रिन्स बिस्मार्कनें जर्मन तरुणांना संदेश दिला होता. श्री. लक्ष्मणरावजी किर्लोस्कर यांच्याजवळ जर कोणा भारतीय युवकानें अगर युवतीनें संदेश मागितला तर ते प्रिन्स बिस्मार्कप्रमाणेंच ' उद्योग, उद्योग, उद्योग ' अशी शब्दत्रयीच त्याला सादर करतील.

लक्ष्मणरावजींचें सर्व आयुष्य हें जणूं त्यांनीं उद्योगदेवतेला वाहिलेली सुमनमालाच आहे. या तेजस्वी फुलांचा सुवास आपल्या महाराष्ट्रभूमीच्या मंदिरांत गेलीं चाळीस-पन्नास वर्षे दरवळत आहे व त्याची कीर्ति गेल्या दहा-बारा वर्षांपासून अधिकच जोरानें अखिल भारतांत पसरूं लागली आहे. ज्या व्यक्तीच्या कुटुंबांत लहानपणीं धड दोन वेळ सुग्रास खाण्यासहि नव्हतें व ज्या व्यक्तीनें दुय्यम शाळेचें शिक्षणहि धड पुरें केलें नाहीं त्या व्यक्तीनें भारतांतील चार अग्रगण्य कारखान्यांची संस्थापना करावी, कोट्यवधि रुपयांची उलाढाल करावी, परदेशी मालाशीं टक्कर देऊन आपल्या मालाचा वकूब भारतभर सिद्ध करावा आणि हजारों कामगारांना रोजगार मिळवून द्यावा, ही गोष्ट अमेरिकेंतील एखाद्या उद्योगपतीबाबतची हकीगत ऐकावी अशीच वाटते, नाहीं का ? पण लक्ष्मणरावजींबाबत ही गोष्ट अक्षरशः खरी झालेली आहे व त्यामुळेंच त्यांच्या यशाचें रहस्य समजून घेणें तरुण वाचकांना अतिशय उद्बोधक होण्यासारखें आहे.

लक्ष्मणरावांचा जन्म १८६९ सालच्या जून महिन्याच्या २० तारखेला गुर्लहोसूर येथें झाला. त्या सुमारास लक्ष्मणरावांचे वडील काशिनाथपंत धारवाडास नुकतेच स्थायिक झाले होते. त्यापूर्वीं बरींच वर्षे काशिनाथ-पंतांनीं सरकारी मोजणी खात्यांत नोकरी केली होती. या नोकरीनिमित्त त्यांना गुजराथपासून म्हैसूरपर्यंत प्रवास करावा लागे. परंतु प्रवासाच्या दगदगीमुळें त्यांची प्रकृति चांगली राहीना. म्हणून ही नोकरी सोडून देऊन ते धारवाडला स्थायिक झाले आणि तेथील ' व्यापार-उत्तेजक

कंपनी ' या खाजगी कंपनींत दरमहा बारा रुपये पगाराची हिशेबनिसाची नोकरी त्यांनीं धरली.

काशिनाथपंतांचें आचरण अत्यंत शुद्ध असे. सरळ मनाचे, सात्त्विक आचरणाचे व परोपकारी वृत्तीचे गृहस्थ म्हणून त्यांचा लौकिक होता. त्यांना वेदान्ताची फार आवड असे. त्यामुळेंच त्यांच्या आयुष्यावर विरक्तपणाची छाप पडलेली दिसून येई. फिरतीच्या नोकरीमुळें ज्या ज्या गांवीं काशिनाथपंतांचा मुक्काम पडे तेथें तेथें त्यांच्याभोंवतीं परमार्थप्रेमी मंडळींचा घोळका जमावयाचा व त्यांच्यापुढें काशिनाथपंतांचा वेदान्त-निरूपणाचा कार्यक्रम ठरलेला असावयाचा.

या अशा परमार्थप्रवण पित्याच्या पोटीं जन्म घेण्याचें भाग्य लाभल्या-मुळेंच प्रौढपणीं लक्ष्मीची अलोट कृपादृष्टि झाल्यावरहि लक्ष्मणरावांच्या जीवनावर जडवादी सुखासीनतेचा व चैनी प्रवृत्तीचा पगडा केव्हांहि बसूं शकला नाहीं. जणूं आपलें जीवन एखाद्या उच्च व उदात्त कार्यासाठीं अर्पित आहे अशी जी ध्येयवादी भावना लक्ष्मणरावांच्या पुढील जीवनांत प्रकर्षानें आढळते तिचें मूलस्थान कोणी शोधूं गेल्यास तें काशिनाथ-पंतांच्या मनोवृत्तीमधील वेदान्तवादी संस्कारांतच सांपडेल असें म्हणावेसें वाटतें. समाजाच्या सर्वांगीण अभ्युदयासाठीं ' परमार्थ ' व ' अर्थ ' ( संपत्ति ) हे दोन्हीहि हवेत हें जर खरें असेल तर ' अर्था 'ची उपासना करणाऱ्यानें परमार्थवृत्तीचा आश्रय करणें स्वाभाविकच ठरणार नाहीं का ? त्यामुळेंच उद्योगपतीच्या आपल्या जीवनक्रमांत साधनांच्या बरे-वाईटपणाविषयीं लक्ष्मणरावांनीं पुढें सतत जो विवेक दाखविला आहे त्यावरून त्यांच्या परमार्थप्रवण पित्याचा वारसा त्यांनीं सत्कार्यासाठीं वापरला, इतकेंच नव्हे तर तो अधिक उज्ज्वल केला असेंच म्हटलें पाहिजे.

पित्याच्या जीवननिष्ठेचा ठसा जसा लक्ष्मणरावांच्या जीवनावर दिसतो तसा योग मातेच्या बाबतींत जमून आलाच नाहीं. लक्ष्मणरावांची आई त्यांना समजूं लागण्यापूर्वींच वारली ! गृहपरिस्थितीसंबंधीं बोलणें निघालें कीं लक्ष्मणराव सांगतात, " माझी आई मी तीन वर्षांचा असतांना वारली; माझी सर्वांत लहानपणची पहिली आठवण म्हणजे तिचें निधन हीच आहे.

आईच्या मृत्यूनंतर आम्हां सर्व भावंडांचें संगोपन करण्याची जबाबदारी वडिलांवरच पडली. आम्ही एकूण पांच भावंडें होतों. तिघे भाऊ व दोन बहिणी. भावांमध्यें मी सर्वांत लहान. पहिले रामूअण्णा, दुसरे वासुदेवराव व तिसरा मी. आई वारली तेव्हां मुलांपैकीं कोणीच हाताशीं आलेला नव्हता. वडिलांवरच सर्व भार. त्यांची मिळकत अगदीं बेताची. तेव्हां थोड्या खर्चांत साऱ्या कुटुंबाचा चरितार्थ चालवितांना आमचें खाणेंपिणें व कपडा-लत्ता यांत नेहमीं हाल चालावयाचे.

" आमच्या रोजच्या जेवणांत भाकरी हेंच मुख्य अन्न असे. गोडधोड पदार्थांची नेहमींच कमतरता. त्यामुळें शाळेंतून येतांना वाटेवरल्या वाण्यानें केव्हां तरी आमच्या हातावर गुळाचा खडा ठेवला म्हणजे आम्हांस मोठी चंगळ झाल्यासारखी वाटायची. रोजच्या आमटीसाठीं डाळीचीहि मारामार पडे. त्यामुळें भाकरीचें पीठ कालवून त्याचें पिठलें करण्यांत येई. १८७६ च्या सुमारास जो दुष्काळ पडला त्यांत आमचे किती हाल झाले हें विचारूंच नका ! "

मातृप्रेमाचा ओलावा न मिळतां बालपण गेल्यामुळें लक्ष्मणरावांच्या जीवनावर कांहीं प्रतिकूल परिणाम झाले आहेत असें दिसतें. दुर्दैवानें, त्यांच्या शिक्षणाची सुरुवात योग्य प्रकारें होऊं शकली नाहीं. गृहपरिस्थितींत पुरेसा ओलावा नसल्यामुळें त्या काळामधील सर्वसामान्य शाळांमध्यें असणाऱ्या कठोर व रूक्ष वातावरणाचा उपसर्ग लक्ष्मणरावांच्या कोमल मनाला फार तापदायक झाला. याबाबत लक्ष्मणराव आपली आठवण पुढीलप्रमाणें सांगतात–" शाळेंत पाऊल ठेवल्या दिवसापासून शाळेचें व माझें कधीं जमलें नाहीं. जे पहिले मास्तर मला भेटले त्यांची भीतीच मला बसली. धारवाडलाच माझ्या मराठी शिक्षणाची सुरुवात झाली. तेथील मारुतीच्या देवळांत डाव्या हाताला ओवरी आहे, त्यांत भाऊपंत मास्तरांची शाळा असे. त्यांची आकृति अद्याप मला आठवते. चांगलें जाडजूड प्रस्थ व काळाकुळकुळीत वर्ण. आम्हां बालविद्यार्थ्यांवर त्यांची करडी नजर असायची. आम्ही त्यांना चळचळ कांपत असूं. कारण त्या वेळच्या शिक्षणतंत्रास धरून ते छडीचा यथास्थित उपयोग करीत !

" या शाळेंत धूळपाटीवर मी श्रीगणेशा गिरविण्यास सुरुवात केली.

पण मास्तरांच्या धाकामुळें माझ्या हातून धड अभ्यास होण्याऐवजीं मला शाळेची भीति वाटूं लागली व मी वरचेवर शाळा चुकवून घरीं अडगळीच्या खोलींत लपून बसत असें. माझ्या मनांत मास्तरांबद्दल व शाळेबद्दल जी अढी बसून गेली ती मोठेपणींहि पूर्णपणें निघूं शकली नाहीं व पुढें हायस्कुलांत प्रवेश करण्याच्या सुमारासच मला शाळेला रामराम ठोकावा लागला. पण जें झालें तें ठीकच झालें असें आतां म्हटलें पाहिजे व माझ्या हातून शिक्षण पुरें न झाल्याबद्दल मला भाऊपंत मास्तरांचे आभारच मानले पाहिजेत. ''

अर्थात् ' झालें तें ठीकच झालें ' असे उद्गार जरी लक्ष्मणरावांच्या तोंडून आतां बाहेर पडत असले तरी शाळेला रामराम ठोकल्यापासून पुढील वीस-पंचवीस वर्षें आपल्या ध्येयसिद्धीसाठीं त्यांना तऱ्हतऱ्हेच्या किती अडचणींना तोंड द्यावें लागलें याचें विस्मरण आपल्याला होतां कामा नये. चाकोरींतील जीवन सोडून स्वतंत्र मार्ग चोखाळणाऱ्याच्या गळ्यांत यशोदेवतेनें माळ घातली कीं त्याच्या पूर्वायुष्याकडे बघण्याचा पुढील पिढ्यांचा दृष्टिकोन एकदम बदलून जातो. परंतु चाकोरी सोडून जीवनाची नवी दिशा चोखाळणाऱ्या पन्नास-शंभरजणांपैकीं एखादाच यशस्वी झालेला असतो, हें विसरतां कामा नये. चाकोरीबाहेरील जीवनांत कष्ट फार असतात, रोज नवनव्या प्रसंगांना तोंड द्यावें लागतें. प्रतिकूल परिस्थितीशीं अहर्निश सामना द्यावा लागतो व जगाचे डोळे एकसारखे त्या माणसाच्या हातांतील प्रयोगांकडे लागलेले असतात. यामुळेंच बुद्धिमत्तेची उच्च देणगी लाभलेले बहुसंख्य विद्यार्थीसुद्धां परीक्षांमधील पहिल्या वर्गाच्या पाठीमागें लागून हमखास मिळणाऱ्या नोकरीव्यवसायाच्या शोधांत राहतात. कारण चाकोरीबाहेर पडून कर्तृत्व सिद्ध करण्यास लागणारा मनाचा चिवटपणा, शरीराचा काटकपणा व बुद्धीचा लवचिकपणा फार थोड्या तरुणांमध्यें सांपडतो. राजकारण, साहित्य, संशोधन, कला, समाजसेवा, वृत्तपत्रव्यवसाय, उद्योगधंदा, कारखानदारी वगैरे क्षेत्रांमध्यें कांहीं तरी नवीन करून दाखविण्याची तळमळ असणारे युवक व युवती जितके अधिक निपजतील तितकें कोणतेंहि राष्ट्र लवकर पुढें जाऊं शकतें हें शाश्वत सत्य आपण विसरतां कामा नये. या दृष्टीनेंच,

आपल्या महाराष्ट्राच्या गेल्या शंभर वर्षांच्या इतिहासांत ज्या थोर व्यक्तींनीं नवीन वाट चोखाळून विविध क्षेत्रांमध्यें राष्ट्रीय स्वरूपाची कर्तबगारी गाजविली आहे त्यांमध्यें लक्ष्मणराव किर्लोस्कर यांनीं कारखानदारीच्या क्षेत्रांत गाजविलेल्या कामागिरीची गणना केलीच पाहिजे.

एका दृष्टीनें विचार केला तर लक्ष्मणरावांची विद्यार्थिदशा १८८४ सालीं त्यांनीं धारवाड येथील शाळेला रामराम ठोकला तेव्हां संपली नाहीं तर ती त्यांनीं औंध संस्थानांतील कुंडल स्टेशनानजीकच्या एका माळरानावर ( म्हणजे सध्यांच्या किर्लोस्करवाडी या जागेवर ) जेव्हां १९१० सालच्या मार्च महिन्यांत स्वतःचा कारखाना उभारला तेव्हांच संपली असें म्हटलें पाहिजे; म्हणजे लक्ष्मणरावांची विद्यार्थिदशा त्यांच्या वयाच्या एकेचाळिसाव्या वर्षीं संपली असें मानलें पाहिजे, नाहीं का? स्वतंत्र वृत्तीनें नवीं कामें उभारणाऱ्या कर्तृत्वशील पुरुषांची विद्यार्थिदशा अशा रीतीनें फार लांबल्याचीं उदाहरणें इतिहासांत अनेक आढळतात. विद्यार्थिदशा या शब्दाचा अर्थहि त्यांच्या बाबतींत सामान्य लोकांपेक्षां वेगळाच असतो. जग ही त्यांची शाळा असते; अनुभव हा त्यांचा गुरु असतो.

आपण इंग्रजी शाळा मध्येंच सोडण्याचें कसें ठरविलें याची हकीगत लक्ष्मणराव पुढीलप्रमाणें सांगतात––

" शाळेमध्यें अंकगणित, बीजगणित व संस्कृत या विषयांत माझी गति फारशी चालत नसे. माझे विशेष आवडीचे विषय म्हणजे युक्लीड, भूगोल व ड्रॉइंग. ड्रॉइंगची थर्ड ग्रेड परीक्षा मी पास झालों होतों. पण १८८३ सालीं धारवाडच्या हायस्कुलांत आल्यापासून गणिताच्या मास्तरांचें व माझें बिनसूं लागलें. उदाहरणें चुकल्याबद्दल मला वारंवार छड्या खाण्याचा प्रसंग येई. त्यामुळें माझी शाळेची आवड उलट कमीच होत चालली. याच सुमारास मला मोडकींतोडकीं घड्याळें, चित्रें, खडू, कोळसा आदि वस्तु गोळा करण्याचा नाद लागला. हा माझा संग्रह मी माझ्या पुस्तकांच्या पेटींत भरून ठेवीत असें. त्यावरूनहि मला बोलणीं खावीं लागत असत. शाळेंतल्या अभ्यासापेक्षां या वस्तु गोळा करण्यांत

व चित्रें काढण्यांत माझें मन अधिक रमत असे. माझे बंधु वासूअण्णा त्या वेळीं मुंबईच्या ग्रँट मेडिकल कॉलेजांत शिकावयास गेले होते. तेव्हां माझ्याहि मनांत असा विचार येऊं लागला कीं आपणहि मुंबईला चित्रशाळेंत शिकायला जाऊन एन्ग्रेव्हिंग करण्याची कला तेथें शिकावी. याच सुमाराला, म्हणजे १८८४ सालीं धारवाडला आगगाडी आली. वेळ सांपडला कीं मी स्टेशनवर जाऊन आगगाडीचें एंजिन पाहात बसे. त्या अजब यंत्राची मला विलक्षण गंमत वाटत असे व याच आगगाडीनें प्रवास करून आपण मुंबईला जावें असा रोमांचकारी विचार माझ्या मनांत उसळी मारीत असे.

" सरतेशेवटीं मी वडिलांनीं एके दिवशीं सांगितलें कीं, माझ्याकडून शाळेचा अभ्यास पुढें होण्यासारखा नाहीं. मला मुंबईला जाण्याची परवानगी द्या. सुदैवानें माझे वडील बंधु रामूअण्णा यांनीं माझ्या बेतास दुजोरा दिला. तेव्हां प्रवासापुरते पैसे वडिलांजवळून घेऊन मीं धारवाड सोडलें व सोलापूर अन् पुणें येथें मुक्काम करीत एके दिवशीं मुंबईस जाऊन पोंचलों. भायखळ्याच्या स्टेशनावरून चौकशी करीत करीत वासूअण्णा राहत असलेल्या गोव्यांच्या वाड्यांत जाऊन पोंचलों. मला पाहतांच वासूअण्णाला आश्चर्य वाटल्यासारखें दिसलें व त्यानें मला प्रश्न केला ' तूं इकडे कसा आलास ? ' चित्रशाळेंत नांव दाखल करण्याचा माझा निश्चय समजल्यावर त्यानें सर्व मदत करण्यास सुरुवात केली. "

कुठें धारवाड ! कुठें मुंबई ! अन् त्यांतील जे. जे. स्कूल ऑफ आर्टस् संस्थेंतील अभ्यासक्रम–कीं ज्या अभ्यासक्रमांना त्या वेळीं फारसें महत्त्वहि कोणी देत नसे. पण लक्ष्मणरावांच्या नादिष्ट डोक्यांत कांहीं कारणानें चित्रकलेचें आकर्षण भरलेलें होतें. थर्ड ग्रेड परीक्षा पास झाल्यामुळें त्यांच्या मनांत असें आकर्षण निर्माण झालें असावें. पण प्रत्यक्ष परिस्थितीची त्यांना कल्पना नव्हती. मानवी मनोरथांना मर्यादा असू शकतील हें कुमारवयांतील त्यांच्या स्वप्नाळू मनाला कसें पटत असणार ? पण लवकरच त्यांना एक धक्का बसला. त्यांनीं पेंटिंगचा शिक्षणक्रम निवडून अभ्यासास जारीनें सुरुवात केली होती. पण थोड्याच दिवसांत असें आढळून आलें कीं, त्यांच्या एका डोळ्यांत एक विचित्र दोष होता !

इंग्रजी भाषेंत 'कलर ब्लाइंडनेस' (म्हणजे कांहीं रंगांच्या बाबतींत अंधत्व असणें) असें डोळ्यांच्या ज्या विकाराला म्हणतात त्या विकाराची बाधा त्यांच्या एका डोळ्याला झाली होती असें आढळून आलें व त्यामुळें पेंटिंगच्या क्लासमधून त्यांना नांव काढावें लागलें.

पुढें कशी वाट काढावी हा प्रश्न होता. आपल्या प्रारब्धाला दूषणें देत लक्ष्मणराव धारवाडास परत जातात कीं काय इकडे सर्वांचें लक्ष होतें. पण पुनः धारवाडास शाळेंत न जाण्याचा लक्ष्मणरावांचा निश्चय पक्का होता. आपल्या नशिबाची परीक्षा मुंबईतच पाहावयाची असा कृत-निश्चय त्यांनीं केला होता. डोळ्याच्या विकारामुळें जरी पेंटिंग शक्य नव्हतें तरी मॉडेलिंगचा शिक्षणक्रम घेणें शक्य होतें असें त्यांना चौकशी करतां आढळून आलें. त्याबरोबर त्यांनीं मॉडेलिंगच्या क्लासांत नांव घातलें व बंद पडण्याची शक्यता निर्माण झालेली आपल्या शिक्षणाची गाडी पुनः सुरू केली.

या सुमारासच लक्ष्मणरावांच्या आयुष्यांत एका मित्रानें प्रवेश केला. मित्रांच्या व परिचितांच्या मध्यस्थीमुळें लक्ष्मणरावांच्या पुढील जीवनांत अनेक महत्त्वाचे बनाव घडून आले. त्याची सुरुवात चित्रशाळेंत ओळख झालेल्या भवानीशंकर या मित्रापासून झाली. भवानीशंकरचा व लक्ष्मणरावांचा निकटचा स्नेह जुळून आला व त्यामुळें लक्ष्मणराव एके दिवशीं भवानीशंकरच्या घरीं गेले आणि त्या दिवशीं अचानकपणें त्यांना आपल्या लहानपणापासून आवड असलेल्या विषयाची मुंबईत सहजगत्या ओळख झाली. तो प्रकार असा—

हे भवानीशंकर जातीनें त्वष्टा कासार होते. त्यांच्या घरीं वडिलांचा लहानसा कारखाना होता. मध्यभागीं त्यांचें घर व आजूबाजूच्या पडवींत तांबें, पितळ, बीड यांच्या कामाच्या भट्ट्या. एका बाजूला लेथ व ड्रीलिंग मशीनहि बसविलेलीं असत. या कारखान्यांत दारू गाळण्याची भांडीं व इतर अशाच प्रकारचें सामान तयार होत असे. भवानीशंकरबरोबर जेव्हां लक्ष्मणराव त्याच्या घरीं गेले तेव्हां हीं यंत्रें पाहून त्यांना फार कुतूहल वाटूं लागलें. म्हणून फुरसत मिळाली कीं, ते वारंवार त्याच्या घरीं जाऊं लागले व तेथें मिळेल तें काम हौसेनें करावयाचा नादच त्यांना हळूहळू लागला.

भवानीशंकरच्या कारखान्यांतील लेथ व ड्रीलिंग मशीन चालवितां येऊं लागल्यामुळें स्वतःचें पोट भरण्यास आपण आतां समर्थ झालों आहोंत असा आत्मविश्वास लक्ष्मणरावांना वाटूं लागला. या आत्मविश्वासामुळें त्यांच्या मनोवृत्तींत एकाएकीं परिवर्तन झालें व वडिलांकडून अगर भावाकडून पैसे न घेतां आपण जगावें असें त्यांना वाटूं लागलें. सुदैवानें, या वेळीं एक अनुकूल घटना घडून आली. ती अशी आहे कीं, यांत्रिकी शिक्षण देण्यासाठीं १८८७ सालीं मुंबईमध्यें 'व्हिक्टोरिया ज्युबिली टेक्निकल इन्स्टिटयूट' ही नवीन संस्था सुरू करण्यांत आली. त्या संस्थेंत मेकॅनिकल ड्रॉइंग शिकविण्यासाठीं एक शिक्षक हवा असल्याचें लक्ष्मणरावांना समजलें. लगेच ते इन्स्टिटयूटचे पहिले प्रिन्सिपॉल मि. पीथियन यांना भेटले. प्रिन्सिपॉलसाहेबांनीं जी चाचणी घेतली त्यांत ड्रॉइंगची व यंत्रांची पुरेशी माहिती लक्ष्मणरावास असल्याची त्यांची खात्री पटली व त्यामुळें लगेच दरमहा ३५ रुपये पगारावर लक्ष्मणरावांची नेमणूक करण्यांत आली! अचानकपणें त्यांच्या जीवनांत घडलेली ही प्रगति पाहून नातेवाईक व मित्रमंडळी आश्चर्यचकित होऊन गेली असल्यास नवल नाहीं.

परंतु लक्ष्मणरावांच्या महत्त्वाकांक्षेची तहान वाढतच गेली. व्हिक्टोरिया टेक्निकल इन्स्टिटयूटमधील आपलें आंखीव काम संपलें कीं ते तेथील वर्कशॉपमध्यें हौस म्हणून तासन् तास काम करीत व अनेक परदेशी अद्ययावत् यंत्रांची रचना समजावून घेत. त्याप्रमाणें आपल्या पैशांतून ते यंत्रांसाठीं आवश्यक असणारा माल खरेदी करून स्वतः यंत्रें बनवून पाहत. याशिवाय यंत्रांबद्दलची परदेशांतील, विशेषतः अमेरिकेंतील पुस्तकें, मासिकें व कॅटलाग मागविण्यांत ते आपला स्वतःचा पैसा खर्च करीत. त्याच सुमारास 'अमेरिकन मशीन्स' या नांवाचें मासिक सुरू झालें. त्याचे ते पहिल्यापासून वर्गणीदार झाले. अशा प्रकारें, इन्स्टिटयूटमध्यें शिक्षक म्हणून काम करीत असतां स्वतः एक यंत्रतज्ज्ञ होण्याचा ध्यास त्यांनीं स्वतःला लावून घेतला होता.

जातां जातां अशीं तेरा–चौदा वर्षें गेलीं. मध्यंतरीं लक्ष्मणरावांचें लग्न

झालें व त्यांचा संसार सुरू झाला. आपल्या पत्नीसंबंधीं लक्ष्मणराव एक गमतीदार आठवण सांगतात. ती अशी : " त्या काळांतल्याप्रमाणें माझें लग्न वडील माणसांनींच ठरविलें. विवाहविधि आटोपल्यानंतरच पत्नीची व माझी प्रथमच दृष्टभेट झाली ! त्या वेळीं ती परकर नेसणारी मुलगी होती. पुढें दोन वर्षांनीं तिला सोलापूरला माझे वडील बंधु डॉ. वासुअण्णा यांच्याकडे पोंचविण्याची कामगिरी माझ्याकडे आली. त्याप्रमाणें मी हुबळीहून पत्नीला घेऊन सोलापुरास जाण्यास आगगाडीनें निघालों. परंतु सबंध प्रवासांत एक शब्दहि एकमेकांशीं बोलण्याचें धाडस आम्हांस झालें नाहीं ! त्यामुळें पत्नीला तहान लागली तरी तिनें पाणी मागितलें नाहीं, व तशी तळमळत वेळ मारून नेली. त्या वेळीं नवराबायकोंनीं एकमेकांशीं बोलणें अप्रस्तुत मानलें जाई. "

१८९०–९५ च्या सुमारास एक कुशल व कल्पक यंत्रतज्ज्ञ म्हणून मुंबईत लक्ष्मणरावांची कीर्ति पसरूं लागली होती. एखाद्या छापखान्याचें किंवा छोट्यामोठ्या कारखान्याचें कोणाचें कांहीं अडलें कीं लक्ष्मणरावांना बोलावणें पाठविण्यांत येई. या अशा संबंधांतून लक्ष्मणरावांना आपला एखादा स्वतंत्र धंदा असावा अशी कल्पना सुचूं लागली व म्हणून इन्स्टिट्यूटमधील नोकरी सांभाळून त्यांनीं व्यापाराचे लहानसहान प्रयोग करून पाहिले. त्यांतले कांहीं यशस्वी झाले, कांहीं अयशस्वी झाले. परंतु प्रत्येक वेळीं अनुभवाचा नफा मात्र गांठीला लागावयाचाच ! सायकलीचे सुटे भाग आयात करण्याचा धंदा त्यांतल्या त्यांत जरा किफायतशीर झाला. मोठ्या प्रमाणावर भांडवल जमा करून एखादी उपयुक्त वस्तु तयार करण्याचा कारखाना उभारण्याची कल्पना या सुमारासच अधूनमधून लक्ष्मणरावांच्या डोक्यांत प्रवेश करीत असे. पण इन्स्टिट्यूटमधील हातची नोकरी सोडून पळत्याच्या पाठीमागें लागणें कितपत समंजसपणाचें होईल याचा निर्णय ठरविणें त्यांना अवघड जात होतें.

परंतु या द्विधा मनःस्थितींतून त्यांची एका प्रसंगानें अचानकपणें सुटका झाली. इन्स्टिट्यूटमधील लक्ष्मणरावांच्या खात्याचे प्रमुख असलेले गुड या नांवाचे इंग्रज गृहस्थ मिशनरी होण्याचें ठरवून एकाएकीं आपल्या जागेचा

राजीनामा देऊन निघून गेले. त्यामुळें ती जागा भरण्याचा प्रश्न निर्माण झाला. वास्तविक, अनुभवाचा विचार करतां ही जागा श्री. माङ्गलकर अगर लक्ष्मणराव या त्याच खात्यांत सुरुवातीपासून काम केलेल्या एका माणसास द्यावयास हवी होती. पण त्याबाबत अन्यायाचें धोरण ठरविण्यांत आलें व ती जागा एका बाहेरच्या व कमी अनुभव असलेल्या खिश्चन हिंदी माणसास वशिल्यामुळें देण्यांत आली. या कृत्याचा लक्ष्मणरावांनीं व माङ्गलकरांनीं निषेध करण्याचें ठरविलें व त्याप्रीत्यर्थ त्यांनीं आपल्या जागांचे राजीनामे सादर केले.

ही गोष्ट त्यांनीं अविचाराची केली, नोकरी म्हटली कीं त्यांत अन्याय गिळावाच लागतो वगैरे उपदेशाची सरबत्ती त्यांच्यावर सुरू झाली. त्यामुळें त्यांचा धीर डळमळूं लागला. तेवढ्यांत माङ्गलकरांनीं आपला राजीनामा परत घेतला. त्यामुळें लक्ष्मणरावांची स्थिति फार विचित्र झाली. परंतु एकदां पुढें टाकलेलें पाऊल मागें घेणें लक्ष्मणरावांच्या बाणेदार स्वभावाला रुचेना. त्यांनीं सर्व हकीगत आपले वडील बंधु रामूअण्णा यांना बेळगांवास कळविली व त्यांचा सल्ला मागितला. रामूअण्णांचें लक्ष्मणरावांवर निरतिशय प्रेम होतें. राम-लक्ष्मणांचीच जोडी ती ! (रामूअण्णांचा मुक्काम सांप्रत दक्षिण सातारा जिल्ह्यांतील औंध या गांवीं असतो. त्यांचें वय ९९ आहे.) आपल्या धाकट्या भावाची खरी पात्रता रामूअण्णा जाणून होते त्यांनीं कळविलें, “नोकरी सोडल्याची मुळींच फिकीर करूं नकोस. आपण सायकलींचा व इतर यंत्रांचा स्वतंत्र धंदा बेळगांवांतच करूं. तेव्हां तिकडचा पसारा गुंडाळून सरळ बेळगांवला ये.”

लक्ष्मणरावांच्या आयुष्यांतील पुढील आठ-दहा वर्षें बेळगांवांतील ठळकवाडी या भागांत कारखान्यासंबंधीं विविध प्रयोग करण्यांत गेलीं. अगदीं योगायोगानेंच शेतकऱ्यांसाठीं आधुनिक पद्धतीचीं अवजारें करण्याची कल्पना त्यांना सुचली. त्याबाबतचे किती तरी प्रयोग पहिल्यांदां फसले. पण हळूहळू त्याबाबतची सफाई प्राप्त झाली. पण नांगरांच्या विक्रीबाबत फारशी प्रगति झाली नाहीं. अशा अर्धयशस्वी परिस्थितींत असतांनाच बेळगांव-नगरपालिकेनें त्यांना ठळकवाडींतून कारखाना हलविण्याचा हुकूम दिला ! दुसरी सोयीस्कर जागा बेळगांवांत मिळेना. अशा विवंचनेंत

असतांनाच औंध संस्थानचे तेव्हांचे राजे श्रीमंत बाळासाहेब पंतप्रतिनिधि यांनीं लक्ष्मणरावांना संस्थानांतील जागा कारखान्यासाठीं देऊं केली. त्या संधीचा फायदा घेऊन १९१० सालच्या मार्च महिन्यांत लक्ष्मणरावांनीं बेळगांवचा कारखाना हल्लींच्या 'किर्लोस्करवाडी' या सुप्रसिद्ध वास्तूमध्यें हलविला. एका उजाड माळावरतीं कारखाना सुरू केल्यानंतर त्याचें परिवर्तन हळूहळू एका सुंदर वसाहतींत कसें झालें याचा इतिहास स्वतंत्रपणें सांगण्यासारखा आहे. म्हणून या लेखांत त्यासंबंधीं कांहींच लिहीत नाहीं. युवकवाचकांना एक विनंती मात्र अवश्य करावीशी वाटते. ती अशी कीं, एखाद्या सुट्टीचा मोका गांठून त्यांनीं आपल्या वर्गाची सहल 'किर्लोस्करवाडी'चा कारखाना पाहण्यासाठीं अवश्य घेऊन जावी.

अर्थात् आतां किर्लोस्करवाडीप्रमाणेंच खडकी, हरिहर व बंगलोर या ठिकाणींहि किर्लोस्करांचे कारखाने भरभराटींत चालू आहेत. ज्यांना शक्य होईल त्यांनीं तेहि कारखाने पाहावे. परंतु, हे कारखाने पाहाण्याबरोबरच ज्यांना त्यांची संस्थापना करणाऱ्या उद्योगमहर्षीला पाहण्याची संधि मिळेल ते युवक अधिक धन्य होत असेंच मी म्हणेन. १९४५ सालीं किर्लोस्करवाडी सोडल्यापासून कारखान्यांच्या दैनंदिन जबाबदारींतून लक्ष्मणराव निवृत्त झाले आहेत. पण अद्यापहि ते उगीच आळसांत स्वस्थ बसल्याचें कोणाला दिसत नाहींत. खडकीला एका शेतांत ते नियमितपणें काम करतांना दिसतात. तऱ्हतऱ्हेचीं धान्यें पिकविणें, डेअरी चालविणें, मधमाशा पाळणें वगैरे किती तरी नवे उद्योग त्यांच्या हातांत असतात. अर्थात् वयोमानाप्रमाणें ते थकत चालले आहेत. कानानें कमी ऐकूं व डोळ्यानें कमी दिसूं लागल्यामुळें ते अलीकडे समाजांत फारसे मिसळत नाहींत. १९५३ सालीं पुण्याच्या 'मराठा चेंबर ऑफ कॉमर्स अँड इन्डस्ट्रीज' या संस्थेनें जेव्हां त्यांचा विशेष सन्मान केला त्या वेळीं समारंभाचे अध्यक्ष सर विश्वेश्वर अय्या लक्ष्मणरावांविषयीं जें म्हणाले तें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. श्री. विश्वेश्वर अय्या म्हणाले, "लक्ष्मणराव किर्लोस्करांनीं दाखविलेलें कर्तृत्व अत्यंत दुर्मिळ व विधायक प्रकारचें आहे. त्यांनीं एका पाठोपाठ चार कारखाने काढले व त्या कारखान्यांचा जो विकास झालेला दिसतो त्यावरून किर्लोस्करांच्या दूरदृष्टीची व चालकनैपुण्याची कोणालाहि साक्ष

पटेल. गुणी व महत्त्वाकांक्षी तरुणांनीं लक्ष्मणरावांच्या चरित्राचा आदर्श डोळ्यांपुढें ठेवावा."

हिंगण्याच्या संस्था व महिला विद्यापीठ यांच्या रूपानें महर्षि कर्वे यांनीं ज्याप्रमाणें राष्ट्राला अमोल देणगी दिली आहे, त्याप्रमाणेंच लक्ष्मणरावांनीं काढलेले चार प्रचंड कारखाने ही त्यांनीं राष्ट्राला दिलेली भव्य देणगीच आहे, नाहीं कां ? *

*" मनापासून आपलें म्हणून काम केल्याशिवाय संपत्ति निर्माण होत नाहीं. प्रथम निर्मिति आणि नंतर वांटप ही खूणगांठ प्रत्येकाने बांधली पाहिजे. "*

ल. का. किर्लोस्कर
२५. ८-१९५३

---

* हा लेख ' सह्याद्रि ' मासिकाच्या सप्टेंबर १९५६ अंकांत प्रसिद्ध झाला. त्यानंतर २६ सप्टेंबर १९५६ रोजीं लक्ष्मणरावजींना काळपुरुषानें एकाएकीं आपल्यांतून नेलें ! या दुःखद घटनेनें अखिल महाराष्ट्राला धक्का बसला.

# सुपुत्रांना अभिवादन

मित्रहो,

महाराष्ट्राच्या ज्या नऊ सुपुत्रांचीं जीवनचरित्रें तुम्ही आतांपर्यंत वाचलींत त्यांना अभिवादन करून आतां आपण त्यांचा निरोप घेऊं या.

या नऊ कर्तबगार व्यक्तींच्या जीवनापासून शिकण्यासारखें पुष्कळच आहे.

हीं चरित्रें वाचीत असतांनां तुम्ही केवळ करमणूक म्हणून तीं वाचलीं नसणार हें उघडच आहे. कारण मनुष्यस्वभाव असा गमतीदार आहे कीं, त्यांत बोध व मनोरंजन या दुहेरी हेतूंचें सुंदर मिश्रण झालेलें आहे. नुसती बहिर्मुखता किंवा नुसती अंतर्मुखता मनुष्यस्वभावांत सहसा आढळत नाहीं. त्यामुळेंच अन्य व्यक्तींसंबंधीं ऐकतांना किंवा वाचतांना आपण सहजगत्या अंतर्मुख होतों. चरित्रें वाचतांना आपली मनःस्थिति अंतर्मुखतेकडे थोडी थोडी जास्तच झुकत असते. त्यामुळेंच हीं चरित्रें वाचतांना 'माझ्या स्वतःच्या जीवनाची उभारणी करतांना या चरित्रांपासून मला काय काय शिकतां येईल ?' असा प्रश्न कळत नकळतपणें तुमच्या मनांत प्रथम-पासूनच जागृत झालेला असेल.

त्यामुळें एव्हाना तुमच्या मनांत कांहीं विचार गोळा झाले असतील. त्या विचारांनीं तुमच्या डोक्यांत गर्दी केली असेल. मग हे विचार फुकट जाऊं देतां कामा नयेत. लिहून काढतां का ते विचार ? अवश्य लिहून काढा आणि शक्य झालें तर ते विचार आपल्या कांहीं मित्रांना, शिक्षकांना किंवा नातेवाइकांना दाखवून त्यांच्याशीं त्याबाबत चर्चा करा.

## नऊ विलोभनीय आदर्श

प्रस्तुत पुस्तकांतील नऊ माणसें म्हणजे कर्तबगार जीवनाचे नऊ विलोभनीय आदर्श आहेत. प्रत्येकजण आपापल्या परीनें मोठा आहे. पण

इतरांपेक्षां निराळा. प्रत्येकाच्या जीवनाची ढब निराळी आहे. प्रत्येकाच्या कर्तृत्वाची दिशा वेगळी आहे. प्रत्येकाच्या ध्येयवादाची स्फूर्ति वेगळी आहे. प्रत्येकाच्या घरची परिस्थिति वेगळी आहे. प्रत्येकाची जन्मजात बुद्धि वेगळी आहे. मोठेपणाचें कार्यक्षेत्र व पदरीं आलेलें यश किंवा लोकप्रियता हींहि वेगवेगळीं आहेत.

अशी किती तरी भिन्नता आहे या प्रत्येकांत. पण तरीहि या सर्वांमध्यें एक साम्य आहे, तें असें कीं, हे सर्वजण एकसारखीं धडपड करणारीं माणसें आहेत; सर्वजण प्रयत्नवादी आहेत; महाराष्ट्राचा व भारताचा उत्कर्ष व्हावा म्हणून सर्वजण झगडले आहेत.

आणखी एक साम्य सर्वांच्यांत आहे. सर्वजण जन्मतः गरीब किंवा सामान्य कुटुंबांतील आहेत. कांहींजणांच्या घरची गरिबी इतकी होती कीं, दोन वेळां खायला पुरेसें मिळण्याची चिंता होती. डॉ. खैर किंवा सरदेसाई, जगताप किंवा लक्ष्मणराव किर्लोस्कर यांच्या कुटुंबांत एवढें कमालीचें दारिद्र्य असतांना हीं माणसें समाजहितबुद्धीनें कार्य करण्याची तळमळ पोटाशीं बाळगून वर कशीं आलीं याचेंच आश्चर्य वाटतें.

विद्यार्थिदशेंत असतांना आईवडिलांच्या निधनामुळें किंवा इतर कौटुंबिक विपत्तींमुळें स्वतःच्या वैयक्तिक जीवनांतील प्रश्न अवघड झाले किंवा वैयक्तिक जीवनांतील निराशा वाढल्या कीं माणूस व्यक्तिवादी किंवा आत्मकेंद्री होण्याचा दाट संभव असतो. समाजासंबंधीं त्यागपूर्वक काम करण्याबाबत तो भित्रा बनतो. पण या नऊ सुपुत्रांच्या जीवनाकडे बघितल्यानंतर माणूस दारिद्र्याला किंवा इतर अडचणींना तोंड देऊनहि आपली समाजहितबुद्धि कायम राखूं शकतो असेंच आपल्याला पटतें.

आपला महाराष्ट्र हा गरीब, दरिद्री देश आहे. आर्थिक विवंचना ही आपल्या पांचवीला पुजलेली आहे. पण अशाहि प्रतिकूल परिस्थितींत माणसें वर येतच आहेत. दारिद्र्याच्या खस्ता खाऊनच आपले सुपुत्र महाराष्ट्राची व भारताची सेवा करण्याचें कंकण जांभेकर–फुले–रानडे–टिळक–आगरकर–गोखले यांच्या काळापासून हातीं बांधत आहेत.

## सुपुत्र कोणाला म्हणावें ?

आणि इतकेंच नव्हे तर महाराष्ट्राच्या सुपुत्रांचें—दिवंगत व हयात अशा सर्वांचें—आणखी एक वैशिष्ट्य आहे. तें असें कीं, ते जसे जन्मतः दरिद्री होते तसेच जवळपास अखेरीपर्यंत दरिद्रीच राहिलेले आहेत. व्यापारांत किंवा कारखानदारींत अलौकिक यश संपादणाऱ्या व्यक्तींचाहि दृष्टिकोन मूलतः समाजहितबुद्धीचाच राहिलेला आहे. त्यामुळें त्यांच्या श्रीमंतीपेक्षां त्यांची कर्तबगारीच लोकांना अधिक प्रिय झाली आहे. यामुळें हेंच सिद्ध होतें कीं, केवळ पैसा मिळवणाऱ्याला महाराष्ट्रांत सुपुत्राचा दर्जा प्राप्त होत नाहीं. व्यक्तीजवळ श्रीमंतीपेक्षां व सत्तेपेक्षां जर इतर कांहीं समाजोपयोगी गुण प्रकर्षानें नसले तर आपण महाराष्ट्रीय माणसें कोणालाच पुढारीपण देण्यास तयार नसतों.

याचाच अर्थ असा कीं, सामाजिक ध्येयवाद व राष्ट्रीय दृष्टिकोन असल्याशिवाय व्यक्तीच्या जीवनाला किंवा कर्तबगारीला पूर्णत्व आलें असें मानावयाचें नाहीं अशी आपली परंपरा आहे. स्वतःपुरत्या व स्वतःच्या कुटुंबापुरत्याच ज्यांच्या सर्व शक्ति केंद्रित होऊन राहातात तीं माणसें अपूर्ण जीवन जगत असतात असेंच महाराष्ट्र समजतो.

अर्थात् सामाजिक ध्येयवाद व राष्ट्रीय दृष्टिकोन राखून आपलें जीवन जगत असतांना कोणाला किती यश येईल किंवा प्रसिद्धि लाभेल हा प्रश्न कमी महत्त्वाचा समजला पाहिजे. कोणत्या पातळीवर तुम्ही जीवन जगतां याला अधिक महत्त्व असतें. कारण यश किंवा लौकिक या बाबी व्यक्तीच्या अधीन नसतात. परंतु योग्य दिशेनें प्रयत्न करणें हें तर व्यक्तीच्या हातीं असतें ना ? आणि दिशा योग्य स्वीकारणें व अडचणी किंवा संकटें आलीं असतांहि तीं कायम राखणें यालाच अधिक महत्त्व आहे. प्रस्तुत पुस्तकांतील सुपुत्रांच्या जीवनापासून हाच संदेश आपण घेतला पाहिजे. प्रसिद्धि प्राप्त झाली कीं, त्या व्यक्तीला सुपुत्राचें अभिधान चिकटावेलें जातें असा गैरसमज युवकांनीं करून घेऊं नये. खूप प्रसिद्धि वांट्यास आलेलीं कित्येक माणसें सुपुत्र नसतात व प्रसिद्धीचा लवलेशहि

न लाभलेलीं कित्येक माणसें सुपुत्र या अभिधानास अत्यंत पात्र झालेलीं असतात.

## व्यक्तिजीवनांत सामाजिक आशय हवा

तेव्हां आपापल्या वैयक्तिक जीवनाची पातळी शक्य तितकी उंच नेणें, म्हणजेच आपल्या जीवनांत सामाजिक किंवा राष्ट्रीय आशय निर्माण करणें, हेंच उद्दिष्ट तुम्ही आपल्या डोळ्यांपुढें एव्हापासून ठेवलें पाहिजे. त्यासाठीं विद्यार्थिदशेंतील काळाचा उपयोग तुम्ही योग्य रीतीनें केला पाहिजे. ज्या माणसाची वैयक्तिक पात्रता किंवा लायकी वाढत जाते त्याचाच सामाजिक किंवा राष्ट्रीय ध्येयवाद प्रत्यक्षांत आमरण टिकूं शकतो. ज्या माणसाची पात्रता बेताची राहते त्याचा सामाजिक ध्येयवादहि खालच्या पातळीवरच राहतो. विद्यार्थिदशेंत असतांना भावनेच्या भरांत अनेकजण ‘ मी राष्ट्रासाठीं असा त्याग करीन ’, ‘ मी समाजाची सेवा तशाप्रकारें करीन ’ वगैरे बोलत असतात. परंतु त्यांपैकीं बहुतेकांकडून अल्पशीहि सेवा घडत नाहीं. बहुसंख्य युवकांचा ध्येयवाद जलाशयावरील बुडबुड्यां-प्रमाणें क्षणिक व पोकळ ठरतो.

आपल्या मनांतील सामाजिक व राष्ट्रीय दृष्टिकोन शाबूत राखून स्वतःची पात्रता कशी वाढवावयाची असा प्रश्न जेव्हां तुमच्या मनांत येईल तेव्हां ह्या नऊ सुपुत्रांचीं चरित्रें तुम्हीं पुनः एकदां बारकाईनें वाचा. सुपुत्रांचीं चरित्रें वाचून किंवा त्यांना प्रत्यक्ष पाहून ‘ समाजोपयोगी जीवन कसें जगावें ? ’ याची कला आपण शिकतों. समाजाच्या व राष्ट्राच्या उपयोगी पडणारें असें उच्च पातळीवरील जीवन जगण्यासाठीं सुपुत्रांचीं चरित्रें तुम्हांला स्फूर्तिप्रद व मार्गदर्शक ठरोत अशी प्रार्थना करून व सुपुत्रांना पुनः एकवार अभिवादन करून मी तुमचा निरोप घेतों.

जय हिंद !

मूल्य पावणेदोन रुपये

## कांहीं आगामी प्रकाशनें

( १ ) **महाराष्ट्राचे सुपुत्र** भाग २

श्री. य. गो. नित्सुरे

( २ ) **कुमारांचा सोबती** भाग १ व २

श्री. य. गो. नित्सुरे

( ३ ) **संसाराचा सारीपाट**

सौ. वनमाला भवाळकर

( ४ ) **भावनांचा मांडव**

प्रा. श्री. म. माटे

कै. म. म. द. वा. पोतदार
ग्रंथ संग्रह

व्हीनस प्रकाशन

४१० शनवार : पुणें २.